मिळून साऱ्याजणी

पुणे । वर्ष चोविसावे । अंक अकरावा । जून २०२५ । पृष्ठसंख्या ६० । किंमत ₹ ५०/-
Miloon Saryajani | Pune | Vol. 24 | Issue 11th | June 2025 | Pages 60 | Price Rs. 50

डॉ. शरदचंद्र शंकर कुलकर्णी

एक द्रष्टा ज्ञानव्रती

डॉ. शरदचंद्र शंकर कुलकर्णी (जन्म ७ मे १९२६, निधन ७ ऑगस्ट २०१९) यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष (२०२५-२६).

शिक्षण, बँकिंग व्यवस्थापन, ग्रामीण पुनर्रचना, महिला सबलीकरण, आजीवन अध्ययन (Life Long Learning) अशा अनेक समाजाभिमुख ज्ञानक्षेत्रांत मनापासून विहरणारा हा ज्ञानतपस्वी. त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेताना मन थक्क होते.

त्यांनी १९६१ साली अमेरिकेतील सुप्रसिद्ध पर्ड्यू विद्यापीठातून मुदतीपूर्वीच Ph. D. पदवी सन्मानपूर्वक मिळविली. त्यानंतर एक वर्ष ETS (Educational Testing Services) या नामवंत संस्थेत काम करण्याची आणि नवीन कौशल्ये शिकण्याची संधी मिळाली. तो अनुभव त्यांना भारतात आल्यावर खूप उपयोगी पडला.

१९६२ साली भारतात (दिल्लीला) आल्यावर नव्यानेच (१९६१ मध्ये) स्थापन झालेल्या NCERT (राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद) या संस्थेत त्यांना सन्मानपूर्वक आमंत्रित केले गेले. तेथे त्यांनी स्वतः विकसित केलेल्या क्रमान्वित अध्ययनाच्या (Programmed Learningच्या) नव्या प्रणालीचे भारतीय शालेय शिक्षणात, अध्यापक प्रशिक्षणात उपयोजन केले. तसेच त्यातील अधिक संशोधन, शिक्षक प्रशिक्षणाच्या नव्या पद्धतींचा (प्रतिमानांचा) विकास, इत्यादी कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले, अनेक नव्या प्रशिक्षक कार्यकर्त्यांची फळी तयार केली.

१९७० मध्ये National Institute of Bank Management (NIBM) या मुंबईत नव्याने स्थापन होत असलेल्या संस्थेचे ते संस्थापक सदस्य होते. त्यांच्या अनेकविध तंत्रांनी त्यांनी बँकिंग क्षेत्रातील "निवड आणि प्रशिक्षण घटकांमध्ये" क्रांतीच घडवली. जगातील अनेक विकसनशील देशांना त्यांनी आपल्या या क्षेत्रातील ज्ञानाचा लाभ करून दिला.

वयाच्या पासष्टीनंतर मात्र त्यांनी "नारायण आश्रम" (Society for Rural Reconstruction and Education) या संस्थेची स्थापना करून सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४ क्षेत्रात (शिक्षण, आरोग्य, जलसंधारण आणि महिला सबलीकरण) परिणामकारक कार्य केले, अनेक कार्यकर्ते तयार केले. त्यांच्या कार्याच्या विविध पैलूंवर अनेक नामवंत याच सदरात पुढील ११ महिन्यांच्या पहिल्या साप्ताहिक अंकात आपले मनोगत व्यक्त करतील.

त्यांच्या या प्रेरणादायी जन्मशताब्दीनिमित्त मनःपूर्वक अभिवादन!

डॉ. वसुधा कामत
पूर्व कुलगुरू, श्रीम.ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठ,
सदस्य, राष्ट्रीय शिक्षण धोरण मसुदा समिती

MKCL
www.mkcl.org
MS-CIT
mscit.mkcl.org
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
klic.mkcl.org
iLike
ilike.mkcl.org

संस्थापक-संपादक
स्मृतिशेष विद्या बाळ

संपादक : गीताली वि. मं.

संपादन साहाय्य : पूनम बा. मं.

व्यवस्थापकीय सल्लागार :
स्मिता हेमलता

कार्यालयीन साहाय्य :
पूर्वा भिंगे, उषा चव्हाण

मुखपृष्ठ छायाचित्रं
अनिकेत उपशम

मुखपृष्ठ मांडणी :
राजू देशपांडे

अंक जुळणी-अंक मांडणी :
सारद मजकूर, पुणे

आतील सुलेखन व चित्रं :
गिरीश सहस्त्रबुद्धे,
कमलाकर पाटील आणि
इंटरनेटवरून साभार

मुद्रितशोधन : हृषीकेश पाळंदे आणि सान्याजणी

सल्लागार : दीपा देशमुख,
जमीर कांबळे

कार्यालयीन पत्ता :
फ्लॅट नं. १०१, पहिला मजला,
नचिकेत को-ऑप. हौ. सोसायटी,
प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४,
एरंडवणा, पुणे ४११००४

कार्यालयीन संपर्क :
८००७८१४००५

वर्गणीसाठी संपर्क:
saryajani@gmail.com

साहित्य पाठवण्यासाठी :
milunsaryajani@gmail.com
(कृपया, या नव्या
बदलाची नोंद घ्याल.)

कार्यालयीन वेळ :
सोम. ते शुक्र. दुपारी १२ ते ५

वार्षिक वर्गणी :
व्यक्तीसाठी ५०० रु.
संस्थेसाठी ७०० रु.
(अधिक तपशील पान क्र. २५ वर)

पानोपानी : जून २०२५

मिळून साऱ्याजणी

www.miloonsaryajani.in | आरंभ-ऑगस्ट १९८९

४ **शांतिसंवाद** \ गीताली

१३ **माध्यमांतर... \गट्टी शब्दांची**
डोळा लवणे \ डॉ. नीलिमा गुंडी

२० **एकेक दीप विझू विझू...**
विनोबांच्या मानसकन्या: कालिंदीताई
सुभाष पाटील

२२ **पुस्तकांच्या मनात... \ पुरुषभान जागवताना... ** भारतीय पुरुषत्वाचा समाजशास्त्रीय धांडोळा
मंगेश कुलकर्णी

२८ **विशेष ओळख ** ध्येयवेड्या डॉक्टरची वाटचाल \ मुक्ता मनोहर

३२ **गंगू बोहारीण** \ चिंतामणी प्रभाकर मुळे

३६ **रेऊ कथा स्पर्धा २०२४ / पारितोषिक प्राप्त कथा** (विज्ञान कथा) : 2050 AD एक गोष्ट सोडून... \ डॉ. अभिराम दीक्षित

४० **कविता ** नीलिमा रवि, प्रा. डॉ . चित्रा गोस्वामी

४१ **काळोखाच्या वाटेवरची उजेडाची फुले... **
अपंगत्व आणि आपण : समजून घेण्याचा आणि समावेशकतेकडे वाटचाल करण्याचा प्रवास
नितीन जाधव, दिक्षा दिंडे, सत्यजित सीमा संजय

४२ **माध्यमांतर... \ भीमा तुझ्या मताचे...!**
भीमराज की बेटी : पंचशीला भालेराव
केशव वाघमारे

४६ **मुक्तिवेध : शरद् पाटील जन्मशताब्दी लेखमाला ** निर्ऋति – ४
दिलीप चव्हाण

४८ **संवाद - स्पंदनं... चलो मुंबई...**
महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद \ अमोल केरकर

५ जून पर्यावरण दिनानिमित्त

८ **सफर मुंग्यांच्या विश्वाची** \ नूतन कर्णिक
मुलाखतकार : शुभदा चंद्रचूड

१२ **स्वप्नातला गालिचा आणि गगनजाई**
डॉ. सौदामिनी लिमये

विद्या बाळ अध्यासन प्रकल्प - २

६ **द कोड ब्रेकर्स : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्त्री संशोधक** \ १९७५-१९८५
पहिले नमन! सर्च इंजिन अल्गोरिदम आणि स्वयंचलित कार आणि रोबोट्स यांचा सैद्धांतिक पाया रचणाऱ्या महिला संशोधक (भाग १) \ चिन्मय गवाणकर

१४ **निर्भयतेसाठी संवाद, सहकार्य आणि समावेशकता (२०१५-२०२५) : भाग ४**
अरुणा बुरटे

१८ **स्त्री चळवळ आणि माझी कविता**
आसावरी काकडे

२४ **मानसशास्त्र : विचार, व्यवहार आणि स्त्रीचळवळ – समारोप लेख ५**
डॉ. साधना नातू

५२ **जागतिक स्त्रीवादी चळवळ**
लष्कर दलातील लैंगिक छळकथा
वृषाली मगदूम

४९ **काफिला... ** शहादा, धुळे
रोहिणी भट-साहनी

५४ **विरासत - पुष्प पाच ** मिरचीचा प्रवास
सुगंधा जोहर

५८ **प्रतिनिधी यादी**

निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीचे मिळून साऱ्याजणी मासिक मुद्रक, प्रकाशक गीताली वि. मं. यांनी युनिक ऑफसेट, १५२३, सदाशिव पेठ, आनंदशिल्प, पुणे ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, नचिकेत को–ऑप. हौ. सोसायटी, प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४, एरंडवणा, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : गीताली वि. मं.**

'MiloonSaryajani' Monthly is owned by Niramaya Public Charitable Trust, Printed and Published by Geetali V. M., Printed at Unique Offset, 1523, Sadashiv Peth, Anandshilp, Pune 411030 and Published at Flat No.101, 1st floor, Nachiket CHS, Prabhat Road, Lane No.4, Erandawana, Pune 411004. **Editor - Geetali V. M.**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

शांतिसंवाद

प्रिय वाचक,

सबरंगी जयभीम! ५ जून पर्यावरण दिनानिमित्त अनंत शुभेच्छा!

निसर्गाच्या निर्मळतेला विकासाच्या नावाखाली प्रदूषणाच्या विळख्यात अडकवण्यात माणूस यशस्वी झाला आहे. त्यामुळे आपले विचारही प्रदूषित झाले आहेत का? आपली मन:शांती लोप पावते आहे का? स्वतःच्याच मुळांना उद्ध्वस्त करत माणूस विकासाच्या नावाखाली अविवेकी होत कुठे चालला आहे? माणूसही निसर्गाचा एकात्म भाग आहे हे विसरून त्याच्यावर विजय मिळवण्याच्या भ्रमात आपण काय काय अनर्थ करत आहोत? इत्यादी इत्यादी महत्त्वाचे प्रश्न पर्यावरण दिनानिमित्त आपण स्वतःला विचारत पर्यावरण रक्षणा साठी आपण सर्वांनी मिळून काय काय करायचं याचा विचार करू या ना? निसर्ग आणि मानवाचं असणारं गहिरं नातं समजावून देण्याचा प्रयत्न करणारं The...Other World हे नाटक आपल्याला यासाठी मदतीचा हात देईल असा विश्वास वाटतो.

मानवी मूल्यांशी नातं सांगत एक वेगळी नाट्यदृष्टी देणारी रंग चळवळ म्हणजे थेटर ऑफ रिलेवन्स! गेली ३३ वर्ष या सिद्धांताचे जनक मंजुल भारद्वाज आणि त्यांचे सहकारी अश्विनी नांदेडकर, सायली पावसकर, तुषार मस्के, कोमल खामकर आणि सतत येत राहणारे नवनवीन कार्यकर्ते कलाकार हे सर्व मिळून कोणत्याही स्पॉन्सरशिप, फंडिंग किंवा अनुदानाशिवाय केवळ प्रेक्षकांच्या बळावर नाट्यकलेतून जनमानसात चेतना जागवत आहेत. समाज, पर्यावरण, गरिबी, वर्णव्यवस्था, जेंडर यासंदर्भात या रंगचळवळीने आपल्या विविध नाटकातून विचार मांडले आहेत. राजकीय सत्तेप्रमाणे सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक सत्ता असतात असं सांगत थिएटर हे मानवतेच्या कल्याणाचं तत्त्वज्ञान आहे आणि हे कोणत्याही सत्तेच्या वर्चस्वाखाली नाही. त्यामुळे प्रत्येक सत्तेला ते आरसा दाखवण्याचं काम करत आहे. सर्जनशील नाट्य म्हणजे एक संवाद आहे दृष्टी, यथार्थ आणि सत्याचा! साऱ्याजणीशी नाळेचं नातं असणाऱ्या या रंग आंदोलनात आपणही सहभागी व्हावं असं वाटतं.

पर्यावरण विनाशाचा सर्वोच्च वाईट, दुष्ट आणि क्रूर आविष्कार म्हणजे दहशतवाद आणि युद्ध! यामध्ये निसर्ग उद्ध्वस्त करत मानवी जीवनाचाही विनाश होतो. यात बायका मुलांची अपरिमित हानी होते. स्त्री चळवळ म्हणूनच सतत युद्ध नको शांति हवी असं म्हणत असते. आणि... शांतीसाठी बुद्ध हवा.

बुद्धाचं तत्त्वज्ञान म्हणजे शांतपणे पण ठामपणे अन्यायाला विरोध करणं आणि समतेसाठी लढणं. बुद्धमूर्ती केवळ धार्मिक नाही तर सामाजिक न्याय आणि समतेची ती प्रेरणा आहे. बुद्ध हा ईश्वर नाही तर वैश्विक ज्ञानाचं प्रतिक आहे. बुद्धाचा धम्म केवळ एका व्यक्तीचं, एका समूहाचं किंवा एका देशाचं कल्याण करत नाही तर बुद्धाचा धम्म जगाची पुनर्रचना करू शकतो. त्यासाठी विश्वबंधुत्व, समता व मानवी स्वातंत्र्य, एकमेकांविषयी प्रेम, करुणा आदी भावना हव्यात. आणि .. मानवाच्या कल्याणासाठी ही हितकारक गुणतत्त्व जोपासत विज्ञाननिष्ठ, तर्कशुद्ध, निर्भीड व विशुद्ध जीवन जगण्याचा मार्ग बुद्ध दाखवतो. धम्म हा जीवनाच्या विविध अंगी पैलूंना स्पर्श करणारा असतो. तो केवळ वैयक्तिक कल्याण नसून इतर सर्व मानवाला हितकारक व लाभदायी ठरणारा असतो. जसे बोलतो तसेच आचरण करतो तो तथागत! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते तथागत हे मानवी मनाचे दुःख शोधणारे महान डॉक्टर आहेत. पण त्याचबरोबर ते विषमतेचे विरोधक आहेत, त्यांची विषमता निर्मूलनाची चळवळ म्हणजेच त्यांचा धम्म. मन घडवतं तसा मनुष्य होतो. कोणतंही चांगलं किंवा वाईट काम करायचं असल्यास प्रथम त्याचा उगम मनात होतो म्हणूनच मनाची मशागत चांगले संस्कार करत करणं फार गरजेचं आहे. त्यासाठी ध्यान, निसर्ग आणि कला, कल्याण मित्रता हे तीन महत्त्वाचे मार्ग आहेत. कल्याण मित्रता म्हणजे... योग्य माणसांच्या संपर्कात राहून त्यांच्याशी मित्रता साधली पाहिजे. कारण माणूस संगतीमुळे घडत असतो. योग्य आचरणशील अनुभवी माणसांच्या संपर्कात राहून त्याचा विकास होतो. आज जगभरच माणसांच्या मनाचे आजार, दुःख चिंताजनक पातळीवर गेलं आहे हे जाणून शस्त्राला अधिक बलवान शस्त्रास्त्रे हे उत्तर नसून ढाल हे अधिक चांगलं उत्तर आहे हे लक्षात घेऊन अहिंसेचा पुरस्कार करत युद्ध आणि विनाश टाळू या.

पहेलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्या निष्पाप लोकांच्या स्मृतीला अभिवादन! त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात साऱ्याजणी सहभागी आहे. दहशतवाद्यांना कठोर शिक्षा व्हायलाच हवी. मात्र त्यात सूड, बदला घेण्यासाठी युद्धाग्नी उन्मादी पद्धतीनं भडकवण्याचं राजकारण केलं जाऊ नये याची खबरदारी आपल्या

सारख्या सुजाण नागरिकांनी घ्यावी अशी साऱ्याजणीची भूमिका आहे.

पहेलगाम हल्ल्यातल्या पीडितांना न्याय देण्यासाठी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून ठोस पावलं कशी उचलली गेली याची माहिती अत्यंत संयतपणे विंग कमांडर व्योमिका सिंह आणि लेफ्टनंट कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली. फ्लाईंग शाखेत कायमस्वरूपी कमिशन मिळवलेल्या व्योमिका यांना कठीण प्रदेशात उड्डाण करण्याचा मोठा अनुभव आहे. त्यांनी २५०० तासाहून अधिक काळ उड्डाण केलं आहे. तसंच सोफिया कुरेशी या लष्कराच्या सिग्नल कॉर्प्सच्या अधिकारी आहेत. काँगोमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेत त्यांनी काम केलं आहे. तसेच बहुराष्ट्रीय लष्करी सरावात भारतीय लष्कराच्या तुकडीचे नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला अधिकारी आहेत. या दोन्ही रणरागिणींनी दहशतवादी हल्ला आणि धर्मांधतेतून मुस्लिमांचा द्वेष विखार करुन सामाजिक तेढ वाढवून समाज स्वास्थ्य बिघडवलं जाऊ नये असा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संदेश दिला ही दिलासा देणारी बाब आहे. त्या दोघींचा साऱ्याजणीला अभिमान वाटतो.

दहशतवादी हल्ल्यानंतर देशामध्ये पराकोटीचा तणाव निर्माण झालेला असताना प्रसार माध्यमांची भूमिका अधिकच महत्त्वाची असते. या काळात पत्रकारितेची मूलभूत तत्त्व अवलंबावी लागतात. कोणत्याही कठीण परिस्थितीमध्ये काम करताना पत्रकारांची जास्त जबाबदारी असते. मात्र सध्या युद्धामध्ये ज्यांचं घर जळणार नाही, घरात येणारं अन्न, पाणी आणि वीज थांबणार नाही अशा प्रेक्षकांकरता युद्धासारख्या गंभीर गोष्टीला स्वस्तातलं मनोरंजन बनवणारी आजची पत्रकारिता झाली आहे का? असं अनेक वृत्तवाहिन्या बघताना वाटतं. गेल्या काही वर्षांमध्ये प्रसार माध्यमांनी पत्रकारांना युद्धाचे चीअर लीडर्स केले आहे का असाही उद्वेगजनक प्रश्न पडतो. समाज माध्यमांवर तर उन्मादी युद्धज्वर पेटून अफवांचा धुमाकूळ चालू आहे. हे सर्व थांबवायलाच हवं आहे ना? त्यासाठी आपण सक्रिय होऊ या. आपल्या प्रमाणेच अमेरिकेतही खोटं बोलणं, मतलबी बातम्या तयार करणे, बनावट व्हिडिओ प्रसारित करणे, इंटरनेट, मोबाईल, समाज माध्यमात वृत्तवाहिन्यातून द्वेषमूलक विखारी मजकूर पसरवणं यांची लाट आहे. पण तिथे या सर्व घटकांशी सजग पत्रकारिता लढतही आहे. नुकत्यातच काही युद्धविरोधी विचारांच्या वार्तांकनासाठी आणि युद्धाच्या बातम्या उन्मादाकडे न झुकता संवेदनशीलतेनी हाताळण्यासाठी पत्रकारितेतील परमोच्च समजली जाणारी पुलित्झर पारितोषिकं जाहीर केली गेली. इलोन मस्क यांची राजकारण्यांशी सलगी आणि हस्तक्षेप यांचे तपशील वृत्तमालिकातून झळकविल्याबद्दल द वॉल स्ट्रीट जर्नलच्या बातमीदारांना, गर्भपात कायद्यामुळे झालेल्या दिरंगाईत एका गर्भवती मातेच्या मृत्यूबद्दल केलेल्या बातमी मालिकेबाबत प्रो पब्लिक या वृत्तपत्राला, शोध पत्रकारितेसाठी रॉयटर्सच्या पत्रकारांना, ट्रम्प यांच्यावरील हल्ल्याबाबतच्या सखोल वृतांकनासाठी वॉशिंग्टन पोस्टच्या पत्रकारांना पुलित्झर पारितोषिकानं गौरविण्यात आलं आहे. सत्य आणि तथ्य मांडण्यात कुचराई न करणाऱ्या पत्रकारितेला सन्मानित केलं आहे ही अत्यंत दिलासा देणारी बाब आहे. त्यांचं अभिनंदन! भारतात अशाप्रकारे सच्चा पत्रकार निर्भीडपणे पुरेसा गौरवला जातो आहे का असा प्रश्न मनात उभा राहतो.

आगामी जनगणना जातनिहाय होईल अशी घोषणा सरकारनं केली आहे; या जनगणनेत फक्त जातींची जनसंख्या मोजून जातीय राजकारण यातून बळकट न करता प्रत्येक जातीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि पेशाचे आकडे मोजले पाहिजेत. त्यानंतर संसाधन आणि सामाजिक सत्तासंबंधांच्या फेरवाटप, फेरमांडणीचा प्रश्न प्राधान्यानं उचलला गेला तरच सामाजिक न्याय या जातीनिहाय जनगणनेतून मिळेल हे लक्षात घ्यायला हवं .

मिळून साऱ्याजणी मासिकाच्या जन्मापासून आश्वस्त सोबत देणारे साऱ्याजणीचे निरागस स्नेही माधव वझे यांचं दुःखद निधन झालं. बालपणी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त श्यामची आई या सिनेमात चितारलेल्या साने गुरुजींचा अंश पुढेही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सतत डोकावत राहिला. नाटकावर जीवापाड प्रेम करणाऱ्या ज्येष्ठ रंगकर्मी, अभिनेता, दिग्दर्शक आणि समीक्षक अशी ओळख असणाऱ्या माधव वझे यांनी जागर संस्थेच्या माध्यमातून असंख्य नाट्य शिबीरं घेतली. अनेक दशकं संयत शब्दात केलेल्या अतिशय परखड नाट्य समीक्षेतलं त्यांचं सातत्य, विश्वासार्हता आणि वाचनीयता ही त्यांची खासियत होती. आंतरराष्ट्रीय नाट्य समीक्षक संघाचे ते सन्माननीय सदस्य होते. गोवा कला अकादमीच्या नाट्य विभागात त्यांनी अभ्यागत प्राध्यापक म्हणूनही काम केलं. इंग्रजीचे प्राध्यापक असणाऱ्या या नाट्यकर्मीच्या राजा इडिपस, हॅम्लेट इत्यादी नाटकातून त्यांच्या अभिजात वैश्विक नाटकांविषयीची आस्था ठळकपणे अधोरेखित होत होती. त्यांची रंगमुद्रा, श्यामची आई, आचार्य अत्रे आणि मी, समांतर रंगभूमी: अल्याड पल्याड, प्रायोगिक रंगभूमी: तीन अंक आदी पुस्तकांचं चांगलं स्वागत झालं होतं. मिळून साऱ्याजणीच्या सावित्री जोतिबा समता उत्सवात आयोजिलेल्या नाट्याविष्कार स्पर्धेच्या आयोजनात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यावेळी नाटकाविषयी अभिनय, दिग्दर्शन आणि महाविद्यालयीन तरुणांचा सहभाग या विषयीचं त्यांचं बोलणं ऐकणं हा समृद्ध करणारा अनुभव होता. रंगभूमीचा हा जागल्या आज आपल्यात नाही. त्यांच्या प्रेमळ स्मृतीला साऱ्याजणीचा अखेरचा सलाम!

सत्य, शांति अहिंसा की जय हो! जय जगत!!

गीताली

१८/५/२०२५

सर्च इंजिन अल्गोरिदम आणि स्वयंचलित कार आणि रोबोट्स यांचा सैद्धांतिक पाया रचणाऱ्या महिला संशोधक १९७५-१९८५ (भाग १)

चिन्मय गवाणकर

चिन्मय गवाणकर हे जागतिक व्यवसाय सल्लागार संस्था अर्न्स्ट अँड यंगचे भागीदार आहेत. त्यांना क्लाउड, बिग डेटा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, अॅडव्हान्स अॅनालीटीक्स या क्षेत्रात मोठ्या उद्योगांना तसंच देशभरातील उदयोन्मुख व्यवसायांना सल्ला देण्याचा २४ वर्षांहून अधिक काळ वैविध्यपूर्ण अनुभव आहे. सध्या त्यांनी वेगानं बदलत असलेलं कृत्रिम बुद्धिमत्तेचं क्षेत्र सोप्या शब्दात मराठीमध्ये समजावून देण्याचे व्रत घेतलं आहे. आजही पुरुषप्रधान असणाऱ्या तंत्रज्ञानाच्या जगात अज्ञात राहिलेल्या या क्षेत्रातल्या महिला संशोधकांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या अभ्यासकानं घेतलेला धांडोळा या लेखमालेतून भेटीला येत आहे.

डार्टमाउथ येथे १९५६ मध्ये झालेल्या परिषदेत जॉन मॅकार्थी, मार्विन मिन्स्की, नॅथनियल रोचेस्टर आणि क्लॉड शॅनन यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची (AI) कल्पना प्रथम जगापुढे मांडली. या परिषदेत, AI च्या भविष्याबद्दल अनेक आशा व्यक्त केल्या गेल्या. तेव्हापासून ते सध्याच्या 'चॅट जीपीटी' युगापर्यंत या क्षेत्राने अनेक चढ-उतार पाहिले आहेत. सुरुवातीच्या काळात, AI मध्ये प्रचंड उत्साह होता, परंतु लवकरच तेथील मर्यादा स्पष्ट झाल्या. १९६० च्या दशकात, AI संशोधनात घट झाली कारण संगणक तंत्रज्ञान अजून पुरेसे प्रगत नव्हते, परंतु १९७० च्या दशकात, नवीन कल्पना आणि तंत्रज्ञानामुळे पुन्हा एकदा AI मध्ये रस वाढला. या काळात, महिला शास्त्रज्ञांना AI क्षेत्रात प्रवेश करणे आणि योगदान देणे खूप कठीण होते. पुरुषप्रधान समाजात, त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

परंतु इतिहास आज आपल्याला सांगतो की अगदी ७० च्या दशकापासून ते आजपर्यंत या क्षेत्राच्या प्रगतीसाठी बऱ्याच महिला संशोधकांनी सुद्धा महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. परंतु त्यांना त्यांच्या कामासाठी योग्य मान्यता मिळवणे त्या काळी खूप कठीण होते आणि आजही काही प्रमाणात आहे. तंत्रज्ञानाचे जग आजही पुरुषप्रधान आहे. म्हणूनच आपण या आपल्या लेखमालेत अशा अज्ञात नायिकांच्या कथा जाणून घेणार आहोत, ज्यांनी गेल्या अर्ध शतकात AI च्या विकासाला नवी दिशा दिली!

आपण लेखमालेला सुरुवात करू या १९७० च्या दशकापासून! आपण आज सहजपणे माहिती 'गुगल' म्हणजे सर्च करतो किंवा मोबाईल फोनबरोबर मराठीमध्ये 'बोलतो', काही देशात सेल्फ ड्रायविंग कार्स म्हणजे ड्राइवरशिवाय चालणाऱ्या मोटारी सुद्धा अवतरल्या आहेत! पण या प्रगतीमागे दोन महिला शास्त्रज्ञांनी १९७० च्या दशकात केलेलं महत्त्वपूर्ण संशोधन आहे याची आपल्यापैकी बऱ्याच जणांना माहिती नसेल!

१९७० च्या दशकात, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) क्षेत्रात एक नवीन पहाट उगवत होती. संगणक विज्ञानाच्या या सुरुवातीच्या काळात, पुरुषांचा दबदबा होता आणि महिला शास्त्रज्ञांना त्यांच्या कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. या काळात, कॅरेन स्पार्क जोन्स आणि डॉ. रुझीने बायची यासारख्या महिलांनी त्यांच्या अद्वितीय कल्पना आणि कार्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासाला नवी दिशा दिली.

आपली आजची पहिली नायिका आहे : कॅरेन स्पार्क जोन्स :

जिला माहिती पुनर्प्राप्तीची 'जननी' असे म्हटले जाते. कॅरेनच्या संशोधनामुळे गुगल सर्च इंजिनसारखे तंत्रज्ञान आज उभे राहिले! कॅरेन ने १९७२ मध्ये इन्व्हर्स डॉक्युमेंट फ्रिक्वेन्सी (IDF)चा शोध लावला, जो आधुनिक शोध इंजिनचा पाया मानला जातो. गुगलचे सहसंस्थापक लॅरी पेज यांनी सुद्धा जाहीरपणे स्वीकारले आहे की आम्ही कॅरेनच्या मूलभूत संशोधनाशिवाय गुगलची कल्पना सुद्धा करू शकत नव्हतो. पण या समाजमान्यतेची मोहोर कॅरेनला तिच्या आयुष्यात कधीच मिळाली नाही. तिच्या मृत्यूपर्यंत म्हणजे अगदी

२००७ सालापर्यंत, तिचे हे योगदान अधिकांश लोकांना अज्ञातच होते. तिच्यावरचा एक दुर्दैवी अन्याय म्हणजे, तिचा डॉक्टरेटचा प्रबंध सुद्धा ७० च्या दशकात केम्ब्रिज विद्यापीठाने खूप सपक आणि स्वतःचा काही नवीन विचार नसलेला म्हणून नाकारला ज्यामुळे हयात असेपर्यंत कॅरेनला डॉक्टरेट काही मिळाली नाही. पण हाच प्रबंध नंतर एका पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध करण्यात आला!

कॅरेनचा जन्म १९३५ मध्ये इंग्लंडच्या यॉर्कशायर परगण्यातील एका छोट्याशा गावात झाला. तिचे वडील रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते, आणि त्यांची मुलगी असल्याने कॅरेनला विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे बाळकडू घरातच मिळाले. परंतु १९५०च्या दशकात, विज्ञान आणि त्यातही त्या काळी नवीनच जन्माला येणारे संगणक विज्ञान हे पुरुषांचे क्षेत्र समजले जात होते. कॅरेनने त्या वेळच्या सामाजिक मान्यता बाजूला ठेवून त्यांचे स्नातक आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. १९६० मध्ये, त्यांनी कॅम्ब्रिजमध्ये भाषाशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतले, ज्यातून त्यांचा आधुनिक AI शी संबंध जोडला.

आता आपण त्यांच्या संशोधनाबद्दल जाणून घेऊ या. IDF म्हणजे काय? साध्या भाषेत: समजा, तुम्ही एका मोठ्या पुस्तकातून काही माहिती शोधत आहात. जर तुम्ही 'आणि' सारखा शब्द शोधलात, तर तो शब्द पुस्तकात अनेक ठिकाणी असेल. त्यामुळे, तो शब्द तुम्हाला हवी असलेली माहिती शोधण्यात फारसा उपयुक्त नाही. परंतु, जर तुम्ही 'क्वांटम मेकॅनिक्स' सारखा शब्द शोधलात, तर तो शब्द पुस्तकात कमी ठिकाणी असेल. त्यामुळे, तो शब्द तुम्हाला हवी असलेली माहिती शोधण्यात अधिक उपयुक्त आहे. IDF हे तंत्रज्ञान संगणकाला हेच शिकवते. ते संगणकाला सांगते, की कोणते शब्द महत्त्वाचे आहेत आणि कोणते शब्द महत्त्वाचे नाहीत. यामुळे, सर्चइंजिन वापरकर्त्यांना अधिक अचूक आणि संबंधित परिणाम देऊ शकते.

कॅरेन स्पार्क जोन्स हिच्या कामाला सुरुवातीला खूप सैद्धांतिक म्हणून नाकारण्यात आले, परंतु नंतर ते गुगलच्या पेज रँकचा आधार बनले. "संगणक क्षेत्र इतके महत्त्वाचे आहे की ते फक्त पुरुषांसाठी सोडणे योग्य नाही", हे तिचे प्रसिद्ध वाक्य, तिच्या संघर्षाचे आणि दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. तिने नैसर्गिक भाषा प्रक्रियेत (NLP) देखील महत्त्वपूर्ण योगदान दिले, ज्यामुळे संगणकाला मानवी भाषा समजणे आणि त्यावर प्रक्रिया करणे शक्य झाले. तिने पुढे जाऊन १९८० च्या दशकांत पर्यायी शब्द आणि अर्थानुसार वर्गीकरण या विषयावर महत्त्वपूर्ण संशोधन केले, ज्यामुळे माहिती पुनर्प्राप्ती तंत्रज्ञानात सुधारणा झाली.

कॅरेनच्या पायाभूत कामाला मान्यता मिळण्यासाठी तिला अनेक वर्षे वाट पाहावी लागली, परंतु तिने कधीही हार मानली नाही. तिच्या शाश्वत संशोधक वृत्तीमुळे आणि जिद्दीमुळेच आज आपण आधुनिक सर्च इंजिनचा वापर करू शकतो.

इकडे इंग्लंडमध्ये केम्ब्रिज विद्यापीठात कॅरेन आपले संशोधन करत असताना त्याच वेळी दूर अमेरिकेत स्टॅनफर्ड विद्यापीठात आपल्या या गोष्टींमधील दुसरी नायिका असलेली रुझीने बायची नावाची एक अनाथ ज्यू विद्यार्थिनी आपले दुसऱ्या पी.एचडी.चे संशोधन पूर्ण करत होती. जिच्या महत्त्वपूर्ण संशोधनातून आजच्या स्वयंचलित रोबो आणि सेल्फ ड्रायविंग कार्सचा पाय रचला जाणार होता.

रुझीनेचा जन्म २८ मे १९३३ रोजी ब्रातिस्लाव्हा, चेकोस्लोव्हाकिया (आजच्या स्लोव्हाकियामध्ये) एका ज्यू कुटुंबात झाला. तिचे वडील सिव्हिल इंजिनियर म्हणून काम करत असल्याने त्यांचे कुटुंब सुरुवातीला नाझी छळछावणीतून वाचले, परंतु त्यांच्या जवळच्या नातेवाईकांपैकी बहुतेक जण १९४४ च्या उत्तरार्धात नाझींनी मारले. रुझीने आणि तिची बहीण यांना रेड क्रॉसने अनाथ म्हणून मदत केली; दोघी बहिणींचे नंतर अनाथालये आणि पालकत्वात पालनपोषण झाले. युद्धानंतर चेकोस्लोव्हाकियामध्ये कम्युनिस्ट राजवटीत राहणे हे अतिरिक्त आव्हानात्मक होते, कारण उच्च शिक्षण आणि व्यावसायिक संधींमध्ये प्रवेश अनेकदा राजकीय संलग्नतेनुसार ठरवला जात असे. गणितातील एक हुशार विद्यार्थिनी असल्याने, रुझीने त्याच्या तार्किक संरचनेकडे आणि समस्या सोडवण्याच्या स्वभावाकडे आकर्षित झाली. तथापि, तिने स्लोव्हाक युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आणि आपली पहिली डॉक्टरेट मिळवली, कारण त्या वेळी गणितामध्ये करिअर करणे म्हणजे प्रामुख्याने अध्यापन पदाकडे नेणे, ज्यासाठी मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीसाठी बांधिलकी आवश्यक होती, जी तिला मान्य नव्हती. पद्धतशीर अडथळे असूनही, रुझीने अभियांत्रिकी क्षेत्रातील लिंगभेद आणि राजकीय दबाव दोन्ही हाताळत अभ्यासात उत्कृष्ट कामगिरी केली. पुढे अमेरिकेत जाऊन स्टॅनफर्ड विद्यापीठातून तिने कॉम्प्युटर सायन्समध्ये आपली दुसरी डॉक्टरेट मिळविली! यंत्रांना (म्हणजे आजचे रोबोट्स!) त्यांच्या सभोवतालचे वातावरण कसे 'समजावता' येईल आणि त्यांना त्याचा अर्थ लावणे जमेल या आव्हानामध्ये तिला अधिक रस निर्माण झाला, ज्याचा रोबोटिक्सपासून वैद्यकीय इमेजिंगपर्यंतच्या क्षेत्रांवर मोठा परिणाम झाला.

त्या वेळी, सुरुवातीच्या संगणक दृष्टी प्रणाली 'निष्क्रिय प्रतिमा प्रक्रिया' पद्धतींमुळे संघर्ष करत होत्या, ज्यामुळे त्या वास्तविक-जगातील अनुप्रयोगांसाठी अप्रभावी ठरल्या. रुझीने ओळखले की मानवी आकलन मुलतः सक्रिय आहे, म्हणजे लोक हलतात, त्यांचे दृष्टिकोन समायोजित करतात आणि **(पान २१ वर)**

५ जून पर्यावरण दिनानिमित्त...

सफर मुंग्यांच्या विश्वाची

नूतन कर्णिक : मुलाखतकार - शुभदा चंद्रचूड

'मित्र किडा फौंडेशन फॉर इन्सेक्ट रिसर्च अँड कॉंझरवेशन' या संस्थेच्या संस्थापक, संचालक नूतन कर्णिक यांचा मुंग्या हाच अभ्यासविषय आहे. पुणे विद्यापीठातून जीवशास्त्र विषयामध्ये एम. एस्सी. केल्यानंतर त्यांनी बेंगळुरु येथील भारतीय विज्ञान संस्थेत (IISC) मुंग्यांमधील सामाजिक व्यवस्था, त्यांचे स्वभाव आणि त्यांचे परस्परांमधील संबंध या विषयावर अनेक वर्षं अभ्यास संशोधन केलं आहे. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्तानं पृथ्वीतलाच्या पर्यावरणरक्षणात मोलाचा वाटा असणाऱ्या मुंग्याविषयी नूतन यांच्याशी लेखिकेनं केलेल्या बातचितीचा हा गोषवारा.

'मूर्ती लहान पण कार्य महान' असंच जिचं वर्णन केलं जाईल ती मुंगी आपल्या पृथ्वीतलावर जवळजवळ दीडशे दशलक्ष वर्षांपूर्वी अवतरली. शंभर दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीवर जसजशी फुलझाडं आणि फळझाडं उगवू लागली तसतशी मुंग्यांची संख्या भरमसाठ वाढू लागली. नंतरच्या अनेक कालखंडात पृथ्वीवरच्या अनेक भौगोलिक उलथापालथींनंतरही मुंग्यांनी त्यांचं अस्तित्व चिवटपणे टिकवून ठेवलं. आश्चर्य वाटेल पण आज जगभरात मुंग्यांच्या साडेबारा हजार प्रजाती शास्त्रज्ञांनी शोधून काढल्या आहेत आणि अजून जवळजवळ दहा हजार प्रजातींचा शोध लागणं बाकी आहे असा शास्त्रज्ञांना अंदाज आहे. अशा रितीने आज अंटार्क्टिका वगळता जगभरात सर्वत्र या सहा पायांच्या कामसू कीटकांचा संचार आहे.

त्यांच्या छोट्याशा आकारामुळे आपल्याला जाणीव नाही, पण मुंग्या या जगातल्या सर्वाधिक कार्यमग्न असणाऱ्या कीटकांपैकी एक आहेत. मुंग्यांच्या जमिनीखालच्या काटेकोरपणे नियोजनबद्ध रितीने उभारलेल्या वस्त्या, त्यांची समूहाने एकजूटीने काम करण्याची वृत्ती, त्यांची शिस्तबद्धता या सगळ्या वैशिष्ट्यांमुळे मुंग्या कायमच जगभरातल्या शास्त्रज्ञांच्या कुतूहलाचा आणि संशोधनाचा विषय ठरल्या आहेत.

'मित्र किडा फौंडेशन फॉर इन्सेक्ट रिसर्च अँड कॉंझरवेशन' या संस्थेच्या संस्थापक, संचालक नूतन कर्णिक यांचा मुंग्या हाच अभ्यासविषय आहे. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने पृथ्वीतलाच्या पर्यावरण रक्षणात मोलाचा वाटा उचलणाऱ्या विश्वाविषयी नूतन यांच्याकडून जाणून घेणं औचित्यपूर्ण ठरेल.

माझा जन्म आणि शिक्षण पुण्यामध्येच झालं. माझी आई बँक मॅनेजर होती, तर वडिलांचा केमिकल बिझिनेस होता. लहान बहीण गणितज्ज्ञ आहे. जरी आई-वडील व्यवसायात गुंतलेले होते तरीही त्यांनी आम्हाला अभ्यासाव्यतिरिक्त इतर छंद जोपासण्याला नेहमीच प्रोत्साहन दिलं. माझ्या निसर्गनिरीक्षणाच्या आवडीला माझ्या आईने जोपासलं. सुरुवातीला पक्षीतज्ज्ञ श्री. किरण पुरंदरे यांच्याबरोबर मी निसर्गाचा अभ्यास केला. त्यांच्यासोबत खूप शिकायला मिळालं. मग हळूहळू लोकांना निसर्ग शिबिरांमधून माहिती देऊ लागले आणि निसर्ग अभ्यासाची माझी ओढ वाढली. मी एम. एस्सी. करत असताना मला खूप इच्छा होती की प्राण्यांचा शास्त्रीय अभ्यास करावा. या क्षेत्रामध्ये खूप संधी उपलब्ध होत्या. अशातच बंगलोरच्या भारतीय विज्ञान संस्थेमध्ये (IISC) पर्यावरण क्षेत्रात नावाजलेल्या 'सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस' या डिपार्टमेंटमध्ये प्रोफेसर राघवेंद्र गदगकर यांच्या प्रयोगशाळेत सामाजिक कीटकांवर (मुंग्या, मधमाशा, गांधीलमाशा) संशोधन करण्याची संधी मिळाली आणि मला कीटकही आवडत असल्याने मी लगेच ती घेतली. IISC मध्ये मी सुरुवातीला गांधीलमाशांमधली समाजव्यवस्था कशी असते याचा चार वर्षे अभ्यास केला. त्यांची निरीक्षणं घेत असताना कधीतरी त्यांचा डंखही व्हायचा आणि मला त्या डंखाची ॲलर्जी यायला सुरुवात झाली. यावर तोडगा म्हणून प्रोफेसर गदगकरांनी सुचवल्याप्रमाणे मी मुंग्यांचा अभ्यास सुरू केला. मुंग्यांची सामाजिक व्यवस्था इतकी रंजक होती की मग मी पक्कं केलं की पुढे पण या अतिशय कमी माहिती असलेल्या मुंग्यांचा अभ्यास सुरू ठेवायचा. मुंग्यांची सामाजिक व्यवस्था हा खूप मोठा आणि गहन विषय आहे. मी त्यातील काही उपविभागांवर जवळपास वीस वर्षे संशोधन केलं.

गांधीलमाशांच्या अभ्यासातून एक मनोरंजक गोष्ट कळली की त्यांचं अन्न गोळा करण्याचे विशिष्ट तंत्र असतं आणि गांधीलमाशांच्या पोळ्यावर ती या अन्नाची देवाणघेवाण एका विशिष्ट पद्धतीने केली जाते. डावकामा नावाच्या मुंग्यांच्या विविध जातीच्या अभ्यासातून हे लक्षात आलं, की त्यांच्या मातृसत्ताक वसाहतींमध्ये राणी मुंगी स्वत:चं वर्चस्व कधी बळाचा वापर करून तर कधी रासायनिक गंधकणांचा वापर करून स्थापन करते. मुंग्यांच्या गुणसूत्रांचा

जेव्हा मी अभ्यास केला तेव्हा हे कळालं की त्यांच्या वर्तणुकीतल्या फरकांशी गुणसूत्रांचा संबंध असू शकतो.

आपल्या जीवसृष्टीचा जवळपास ७०टक्के भाग हा कीटक आहेत आणि हे कीटक आपल्या दैनंदिन आयुष्यात खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. ते पिकांचं परागीभवन करतात, नैसर्गिकरीत्या कीड नियंत्रण करतात आणि निसर्गातला बराचसा कचरा विघटन देखील करतात. त्यांचं महत्त्व समजून घेऊन आपण निसर्गाबद्दल अधिक जागरूक राहू शकतो. कीटकांचं अस्तित्व धोक्यात आलं तर आपलं अस्तित्वदेखील धोक्यात येऊ शकतं एवढं त्यांचं निसर्गामधील महत्त्व आहे आणि त्यांचं संरक्षण करायचं असेल तर आधी त्यांची माहिती घेणं, त्यांना समजून घेणं फार आवश्यक आहे.

मुंग्याच्या जवळपास १५००० प्रजाती जगभरात आहेत, तर भारतामध्ये ८८७ प्रजातींच्या मुंग्या सापडतात. आपलं घर, बगीच्यामध्ये ८ ते १० प्रजातींच्या मुंग्या सहज दिसू शकतात. अंटार्टिकासारखे अतिथंड हवामानाचे प्रदेश सोडता मुंग्यांचे खूप वेगवेगळे अधिवास आहेत. काही मुंग्या झाडांवर घरं बांधतात, तर काही जमिनीखाली, काही आपल्या घरांमध्ये, भिंतीच्या फटींमध्ये तर काही पालापाचोळ्यांमध्ये घरं करून राहतात. मुंग्या या सामाजिक कीटक आहेत. त्यांच्यामध्ये फक्त राणी मुंगी अंडी घालते तर बाकी



नूतन कर्णिक

सर्व कामकरी मुंग्या या अंडी न घालता वसाहतीमधील सर्व कामं करून राणी मुंगीला तिची प्रजा वाढवण्यासाठी मदत करतात. कामकरी मुंग्यांमध्ये लहान वयाच्या मुंग्या वसाहतीमध्ये थांबून अंडी, पिल्लांची काळजी घेणं, राणीची काळजी घेणं अशी कामं करतात. स्वच्छता राखणं, वसाहतीची डागडुजी करणं, वसाहतीचं संरक्षण करणं अशी कामं करत असतात. दिवसभर काम करून रात्री त्यांची हालचाल थोडी मंदावते आणि त्या विश्रांती घेतात. वयाने थोड्या मोठ्या मुंग्या वसाहतीमध्ये नवीन खोल्या बांधणं, वसाहतीच्या प्रवेशद्वारापाशी थांबून संरक्षण करणं अशी कामं करतात. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात त्या बाहेरून जाऊन खाणं गोळा करून आणणं हे काम करतात.

मुंग्या दिवसभरात वेगवेगळी कामं करत असतात. सकाळी आणि संध्याकाळी जेव्हा तापमान कमी असतं तेव्हा काही मुंग्या अन्नाच्या शोधार्थ बाहेर पडतात. मुंग्यांच्या खाण्यामध्ये खूप विविधता दिसून येते. त्या फुलांमधील मधुरस, साखर, स्वयंपाक घरातील अन्न असे पदार्थ खातातच, त्याबरोबरच जिवंत किंवा मेलेले कीटक, वाळवी, झाडांच्या बिया, कुजलेले पदार्थदेखील खातात.

वसाहतीची सुरुवात करताना राणी मुंगी जमिनीमध्ये बिळ खोदून त्यामध्ये अंडी घालते. त्या अंड्यांमधून बाहेर येणारी पहिली पिढी जमिनीमध्ये अजून खोदकाम सुरू करते आणि वेगवेगळ्या गोष्टी ठेवण्यासाठी वेगवेगळ्या खोल्या बांधायला लागते. मुंग्या त्यांचे जबडे वापरून खोदकाम करतात व माती बाहेर टाकतात. हळूहळू त्या आतमध्ये वेगवेगळी दालने, छोटे रस्ते बांधतात आणि वसाहत पूर्ण करतात.

काही जातीच्या मुंग्या आवाज करतात पण तो आपल्याला ऐकू येत नाही. मुंग्या त्यांच्या शरीराचे काही भाग विविध गोष्टींवर घासून हे आवाज एकमेकांशी संपर्क करायला काढतात. मुंग्या आसपासच्या परिस्थितीप्रमाणे समजून उमजून, साधे साधे नियम वापरून कामं करतात. एकमेकांबरोबर कुशाग्रतेने संवाद साधून, वसाहतीच्या

मुंग्यांची काही खास वैशिष्ट्यं : मुंग्या स्वतःच्या भरण पोषणाकरता जसं अन्न खातात, तसंच वसाहतीतल्या इतर सभासदांना लाळेच्या रूपांतून वाटण्याकरताही खातात. त्याकरता खाल्लेलं अन्न त्या परत तोंडात आणून एकमेकींसोबत वाटून खातात. या अर्थाने मुंग्यांना वैयक्तिक आणि सामाजिक अशी दोन पोटं असतात असं म्हणावं लागेल. मुंग्यांना कान नसतात. पण त्यांच्या सहा पायांच्या साहाय्याने जमिनीवरची ध्वनीकंपनं त्या सहज समजून घेऊ शकतात. मुंग्यांच्या छोट्याशा आकारामुळे आणि ऑक्सिजनच्या त्यांच्या मर्यादित गरजेमुळे त्यांच्या शरीरात फुफ्फुसं नसतात. त्यांच्या शरीराला ऑक्सिजन पुरवण्याचं आणि खेळवण्याचं काम त्यांच्या शरीरातल्या नळ्यांचं जाळं करतं. आपल्या शरीरात ऑक्सिजन साठवून ठेवण्याची मुंग्यांची क्षमता असाधारण आहे. त्यामुळेच पाण्यात पूर्ण बुडूनही त्या जवळ जवळ चोवीस तास जिवंत राहू शकतात. दीडशे फॅरनहीट तापमानापर्यंत मुंग्या पाण्यात जिवंत राहू शकतात. मुंग्या आपल्या अदृश्य पाऊलखुणा त्यांच्या शरीरातील एका रसायनाद्वारे त्या जिथे जिथे जातील तिथे तिथे सोडतात. या पाऊलखुणांद्वारा मुंग्या अन्नाचे स्रोत, धोक्याच्या सूचना, वहिवाटीची वाट इत्यादी अनेक गोष्टींबद्दलची उपयुक्त माहिती इतर सभासदांना देतात.

गरजांप्रमाणे निर्णय घेऊन त्या सर्व कामे पार पाडतात. मुंग्या चालताना स्वत:च्या शरीरातील काही रासायनिक गंध कण दिशा दर्शवण्यासाठी जमिनीवर सोडत जातात. त्यांच्या मागून येणाऱ्या मुंग्या या गंध कणांचा मागोवा घेत त्यांच्यामागून चालतात. त्यामुळे त्यांची ओळ मोडली तरी या गंधकणांच्या साहाय्याने त्या पुन्हा एका ओळीमध्ये व्यवस्थित चालू शकतात. अशा शिस्तबद्ध पद्धतीने काम केल्यामुळे मुग्यांना अतिशय कार्यक्षमतेने सगळी कामे करता येतात. राणी मुंगीचं मुख्य काम अंडी घालणं हे असतं. ही एखाद्या यंत्राप्रमाणे सतत अंडी घालत राहते. राणी मुंगीच त्यांची वसाहत स्थापन करते आणि प्रजा वाढवायला अंडी घालते. तेच तिचं प्रमुख आणि एकमेव काम असतं. बाकी सगळ्या कामकरी मुंग्या असतात. वसाहतीचं कामकाज सौहार्दपूर्ण वातावरणात, एकजुटीने चालू राहील याची त्या दक्षता घेतात. सहसा कामकरी मुंग्या स्वत: अंडी घालत नाहीत. राणी मुंगीने घातलेल्या अंड्यांतून जन्मलेली प्रजा ही कामकरी मुंग्या म्हणूनच वाढते. थोडक्यात कामकरी मुंग्याच वसाहत चालवतात. एखाद्या मुंगीने कामकरी मुंगी व्हायचं की राणीमुंगी हे तिच्या गुणसूत्रांवरून ठरत नाही, तर कोणाला उत्तम प्रथिनयुक्त आहार मिळतो त्यावर ठरतं.

नर मुंग्याही असतात. त्यांना पंख असतात. नर मुंग्या फलित न झालेल्या अंड्यांपासून विकसित होतात. राणी मुंगीला फलित करणं एवढंच त्यांचं एकमेव काम असतं. जन्मानंतर काही दिवसातच ते दुसऱ्या वसाहतीतील राण्यांबरोबर मिलन करण्यासाठी निघून जातात. आपण बघतो त्या सगळ्या मुंग्या सहसा मादी मुंग्या असतात.

एखादी मुंगी कुठल्या जातीची/ प्रकारची आहे आणि ती वसाहतीमध्ये काय स्वरूपाचं काम करते यावर तिचं आयुष्यमान असतं. पण सर्वसाधारणपणे कामकरी मुंग्या काही महिने ते २-३ वर्षे जगतात. राणीमुंगी १०-२० वर्षे जगते. माणसांप्रमाणेच मुंग्यांच्याही पिढ्या असतात आणि एका वेळी, एका वसाहतीमध्ये २ ते ३ पिढ्या एकत्र राहताना दिसून येतात.

मुंग्यांकडून शिकावं असं काही : त्यांचा आकार छोटा असला तरी मुंग्या बौद्धिक कौशल्यात आघाडीवर आहेत. म्हणूनच एक सामाजिक आणि अत्यंत नियोजनबद्ध रितीने जगणारा कीटक म्हणून त्या ओळखल्या जातात. मार्गात येणाऱ्या अडथळ्यांवर मात करणं, अन्नाचे नवनवे स्रोत, साठे शोधून काढणं, चुकांमधून शिकणं, अनुभवातून शहाणं होणं, इतकंच काय पण प्रसंगी अभिनव धोरण आखणं अशा अनेक डोकेबाज गोष्टी मुंग्यांना अवगत असतात. परिसरातील बदलांशी मुंग्या चटकन जुळवून घेतात आणि म्हणूनच त्या कुठल्याही परिस्थितीत तग धरून राहतात. एकमेकांशी सुसंगत रीतीने जुळवून घेत एकजुटीने-सहकार्याने काम करत मुंग्या आपलं एकत्रित ध्येय साध्य करतात. त्यांच्या या कार्यपद्धतीत एकमेकांशी स्पर्धा करण्याला अजिबात स्थान नाही. 'एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ' हे त्यांचं धोरण असतं.

मुंग्यांची घरं जमिनीखाली खोल असली तरी जमिनीवरती मोठ्ठी वारूळं भारतामधील मुंग्या बांधत नाहीत. आपल्याकडे जंगलांमध्ये दिसणारी मोठी मातीची वारुळं ही वाळवीने बांधलेली असतात.

काही मुंग्याच विषारी असतात. पण मुंग्यांचं विष हे प्रामुख्याने त्यांच्या भक्ष्याला मारण्यासाठी किंवा भक्षकापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी असतं. मुंग्या जेव्हा दंश करतात तेव्हा त्या फॉर्मिक ॲसिड सोडतात ज्यामुळे आपल्याला थोड्या वेदना होतात. पण भारतामध्ये तरी आपल्याला धोकादायक ठरतील अशा विषारी मुंग्या नाहीत. लिंबाचा रस, व्हिनेगर, बोरिक पावडर वापरून मुंग्यांना लांब ठेवता येतं. ग्लिसरीन, टाल्कम पावडर सुद्धा त्यांच्या येण्या जाण्याच्या मार्गावर टाकली तर काही अंशी त्यांचा त्रास कमी होऊ शकतो.

मुंग्या ओलावा, खाद्य, पाण्याच्या शोधात घरांजवळ येतात. त्यामुळे त्यांना पूर्णपणे रोखणं अवघड असतं. पण स्वयंपाकघरामध्ये जास्त स्वच्छता ठेवणं, भिंतीमधील फटी बुजवणं किंवा बाहेरून घराला स्पर्श करणाऱ्या झाडांच्या फांद्या कायम घरापासून लांब ठेवणं अशा गोष्टी करून मुंग्यांच्या सहज प्रवेशाला अडथळा करता येतो.

मुंग्या आपल्या शेतीवर आलेल्या किड्यांना खाऊन नैसर्गिक कीटकनाशकांचं काम करतात. तसंच कुजलेले प्राणी खाऊन जंगलं, निसर्ग स्वच्छ ठेवतात. बरेच पक्षी आणि प्राणी मुंग्यांना खातात. मुंग्यांची बीज प्रसारात पण मदत होते. जमिनीखालच्या त्यांच्या हालचालीतून माती वरखाली होते. हवा खेळती राहते, त्याचा पिकांना फायदा होतो. मातीचा कस सुधारतो. त्यामुळे मुंग्यांची निसर्गातील भूमिका खूप महत्त्वाची आहे.

माझ्या संशोधनाचा उपयोग हा मुंग्यांच्या उत्क्रांतीच्या अभ्यासामध्ये आहे. तसंच त्यांच्या वर्तणुकीवरून निघालेले निष्कर्ष माणसांची समाजव्यवस्था, माणसांमधील व्यवस्थापन, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अशा अनेक क्षेत्रांमध्ये वापरले जाऊ शकतात.

मी आणि कीटकतज्ज्ञ डॉ. राहुल मराठे यांनी २०२३ मध्ये 'मित्रकिडा फाऊंडेशन' स्थापन केलं. आमच्या संस्थेचं नावच 'मित्रकिडा' आहे. कारण कीटक आपले शत्रू नसून मित्र आहेत आणि 'मित्रकिडा' स्थापनेमागचा उद्देश हा आहे की लोकांच्या मनातले कीटकांबद्दलचे गैरसमज आणि भीती दूर करून कीटकांचे आपल्याला आणि निसर्गाला होणारे फायदे हे लोकांना सांगून कीटक संरक्षण आणि संवर्धन करायचं. संस्थेतर्फे आम्ही कीटकांविषयीची माहितीपर शास्त्रीय व्याख्यानं देतो, कीटक

डॉ. पूर्णिमादेवी बर्मन आणि हरगिला पक्ष्याचं संवर्धन

पर्यावरण रक्षणाचा मुद्दा आज अगदी ऐरणीवर आला आहे. आपल्या जीवसृष्टीच्या आणि पर्यायाने पृथ्वीतलाच्याच भवितव्याच्या दृष्टीने तो एक कळीचा मुद्दा ठरला आहे. जगभरातले अनेक पर्यावरणप्रेमी याकरता जीव तोडून प्रयत्न करत आहेत.

या संदर्भात सध्या आसाममधल्या वन्यजीव जीवशास्त्रज्ञ डॉ.पूर्णिमादेवी बर्मन यांचं नाव मोठ्या गौरवाने घेतलं जात आहे. 'हरगिला' या करकोच्याच्या एका प्रजातीतल्या पक्ष्याचं संरक्षण आणि संवर्धन या कामी त्यांनी गेली अठरा वर्ष स्वत:ला झोकून दिलं आहे. जगभरात केवळ भारतात आसाम आणि बिहार या दोन राज्यात आणि कम्बोडियात हे पक्षी आढळतात. २००७ मध्ये जगभरात फक्त पाचशेहूनही कमी संख्येने अस्तित्वात असलेला हा पक्षी दुर्मीळ, नामशेष होण्याच्या मार्गावर होता. नुकत्याच केलेल्या गणनेत हीच संख्या हजारावर भरली आहे. हा कुठला चमत्कार नाही, तर त्यामागे डॉ. बर्मन यांनी जिद्दीने केलेल्या अथक प्रयत्नांचं मौलिक योगदान आहे.

अशुभ आणि रोगराईचा दूत मानला गेलेल्या 'हरगिला'बद्दलचा तिथल्या लोकांचा दृष्टीकोन बदलून 'पर्यावरण रक्षक पक्षी' अशी या पक्ष्याची नवी ओळख त्यांनी जगाला करून दिली. घराघरातल्या स्त्रियांच्या सहभागाने त्यांनी हे ध्येय साध्य केलं. त्यांनी अथक मेहनतीतून उभारलेला आणि सुरुवातीला केवळ दहा-बारा स्त्रियांच्या सहभागातून सुरू झालेला हा गट आता जवळजवळ वीस हजाराहूनही अधिक स्त्री-सदस्य असलेला एक सशक्त गट बनला आहे. 'हरगिला आर्मी' या नावाने तो जगभरात प्रसिध्द झाला आहे. हा गट प्रामुख्याने 'हरगिला'चं आणि पर्यायाने पर्यावरणाचं संरक्षण आणि संवर्धन या कामी कृतीशील आहेच, शिवाय हे स्त्री-सदस्य शिवणकाम, विणकाम, शेतीकाम अशा विविध व्यवसायातून आर्थिकदृष्टया सबल झाले आहेत.

डॉ. पूर्णिमादेवी यांच्या या असामान्य कार्याची दखल जागतिक स्तरावरही घेतली गेली आहे, घेतली जाते आहे. 'व्हिटली अवार्ड २०१७' ने त्यांना सन्मानित केलं गेलं आहे. आपल्याकडे 'नारी शक्ती पुरस्कारा'ने त्यांना गौरवलं गेलं आहे. यंदाच्या 'टाईम' मासिकात 'विमेन ऑफ द इयर २०२५' च्या यादीत त्यांचं नाव सन्मानाने समाविष्ट करण्यात आलं आहे. त्यांचं अभिनंदन आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा.

संकलन : शुभदा चंद्रचूड

शिबिरं घेतो, लोकांना निसर्गामध्ये नेऊन कीटक परिचय करून देतो, वृत्तपत्रांमधून लिखाण करतो आणि कीटकांबद्दल काही समस्या असेल तर त्याविषयी सल्लाही देतो. कीटक संवर्धन व्हावं म्हणून आम्ही फुलपाखरू उद्यान स्थापन करणं, कीटकांचं सर्वेक्षण करणं आणि मित्रकीटक वाढवून निसर्गामध्ये सोडणं हेही करतो. मुंग्यांबद्दल, त्यांच्या निसर्गातील स्थानाबद्दल लोकांना जास्तीत जास्त माहिती व्हावी असं मला वाटतं आणि त्यामुळे मी आत्तापर्यंत मुंग्यांवर अनेक व्याख्याने दिली आहेत.

भारतातील बऱ्याच विद्यापीठांमधून आणि राष्ट्रीय प्रयोगशाळांमधून विशिष्ट कीटकांवर अभ्यास केले जात आहेत. उदा. National Bureau of Agricultural Insect Resources (NBAIR), Bengaluru, Zoological Survey of India (ZSI), Kolkata and Regional Centres, Indian Institute of Science, Bengaluru. जगभरात वेगवेगळ्या कीटकांवरती प्रचंड संशोधन झालं आहे आणि कीटकांपासून प्रेरणा घेऊन नवीन तंत्रज्ञान पुढे येत आहे. तापमान वाढीचा आणि हवामान बदलाचा कीटकांवर होणारा परिणाम अभ्यासणं हे आमचं उद्दिष्ट आहे.

मित्रकिडा फाऊंडेशनचं काम खूप वाढत असल्याने माझे व्यक्तिगत उपक्रम वेगळे राहिले नाहीयेत. माझा सर्व वेळ कीटकांचा अभ्यास आणि माहितीचा प्रसार करण्यात जातो.

आपल्या अनेक वर्षांच्या अभ्यासातून नूतन यांना जाणवलेलं मुंग्यांचं विश्व सोप्या भाषेत लोकांपर्यंत पोचवण्यासाठी त्या व्याख्यानं देतात, शास्त्रीय लिखाण करतात. त्यांच्या 'मित्रकिडा फाऊंडेशन' तर्फे कीटक संरक्षण आणि संवर्धन करण्याकरता त्या सतत कार्यरत आहेत.

त्यांच्या या कामाची योग्य दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केलं गेलं आहे. महाराष्ट्र वृक्ष संवर्धिनी संस्थेचा 'ग्रीन वॉरिअर २०२४' पुरस्कार, 'वसुंधरा मित्र निसर्गरक्षक पुरस्कार २०२४', डॉ. कल्पना चावला स्मृती यशस्विनी पुरस्कार २०२४' हे त्यापैकी काही!

नूतन यांच्या आणि 'मित्रकिडा' या त्यांच्या संस्थेच्या वाटचालीला 'मिळून साऱ्याजणी' तर्फे शुभेच्छा!

मुलाखत आणि शब्दांकन : शुभदा चंद्रचूड, *पुणे*

smcmrc@gmail.com

५ जून पर्यावरण दिनानिमित्त...

स्वप्नातला गालिचा आणि गगनजाई

डॉ. सौदामिनी लिमये

गावाबाहेरच्या एका शेतावर नवीन प्लॉट्स पाडल्याचे ह्यांना मित्राकडून कळले. त्यांनी तीन हजार फुटाचे ४ प्लॉट्स घ्यायचं ठरवलं आणि मग तिथेच बंगला बांधायचं ठरवलं. मधे अठरा हजार स्केअर फुटाचा बंगला बांधला आणि आम्हाला हवी तशी बाग करायला भरपूर मोकळी जागा मिळाली. बकुळ, परिजातक, कैलासपती, शिरीष, गुलमोहर, बहावा अशी अनेक मोठी झाडे, आंबा, पेरू, आवळा, चिकू, पपई, सिताफळ यासारखी खूप फळझाडे, अनेक लहान वेली व फुलझाडे लावून झाली तरी आमची हौस फिटली नाही. आमचे लक्ष शेजारच्या नगरपालिकेच्या मोकळ्या जागेकडे गेलं.

मग असं ठरलं की, वरून बघितलं तर रंगीत गालिचा दिसेल अशी झाडे निवडायची. मग विचार करून नगरपालिका वनखाते आणि माहितीतल्या इतर लोकांकडून झाडे मिळवली. चार कोपऱ्यात गुलमोहोर त्याच्या मध्ये बहावा, आतल्या बाजूला चार नीलमोहोर, सहा पळस, मध्यभागी पंधरा कांचन आणि चारी बाजूला बुचाची झाडे, तसेच, रस्त्याच्या दुतर्फा बुचाची झाडे लावायची ठरले. ठरल्याप्रमाणे झाडे लावली. नगरपालिकेनं आमच्याकडे पाणी घालण्याची सोय नाही असे सांगितले. सुदैवाने आमच्या बोअरवेलला भरपूर पाणी होते. अजून नगरपालिकेचे पाणी आले नव्हते. दोन मोठ्या नळ्या लावून आठवड्यातून झाडांना म्हणजेच रोपांना पाणी मिळू लागले. आता रोपांना कसे राखायचे गुरे चरायला सोडत असत. आम्ही दोघे डॉक्टर असल्यामुळे दवाखाना सांभाळून झाडे कशी राखायची? असा प्रश्न होता.

एकदा एक बाई शेळ्या सोडून सावलीखाली बसली होती. तिच्या समोर एक शेळी झाड खात होती. हे पाहून मी जरा रागावून बोलले की अग, तुझ्यासमोर तुझी शेळी आम्ही लावलेली झाडे खात आहे, हे तुला दिसत नाही का? तेव्हा ती म्हणाली, "ही शेळी माझी नाही."

मी "तुझी नसली तरी तुला हाकलायला नको का?"

तेव्हा ती बाई म्हणाली, "या शेळीच्या मालकीनिशी कोण भांडणार?" दोनदा शेळ्या कोंडवाड्यात घालून झाल्या. तेव्हा नगरपालिकेचे लोकही कंटाळले. ते म्हणाले की तुमची बाग राखायला आम्हाला नेमले नाही.

मी म्हणाले, "आमची बाग आम्ही राखतो. ही नगरपालिकेची म्हणजे तुमचीच बाग आम्ही राखतो."

एकदा हे गुरे हाकलायला गेले. तेव्हा तो गुराखी म्हणाला, "जमीन काय तुमच्या 'बा'ची हाय काय?"

हे म्हणाले, "तुझ्या बाची नाही ना!" असे गुराखी म्हटल्यावर त्यापुढे जाऊन आमची भांडायची ताकद नव्हती.

तिथे आमचं एकच घर असल्यामुळे आमच्या घराला पोस्टाचा असा पत्ता नव्हता. आमची सर्वच पत्रे आमच्या दवाखानाच्या पत्त्यावर येत असत. बरेच दिवसांनी जवळच एक घर झाले. तिथे पोस्टमन आलेला दिसला. मग आम्ही शेजाऱ्यांना विचारलं की तुम्ही पोस्टात काय पत्ता दिलात? तेव्हा ते म्हणाले, "डॉक्टरांच्या शेजारी." असे त्यांनी सांगितल्यावर आमच्या लक्षात आले त्यांना पत्ता होता. आम्हाला पत्ता नव्हता. विनंती केल्यावर नगरपालिकेने तारेचे कंपाउंड आणि बसायला दोन सिमेंटचे बाक दिले. पण एका रात्रीत कंपाउंडच्या तारा आणि बाक चोरीला गेले.

मग आम्ही दोघांनी विचार केला की रस्त्याकडेला आणि मोकळ्या जागेच्या चारी बाजूला बुचाची झाडे आहेत. या झाडांची संख्या जवळपास ४० ते ५० आहे. या बूचाच्या झाडाला दुसरे काही नाव आहे का? याची चौकशी केली, तेव्हा जी नावे कळली ती म्हणजे अर्जुनवृक्ष, लटक चमेली, गगनजाई. या नावांमधले गगनजाई नाव आवडले. पावसाळ्यात गगनजाईचा रस्त्यावर पडलेला पांढऱ्या फुलांचा सडा तसेच सुगंध जाणवायला लागलं. त्यावरून गगनजाई परिसर असा पत्ता द्यायचं ठरवलं. तेवढ्यात मुलाने चेष्टा केलीच, "बूच कॉलनी हे नाव का नको?" एकूण तिथली परिस्थिती पाहता तेथे हळूहळू करून एकही झाड शिल्लक राहिले नाही. त्यामुळे गालिचा स्वप्नातच राहिला. गगनजाई मात्र सुकून गेली.

लोकांना गगनजाई नाव अपरिचित असल्याने त्याचा अपभ्रंश होत जाईजुई परिसर, जनाबाई परिसर असा झाला. आता तर वस्ती खूप वाढत गेली.

डॉ. सौदामिनी लिमये, *सांगली*
मोबा. ८२७५२५६६३५

माध्यमांतर... / गट्टी शब्दांची

डोळा लवणे

डॉ. नीलिमा गुंडी

मुलांनो, मराठी भाषेच्या स्वतःच्या अशा काही लकबी आहेत. उदा. जोडीने येणारे दोन शब्द, क्रियापद तेच पण जोडीला शब्द बदलला की बदलणारा अर्थ. तुमची शब्दांशी गट्टी जमावी म्हणून या सदरात तुम्हांला या लकबींची ओळख करून दिली आहे. भाषेतल्या अशा गमती कळल्या की, तुम्हाला भाषा आत्मविश्वासाने वापरणे सहज जमेल!

रेडिओवरून गाणे ऐकू येत असते. "बाई माझा लवतोय डावा डोळा" ते शब्द ऐकून अन्वय विचारात पडतो. तेवढ्यात बाहेर गेलेली आई घरात येते. अन्वय दारातच तिला गाठतो नि विचारतो, "अग आई, पटकन सांग ना! काय या गाण्याचा अर्थ? डोळा लवतो म्हणजे काय?"

त्याच्या प्रश्नांच्या भडिमारामुळे वैतागून आई म्हणते, "अरे, मला आत तर येऊ दे! तुला शब्दांचा अर्थ कळल्याशिवाय जराही चैन पडत नाही का रे?"

"अग, अर्थ नाही कळला की डोक्यात चक्र सुरू राहातं! तू सांग ना अर्थ! मागे तूच सांगितलं होतंस - लवणे म्हणजे वाकणे. ते माझ्या लक्षात आहे. तसंच ते गाणं नाही का? काय बरं? आठवलं! 'लवलव करी पातं'! त्यात 'लवलव' शब्द आहे. तू सांगितलं होतंस की लवलव म्हणजे हालचाल, थरथर! पान वाऱ्यानं हलतं, डुलतं! आता डोळा कसा काय लवतो? मी डोळा फिरवायचा किती प्रयत्न करून पाहिला! तो वाकत नाहीच! म्हणून तुला विचारतोय!" अन्वयनं धडाधड मनातले सांगूनच टाकले!

अन्वयच्या त्या निरागस प्रश्नामुळे आईला हसूच आलं. ती म्हणाली," अरे, डोळा लवतो म्हणजे डोळ्याची पापणी लवते; म्हणजेच पापणीची हालचाल होते. त्याला पापणी स्फुरण पावते, असंही म्हणतात. ही हालचाल अचानक, आपल्या आपण होते. आपण काहीही न करता होते. आपला ताबाच नसतो अशा हालचालींवर! त्यामुळे त्याविषयी शुभअशुभ अशा कल्पना जमा होतात. त्या कल्पनांवर विश्वास ठेवणे राहू या! पण हे शब्द तुम्हांला माहीत हवेत!"

"अग आई, म्हणजे आपल्याला शिंक येते. हाक शी तसं! आणि हो ढेकर येतो, तसं!" अक्षरानंही आपली हुशारी दाखवून दिली.

"आई, मी एका गोष्टीत ऐकलंय, भीमाचे बाहू युद्धासाठी स्फुरण पावत होते. तसं का? "अन्वयनं विचारलं.

"हो! तुम्हा दोघांचंही बरोबर आहे. आपल्या शरीराच्या काही हालचाली अशा नकळत घडत असतात. डोळा लवणं, पापणी फडफडणं या अशाच हालचाली आहेत!" आईने स्पष्ट केले.

"पापणी फडफडते! भारीच गमतीदार! पापणी म्हणजे काय पंख आहेत का? पक्ष्यांचे पंख फडफडतात, हे होतं मला माहीत!" अक्षराला हसायची संधी मिळालीच!

"अग, भाषेत नाजुक हालचाली छान टिपलेल्या असतात. त्यासाठी असे शब्द वापरतात. कळलं!" आईने समजावले.

"आई, आणि हां 'लवथवती विक्राळा' मधल्या लवथवती शब्दाचा अर्थ काय ग?" अन्वयच्या शंका संपेचनात!

"अरे, लवथवती म्हणजे लोंबतात! तुम्हाला एखाद्या शब्दावरून दुसरे त्याला जवळचे शब्द आठवतात, हे चांगलं आहे!" आईने अन्वयचं कौतुक केलं!

"आई, माझे दोन्ही डोळे एकदम लवले पाहिजेत म्हणजे कोणता डोळा लवणं चांगलं आणि कोणता डोळा लवणं वाईट, 'असा प्रश्नच येणार नाही! काय!" अन्वयच्या या वाक्यासरशी आईने त्याच्या पाठीवर शाबासकीच दिली!

(साभार स्नोवेल)

***डॉ. नीलिमा गुंडी,* पुणे**

संपर्क: ०२० २४४८६०१५

अंक मिळाला नाही का?



'मिळून साऱ्याजणी'चा प्रत्येक अंक दर महिन्याच्या १ तारखेला पोस्टाने रवाना होतो. जर वर्गणीदारांना दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत अंक मिळाला नाही तर त्यांनी सोमवार ते शुक्रवार दुपारी १२ ते ५ या वेळात 'मिळून साऱ्याजणी'च्या **८००७८१४००५** या मोबाईल क्रमांकावर SMS करून आपली तक्रार द्यावी. म्हणजे आम्हाला आपला अंक परत पाठवता येईल.

विद्या बाळ अध्यासन प्रकल्प - २

निर्भयतेसाठी संवाद, सहकार्य आणि समावेशकता (२०१५-२०२५) : भाग ४

अरुणा बुरटे

विद्या बाळ अध्यासन प्रकल्प-२ यामध्ये सखोल अभ्यासात जातीय, धार्मिक अस्मिता जास्त टोकदार करत स्त्रीचं आत्मभान बाजूला सारण्याचा, भगिनीभाव क्षीण करण्याचा प्रयत्न राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पातळीवर जोरदारपणे कसा चालू आहे आणि या आजच्या दुःखद वास्तवाला सामोरं जात असताना भगिनीभाव बळकट करण्यासाठी स्त्री चळवळीचा इतिहास समजून घेणं कसं गरजेचं आहे हे सांगत त्या अनुषंगानं स्त्रीवादी कार्यकर्त्या आणि अभ्यासक अरुणा बुरटे यांनी गेल्या काही भागापासून १०-१० वर्षांचे टप्पे पाडत हा इतिहास उजागर करण्याचा प्रयत्न अत्यंत काटेकोरपणे केला आहे, त्यानुसार २०१५ ते २०२५ या वर्षांतल्या इतिहासाचा सविस्तर लेखाजोखा घेणारा समारोपाचा हा चौथा भाग जरूर वाचावा.

पुणे येथे ४-६-२०१४ रोजी मुस्लीमद्वेषी झुंडीने माहिती तंत्रज्ञान व्यावसायिक मोहसीन शेख यांचा खून केला. या घटनेचे सावट येणाऱ्या काळावर पसरले आहे.

डावी, समाजवादी, लोकशाही, पुरोगामी, मानवीहक्क आणि स्वायत्त स्त्री चळवळींचा चार दशकांचा आढावा 'भाकरी आणि फुलं' (१९७५ ते १९८५), 'विरोधाचा रेटा असूनही' (१९८५ ते १९९५), 'सजगतेसह सतत संघर्ष' (१९९५ ते २००५) आणि 'समन्वयासाठी विविधतेचे भान' (२००५ ते २०१५) या लेखांतून आपण घेतला. त्या पुढील म्हणजे २०१५ ते २०२५ या दशकाचा आढावा चार भागात आहे. त्याचा हा भाग चार.

समाजातील सर्व प्रकारच्या व्यवहारांशी स्त्री-प्रश्नांचे पदर जोडलेले असतात. संघटना आणि व्यक्ती म्हणून स्त्रिया विविध प्रकारे त्यात सहभागी होतात. भाग एकमध्ये आपण आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय घडामोडी तसेच 'हिंदू राष्ट्र' स्थापनेच्या प्रयोगांचा सर्वव्यापक रेटा याची माहिती करून घेतली. भाग दोनमध्ये विविध विषयांवर झालेल्या परिषदा; अहवाल प्रसिद्धी तसेच स्त्री चळवळींनी घेतलेले मुद्दे, निदर्शने आणि निवेदने या सर्वांचा आढावा घेतला. भाग तीनमध्ये स्त्री चळवळींनी केलेले हस्तक्षेप समजून घेतले. त्यात शाहीनबाग, शेतकरी आंदोलन तसेच काश्मिर आणि आपण हे विषय पाहिले. भाग चारमध्ये लोकशाहीच्या जपणुकीसाठी, पुनःपुन्हा समान नागरी कायद्याची चर्चा, बिल्किस आणि सदसद्विवेकबुद्धी या विषयानंतर समारोप करणार आहोत.

लोकशाहीच्या जपणुकीसाठी कायद्याचे राज्य असेल तरच स्त्रियांसह इतर शोषित, परिघावरील नागरिकांच्या हक्कांची शाश्वती असू शकते. त्यांना न्याय मिळण्याची शक्यता काही प्रमाणात तरी असते. हे माहीत असल्याने स्त्री चळवळी यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामुळे सत्ताधारी पक्षातील नेते कायद्याचे राज्य धुडकावत जाहीर वक्तव्य आणि कृती करतात तेव्हा राज्यकर्त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव वेळोवेळी करून द्यावी लागते. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे.

सत्ताधारी गुन्हेगाराला कसे अभय देतात याचे डेरा सच्चा सौदाचा सर्वेसर्वा गुरमीत राम रहीम सिंग हे एक उदाहरण. दोन साध्वींवरील बलात्काराचा गुन्हा सिद्ध होऊन त्याला २० वर्षांची शिक्षा झाल्याचा निकाल २८-८-२०१७ रोजी लागला. तथाकथित अध्यात्मिक गुरुचे असंख्य भक्त कोर्टाच्या निकालाने संतापले. त्यानंतर झालेल्या दंगलीत ३० जणांचा वेदनादायी मृत्यू झाला आणि शेकडो जखमी झाले. सरकारला ही आपत्ती टाळता आली असती. साधारण १९९० पासून कार्यरत असलेल्या या गुरुचे भक्त बहुसंख्येने दलित स्तरातून आलेले आहेत. हरियाणा, पंजाब, दिल्ली आणि उत्तर प्रदेश अशा अनेक राज्यात त्याचा प्रसार आहे. गुरु आणि भक्त सुरुवातीला काँग्रेस आणि नंतर भाजपचे

समर्थक आहेत. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम रहीम यांची स्तुती केली आहे. नुकत्याच झालेल्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकांच्या प्रचारासाठी या गुरुला पॅरोलवर मोकळे सोडले होते. गुन्हेगारांना असलेल्या या प्रकारच्या राजाश्रयामुळे असे गुरु आणि त्यांचे कारनामे बळकट होत राहतात. या प्रकारणातील पीडितांना कायद्याच्या किचकट प्रक्रियेत भावनिक आणि इतर मदत जनवादी महिला संघटना २००२ पासून करत होती.

जानेवारी २०२० मध्ये झालेल्या दिल्लीतील निवडणूक प्रचारामध्ये भाजपा प्रतिनिधींनी द्वेष, हिंसा, बदला, धडा शिकवणे अशा प्रकारची वक्तव्य केली. केंद्र सरकारमधील विद्यमान मंत्री गर्दीला भडकवत म्हणाले, 'यांना गोळ्या घाला' ते निदर्शकांबद्दल बोलत होते. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री अजय सिंग बिश्त उर्फ योगी आदित्यनाथ दिल्लीतील प्रचार सभेत म्हणाले 'बोलीसे नही गोली से मानेंगे'. माननीय गृहमंत्री श्री. अमित शहा म्हणाले, '८-२-२०२० रोजी मतदान यंत्र एवढे जोरात दाबा की येथील विरोध करणाऱ्यांना धक्का बसेल'. भाजपाचे खासदार श्री. परवेश शर्मा म्हणाले 'शाहीन बागेत लाखो जमतात. ते तुमच्या घरात घुसतील. तुमच्या पोरी बाळींवर बलात्कार करतील. त्यांना ठार मारतील.' त्या संदर्भात पंतप्रधानांना खुले पत्र लिहून त्यांना संविधानिक कर्तव्ये पाळण्याची आठवण करून दिली गेली पण या सर्व गोष्टींवर पंतप्रधान चुप्प होते. कारण या गोष्टी त्यांच्या उघड संमतीने होत होत्या.

दिल्लीत निवडणूक होण्याआधी जानेवारी २०२० मध्ये झालेल्या एकतर्फी मुस्लीमद्वेषी हिंसेच्या विरोधात सरकारला दिलेल्या निवेदनात पुढील मागण्या केल्या होत्या. 'दिल्लीतील अत्यंत गरीब स्तरातील मुस्लीम नागरिकांवर हल्ले केले. त्यांची आयुष्ये उद्‌ध्वस्त केली. त्यांना मदत छावण्यात ढकलले. अनेक हिंदू कुटुंबांचीही हानी झाली. अशा काळात सरकारने दिलासा द्यायला हवा. त्या ऐवजी राजाश्रय असणारी माध्यमं द्वेषाला खतपाणी घालत आहेत. वास्तविक नागरिकांनी केलेल्या निदर्शनात सर्व स्तरातील स्त्री-पुरुष आपल्या हक्कांसाठी एकत्र आले होते. स्त्रियांनी या आंदोलनात प्रशंसनीय भूमिका पार पाडली. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याऐवजी सरकार शांततेच्या मार्गाने निदर्शन करणाऱ्यांवरच खोटेनाटे आरोप लावत त्यांना बेल न मिळेल अशी योजना करून तुरुंगात टाकत आहे. त्यामध्ये गुल्फिषा, सफुरा झरगर, इशरत जहान, खालिद सैफी, मिराण हैदर, शर्जील इमाम, शीफा उर रेहमान, उमर खालिद, सफरूल इस्लाम खान इत्यादी आहेत. समाजाचा विवेकी आवाज असणारी तरुणाई खास करून इस्लाम धर्मीय तरुणाई तुरुंगात खितपत पाडली आहे. आपल्या भाषणातून जे द्वेष पसरवत आहेत, हल्ले करीत आहेत यांच्यावर ताबडतोबीने कारवाई करावी. खोट्या केसेस मागे घ्याव्यात. NPR CAA NRC या संदर्भात बोलणी सुरु करावीत. NPR आणि जनगणना हे विभक्त करावे. आमचा निदर्शकांना पाठींबा आहे. नागरिकांच्या लोकशाही हक्कासाठी सरकारने वाटाघाटी सुरू कराव्यात आणि सर्व पोलिसी कारवाई थांबवावी.' संघटनांनी निदर्शने केली, निवेदने दिली आणि त्यावर सतत संघर्ष चालू ठेवला.

कोणत्याही आपत्तीत सरकारने नागरिकांना दिलासा मिळेल असे वागायला हवे. पण मार्च २०२० नंतर कोविड-१९ या साथीचा मुकाबला करताना सर्वात गरीब, मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणारे, कष्टकरी, कामकरी, अल्पसंख्य, पारलिंगी, स्त्री-पुरुष या सर्वांचे रोजगार नष्ट झाल्याने मोठ्या प्रमाणात शहरातील लोंढा कुटुंबातील म्हातारी माणसं आणि मुलाबाळांसह आपल्या गावी जाण्यासाठी स्थलांतरित होत होता. त्यांच्यावर सुरक्षेच्या नावे कर्फ्यू मोडला म्हणून लाठीहल्ला करण्यात आला. त्यांना अपमानित करून जाहीर शिक्षा करण्यात आल्या. त्यांच्यावर जंतुनाशक फवारा मारण्यात आला! हे सर्व गरिबांच्या वाटेला आले. मात्र दुसऱ्या देशातून विमानाने परतणाऱ्या सुखवस्तू, श्रीमंत भारतीयांना योग्य वागणूक दिली. यावरून सरकार गरीब, शोषित यांच्या बाजूने नाही हे प्रत्यक्ष पाहून विवेकी भारतीयांच्या माना शरमेने खाली गेल्या. सरकारने आपले डोके ठिकाणावर ठेवले आहे का असे वाटून गेले. तरी आपल्या सर्व प्रशासनाला योग्य त्या सूचना देऊन गरीब आणि असाहाय्य नागरिकांना सुसंस्कृत वागणूक द्यावी. प्रतिनिधींचे ते कर्तव्य आहे.' शासनाला अनेक जनसंघटनांनी अशा स्वरुपाची निवेदने दिली.

वेळोवेळी सत्तेला अडचणीचे प्रश्न विचारणाऱ्यांवर अर्बन नक्षल, नक्षल, देशद्रोही, आंदोलन जीवी असे शिक्के मारत त्यांना खोट्या आरोपाखाली अटक करून सरकारने त्यांची रवानगी तुरुंगात केली. त्या विरोधात सरकारने आपली नीती बदलावी म्हणून अनेकांनी आवाज उठवला. छत्तीसगडमधील सोनी सोरी आणि कवासी हिडमेसारख्या आदिवासी कार्यकर्त्या, भीमा कोरेगाव प्रकरणात देशद्रोही कारवाया केल्याचे आरोप ठेऊन तळागाळातील कष्टकऱ्यांच्या हक्कांसाठी वर्षानुवर्षे संघर्ष करणारे काही कार्यकर्ते आणि अभ्यासक, राजस्थानमधील सरपंच नरोतीबाईचा लढा, सर्वधर्मसमभाव स्थापित करण्यासाठी सातत्याने हस्तक्षेप करणाऱ्या व्यक्ती, सैन्याला नागरीकांविरुद्ध अनिर्बंध बळाचा एकतर्फी वापर करण्याचा अधिकार देणारा आर्मड फोर्सेस स्पेशल कायदा मागे घेण्यासाठी ४-११-२००० ते ९-८-२०१६ असे सोळा वर्ष प्रदीर्घ उपोषण करणारी मणिपूरची शर्मिला इरोम, हिंसेत होरपळणाऱ्या मणिपूरमधील अमानुष लैंगिक हिंसा झालेल्या स्त्रिया आणि या सारख्या अनेकांना चळवळीने पाठींबा दिला.

नोटबंदी, शेतकरी आंदोलन, कोविड १९ साथ, झुंडबळी आणि दंगली म्हणत केले जाणारे एकतर्फी हल्ले इत्यादी गोष्टीत किती नागरिकांनी आपले प्राण गमावले, रोजगार गमावले, किती लोक विस्थापित झाले याची साधी मोजदादही सरकार ठेवत नाही! जे अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे.

पुनःपुन्हा समान नागरी कायद्याची चर्चा : उत्तराखंडमधील शायरा बानोने तीन तलाकला एप्रिल २०१६ मध्ये कोर्टात आव्हान दिले होते. शायरा बानोच्या याचिकेला बेबाक, भारतीय मुस्लीम महिला आंदोलन (BMMA) आणि मजलिस या तीन संघटनांनी पाठींबा जाहीर केला. या तिन्ही संघटनांचे दृष्टीकोन वेगवेगळे होते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील धर्मग्रंथाच्या अभ्यासाच्या आधाराने कुराणातील अनेक तरतुदींचा समतेसाठी वापर करणे शक्य आहे. केवळ संकुचित मानसिकता असलेल्या उलेमा, मौलवींकडून त्याचा अर्थ स्त्रीविरोधी लावला जातो. स्त्री हक्क दृष्टीकोनातून ही उणीव सहज दूर करता येते. त्यामुळे संविधान आणि शरीया यांचे योग्य एकत्रीकरण करून स्त्री हक्क स्थापित करता येतात अशी BMMA ची भूमिका होती. संविधानातील समतावादी तरतुदींचा वापर स्वायत्त स्त्री संघटना करू शकतात. दूर पल्ल्याच्या स्थैर्यासाठी ते आवशक आहे, असा बेबाकचा सूर होता. या दोन्हीपेक्षा वेगळी भूमिका मजलिसची आहे. ती अशी. आजचे राजकीय वातावरण बघता शायरा बानोला समर्थन देणे घातक आहे. वर्तमान कायद्याचा वापर करत स्त्रीला न्याय मिळू शकतो. वास्तविक स्त्रियांना न्याय मिळाला पाहिजे हा सर्वांचाच दृष्टीकोन आहे. पण त्यासाठीचे डावपेच कोणते असावेत याबद्दल मतभिन्नता आहे. स्त्री संघटना या दोन्हीमधून आपली वाट काढत असतात. एकाचवेळी एकजूट, सहकार्य, मतभेद आणि विविधता अशा बाजू चळवळीच्या प्रतिसादात सर्वसाधारणपणे दिसतात. हा कायदा पारित होण्याची प्रक्रिया २०१७ पासून सुरू होती. शायराबानोच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायलयाने २२-८-२०१७ रोजी तीन तलाक अवैध ठरवत या आधी अन्य उच्च न्यायालयांनी असे निर्णय दिले असल्याचा उल्लेख केला आहे. त्यानंतर सरकारने लोकसभेत बिल पारित केले. ते दोन्ही सभेत संमत न करून घेता सरकारने अध्यादेश काढला. त्यानंतर २०१९ मध्ये दोन्ही सदनांत भाजपा सरकारला दोन तृतीयांश बहुमत मिळाल्यामुळे हे बिल संमत झाले व कायदा झाला. स्त्री संघटनांचे मत लक्षात न घेता या नवीन गरज नसलेल्या कायद्याने तीन तलाक हा तीन वर्ष तुरुंगवास आणि दंड अशी शिक्षा असलेला फौजदारी गुन्हा ठरवला गेला. तलाकचा विषय हा कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रतिबंधाच्या कायद्यात येतो. मग तो कायदा पुरेसा असतांना या कायद्याची गरजच नव्हती. या कायद्यामुळे मुस्लीम पुरुषाला गुन्हेगार ठरविण्याची तरतूद केली गेली. तीन तलाक या अन्याकारक रूढीपासून आता मुस्लीम महिला मुक्त झाल्या आहेत, असा खोटा प्रचार केला. अशा कार्य पद्धतीला बहुमताच्या जोरावर संसदेचा गैरवापर म्हणता येईल.

एवढेच नव्हे, तर शायरा बानो प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान लॉ कमिशनने एक प्रश्नावली तयार करून समान नागरी कायदा या मुद्द्यावर सामान्य नागरिकांचा प्रतिसाद घ्यायला सुरवात केली. त्यातील त्रुटी दाखवून स्त्री संघटनांनी विषयाचे गांभीर्य लक्षात आणून दिले. ते असे: विशेष विवाह कायद्याची दखल न घेणे; त्या कायद्याखाली जर दोन्ही पक्ष 'हिंदू' असतील तर हिंदू वारसा हक्क लागू होणं; विविध जमातीतील सामायिक जमिनीबद्दल स्त्रियांच्या वहिवाटीचा उल्लेख नसणं; लिव्ह इन अथवा समलिंगी, पारलिंगी सहजीवनाचा मुद्दा लक्षात न घेणं या व यासारख्या इतर काही गोष्टी लक्षात घेता ताबडतोबीने जनमत आजमावण्यासाठी प्रसारित केलेली प्रश्नावली मागे घेण्याची मागणी स्त्री संघटनांनी केली. तसेच मुस्लीम नागरिकांना बीफ व्यापाराचा, सेवनाचा संशय घेऊन झुंडबळी करणे याकडे लक्ष न देता त्या समाजातील स्त्रियांचं कल्याण कसे करू शकणार असे प्रश्न उपस्थित केले.

एकंदरीतच परंपरागत पद्धती, रिती-भाती, धर्म, कर्मकांड आणि त्याचा प्रभाव, व्यक्तिगत कायद्यांतील स्त्रीपुरुष विषमता, संविधानातील तरतुदी, समता या सर्वांचा विचार करत, चर्चेने न्याय कायदे करणे, असलेल्यात सुधारणा करणे, असे करत राहावे लागणार आहे.

बिल्किस आणि सद्सद्विवेक : स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवी भाषणात १५-८-२०२२ रोजी पंतप्रधान मोदी यांनी 'नारी शक्ती' आणि स्त्रियांचा सन्मान याचे कौतुक केले. आणि त्याच दिवशी इकडे गुजरात सरकारने सामूहिक बलात्कार आणि खून असे गंभीर आरोप सिद्ध होऊन तुरुंगात असणाऱ्या बिल्किसच्या केसमधील ११ गुन्हेगारांना आजन्म कारावासाच्या शिक्षेत सूट देत मुक्त केले. कर्नाटकातील स्त्री संघटना, जनसंघटना आणि सजग नागरिकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत 'बिल्किस बानोच्या गुन्हेगारांना पुन्हा तुरुंगात पाठवा' अशी मागणी करत बिल्किसला न्याय मिळेपर्यंत संघर्ष करण्याचा निर्धार १-९-२०२२ रोजी व्यक्त केला. सह्यांची मोहीम हाती घेतली. कलाकार, लेखक, कामगार संघटना, वकील, पारलिंगी, स्त्री-मानवी हक्क-दलित हक्क संघटना आणि इतर त्यात सहभागी झाले होते. सदसदविवेकबुद्धी असणाऱ्या १०००० नागरिकांनी याचा निषेध करत हा निर्णय रद्द करण्याची मागणी सरन्यायाधीशांना १-९-२०२२ रोजी 'बिल्किसला न्याय द्या' असे जाहीर पत्र लिहून केली. गुजरात दंगलीमध्ये ३-३-२००२ रोजी हा गुन्हा घडला होता. बिल्किस बानो या हल्ल्यातून वाचली आणि म्हणूनच गुजरात

दंगलीत किती अमानुषपणे मुस्लीम नागरिकांना संपवले होते हे सत्य समोर आले.

बिल्किस बानोवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना १५-८-२०२२ रोजी शिक्षा माफ करून गुजरात राज्य सरकारने सोडले. या आधी पॅरोलवर सुटलेल्या या गुन्हेगारांनी पसरवलेल्या दहशतीचे प्रसंग बिल्किसला आठवले. या धक्क्याने सुरुवातीला बिल्किस जवळ जवळ कोलमडली. पण नेटाने तीने स्वतःला सावरले. तिची वकील शोभा गुप्ता यांनी सर्वोच्च न्यायालयात अर्ज केला. दीड वर्षांनी आलेल्या या निकालानुसार गुजरात राज्य सरकारचे हे कृत्य अवैध ठरले व परिणामी गुन्हेगारांना शिक्षा पूर्ण करण्यासाठी पुन्हा तुरुंगात पाठवले गेले. सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल अतिशय महत्त्वाचा होता. बिल्किसने ८-१-२०२४ रोजी तिच्या वकिलांतर्फे एक निवेदन सादर केले. त्यात ती म्हणते, "हे माझ्यासाठी खरोखर नवीन वर्ष आहे. सुटकेचे अश्रू मी ढाळत आहे. मला आणि माझ्या कुटुंबियांना मोकळा श्वास घेता येत आहे. १५-८-२०२२ रोजी मी पूर्ण कोलमडले होते. मला न्याय मिळण्यासाठी असंख्य लोकांनी अर्ज देत समर्थन दिले होते. केवळ माझ्यासाठी नाही तर सर्व स्त्रियांसाठी हा न्याय आहे. कायद्याचे राज्य आणि कायद्यासमोर सर्व समान हीच प्रार्थना माझ्या ओठावर आहे."

बिल्किस आणि निर्भया (ज्योती) यांचे निकाल मे २०१७ मध्ये काही दिवसांच्या अंतराने आले. बिल्किसचे २००२ मधील आणि ज्योतीचे २०१२ मधील प्रकरण. या दोन्ही बलात्काराच्या घटनांना समाजातील सर्व स्तरातून जो वेगळा प्रतिसाद, प्रतिक्रिया आल्या त्याचा अंतर्मुख होऊन अभ्यास करणे गरजेचे आहे.

समारोप : कोणताही आढावा परिपूर्ण असणे अवघड आहे. आधुनिक स्त्री चळवळींच्या पाचव्या दशकाचे शेवटचे वर्ष नुकतेच सुरू झाले आहे. ते संपेपर्यंत अनेक नवीन आव्हानांना सामोरे जावे लागेल. सरणाऱ्या दशकातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवरील काही घटना; स्त्री चळवळींच्या परिषदा, वृत्तांत; अहवाल; आंदोलने, निवेदने, निदर्शने आणि हस्तक्षेप इत्यादी गोष्टी आपण चार भागात पाहिल्या.

समान कामासाठी समान वेतन, कामाच्या जागी योग्य सुविधा, रोजगारासाठी संधी आणि साधनं, नागरिक म्हणून समान हक्क उदा. मतदानाचा हक्क, विना किंवा अल्प मोबदला कामाचे मोल, लिंगाधारित कामाची विभागणी बदलणे, युद्धाला विरोध आणि यासारख्या इतर अनेक गोष्टींसाठी 'भाकरी आणि फुलं' हे गाणं रचणारी स्त्री चळवळ प्रगल्भ होत गेली. आज आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवर लोकशाहीची पीछेहाट; धर्म-जात यांच्या संकुचित अस्मितांवर पोसलेल्या हुकुमशाहीचा वेगाने होणारा प्रसार; कामगार-शेतकरी-आदिवासी-अल्पसंख्याक-दलित-विस्थापित-स्थलांतरित-विशेष क्षमता असणारे, विविध लैंगिक कल असणारे यांच्या हक्कांची वाताहात; युद्ध आणि अनिर्बंध नफा यावर आधारित अमेरिकादी राष्ट्रांची अर्थसत्ता; मोठ्या प्रमाणावर होणारे हवामान बदल; सोशल मिडिया व इतर आभासी जगातील असत्य माहितीचा भडीमार आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या परिणामांचा अंदाज नसणारा रेटा या सारखी आव्हाने उग्र रूप धारण करीत आहेत. अशा बिकट समस्यांचा मुकाबला करण्याचे आव्हान वेगवेगळ्या मार्गाने प्रतिकार करणाऱ्या नागरी समाजातील विविध घटकांना आणि स्त्री चळवळींना पेलायची आहेत. अर्थातच त्यांचा आवाज बुलंद असला तरी दिवसेंदिवस अधिक उग्र आणि जटील होत असलेल्या समस्यांना तोंड देण्यासाठी तो पुरेसा नाही. व्यापक एकजूट, हस्तक्षेप आणि सैद्धांतिक अभ्यास हे सतत करत राहावे लागणार आहे. त्यासाठी गेले अर्धशतकच नव्हे तर आपल्या मागील पिढ्यांनी केलेल्या संघर्षाचा इतिहास जाणून घेणे, वर्तमानातील लढ्यांना समर्थन देणे आणि येणाऱ्या काळासाठी समताधिष्टीत समाज निर्मितीचे स्वप्न पाहणे असे आवर्जून केल्याने सर्वांना उर्जा मिळत राहील. सहकार्य, संवाद, समावेशकता, संघर्ष यातून निर्भय बनण्यासाठी बिल्किस बानो सारख्यांचा निर्धार बळ देत राहील.

स्त्री चळवळींचा १९७५ ते २०२५ या पाच दशकांच्या वाटचालीतील शेवटच्या दशकाचा चार भागातील आढावा सुपूर्द करताना पुन्हा एकदा वाचकांनी यात भर घालावी असे आवाहन करते. वाचकांच्या प्रतिसादाचे व सूचनांचे स्वागत आहे.

जिंदाबाद!

अरुणा बुरटे, *पुणे*
aruna.burte@gmail.com

पुढील अंकात

- विद्या बाळ अध्यासन प्रकल्प-२ : इराणी स्त्री : सुलभा पाटील
- बाईपणाचा अवघड प्रवास : डिंपल हनवते : सारिका उबाळे
- नवीन सदर : नोटबुक : अपर्णा महाजन
- माधव वझे यांना आदरांजली : गजानन परांजपे आणि इतर
- डॉ. जयंत नारळीकर यांच्यावर विशेष लेख
- आणखी बरंच काही ...

विद्या बाळ अध्यासन प्रकल्प - २

स्त्री चळवळ आणि माझी कविता

आसावरी काकडे

आसावरी काकडे

लहानपणापासूनच प्रश्न पडणं आणि त्यावर विचार करणं हा स्वभाव असणाऱ्या आसावरी काकडे या कवयित्री सखीच्या चिंतन गर्भ कविता प्रगल्भ विचारांच्या असतात. तिच्या कविता लेखनाच्या प्रवासाची ही अंतरीची कहाणी आपल्याला अंतर्मुख करणारी आहे

स्त्री-प्रश्नांची आणि ते सोडवण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या चळवळींची ओळख मला प्रथम 'स्त्री' मासिकातून झाली. साधना आणि स्त्री ही दोन नियतकालिके आमच्याकडे येत असत. स्त्री मासिकाच्या समविचारी वाचक-मैत्रिणींना एकत्र आणणाऱ्या 'स्त्री सखीमंडळा'च्या कार्यक्रमांविषयी वाचून मी त्या मंडळाची सभासद झाले. दर महिन्याला होणाऱ्या मिटिंग्जना मी नियमित जायला लागले. घर आणि नोकरी याखेरीज बाहेर पडण्याचं ते आवडतं निमित्त झालं. तिथंच विद्याताईंची ओळख झाली. तेव्हा मी नुकतीच कविता लिहायला लागले होते. एका महिन्याच्या मिटिंगमधे मी एक कविता वाचली होती. त्यातल्या काही ओळी आठवतायत-

'बरं होतं तेव्हा कळत नव्हतं जेव्हा
लिहू वाचू लागलो पडवीमध्ये आलो
आलं गेलं कळलं वाटलं उगीच कळलं....
ज्योतिबा आले कर्वे आले, "बायांनो शिका", म्हणाले
दोघी तिघी झाल्या तयार बाकिच्यांचा त्यांना नकार
एक घराबाहेर पडली दुसरी दारामध्ये अडली...

स्त्री शिक्षणाच्या प्रवासाचा धावता आढावा या कवितेत होता असं आठवतंय... विद्याताईंना ती कविता आवडली. त्यांनी ती 'स्त्री' मासिकासाठी मागून घेतली. यथावकाश ती प्रकाशित झाली. कवितेच्या माध्यमातून स्वतःतून बाहेर पडण्याची, शाळा.. कॉलेज.. अभ्यास.. नोकरी.. घर या परिघापलिकडल्या समाज या घटकाचं भान येण्याची ती सुरुवात होती.

लहानपणी अभ्यासाच्या पुस्तकांखेरीज वाचण्यासारखं आमच्या घरी काही नव्हतं. वडील सतत वाचत असायचे. पण ती पुस्तकं तत्त्वज्ञानाची असायची. आकार आणि आशय दोन्ही स्तरांवर जड असलेली. काहीतरी सांगा म्हणून मी वडलांजवळ गेले की ते मला त्यातलंच काही सांगायचे. नकळत त्या विषयाची आवड आणि जिज्ञासा निर्माण झाली. प्रत्यक्ष जगण्याचा अनुभव येण्याआधीच 'हे सर्व विश्व आलं कुठून', 'त्यात आपलं स्थान काय?', 'आपल्या असण्याचा हेतू काय?' अशा तत्त्वज्ञानातल्या मूलभूत प्रश्नांचे आकर्षण वाटू लागले. त्यांचा पाठपुरावा करावा एवढी कुवत माझ्यात नव्हती. त्या प्रश्नांनी माझ्यात अनाम अस्वस्थता पेरून ठेवली. ती अनावर झाली की मिळेल त्या फटीतून बाहेर पडू लागली. शाळेच्या शेवटच्या परीक्षेत, एसएससीला चारी तुकड्यात पहिली येऊन नॅशनल स्कॉलरशिप मिळवलेली मी अभ्यासातला रस गमावून बसले. कशीतरी बी. कॉम. झाले.

मग नोकरी.. लग्न.. जगण्याच्या अनुभवांना सामोरी जाऊ लागले. आता दुरून पाहताना लक्षात येतंय की खचून जावं असे होते ते अनुभव. पण 'त्या' प्रश्नांनी पेरलेल्या अस्वस्थतेची रेघ इतकी मोठी होती की जगण्यातल्या ज्वलंत प्रश्नांच्या रेघा त्या खाली झाकून जात होत्या. त्या प्रश्नांना मिळतील ती उत्तरं मी निमूट स्वीकारत राहिले. एक प्रकारची बधीरताच होती ती. जगण्याच्या तळाशी 'त्या' प्रश्नांनी पेरलेली अस्वस्थता आणि वर ही बधीरता अशा विचित्र कोंडीत असताना कवितेनं आयुष्यात प्रवेश केला. आणि डायरीतल्या कवितांना बाहेर पडण्यासाठी सखी मंडळाचा मंच मिळाला.

फक्त मंच मिळाला असं नाही. सखी मंडळाच्या मासिक कार्यक्रमांतील चर्चा, बंगलोर, हैदराबाद, भोपाळ, सोलापूर... अशा वेगवेगळ्या शहरांत झालेल्या सखी मंडळाच्या मेळाव्यांमधले विविध कार्यक्रम, विद्याताईंशी होत राहिलेला संवाद या सगळ्यामधून कवितांना वर्तमानातला आज-इथेचा जिवंत आशयही मिळाला. या नव्या परीघातील विचारांनी 'त्या' प्रश्नांची अस्वस्थता धूसर केली. त्यांना उत्तरं देऊन नाही तर त्यांचं स्थान दाखवून. ते प्रश्न मूलभूत महत्त्वाचे असले तरी वास्तवातले आताचे प्रश्न प्राधान्याचे आहेत हे लक्षात आणून देऊन!

विश्वातील आपल्या स्थानाचा, हेतूचा विचार करणारी मी वर्तमानातल्या 'मी'चा विचार करू लागले. भोवतीचं प्रखर वास्तव, त्या संदर्भातलं आपलं कर्तव्य या विचारांनी अस्वस्थ होऊ लागले.

या अस्वस्थतेविषयी स्त्री मासिकाच्या तेव्हाच्या संपादक शांता किर्लोस्कर यांना एकदा पत्र लिहिल्याचं आठवतंय. त्यांचं छान उत्तरही आलं होतं. आता शब्द आठवत नाहीत पण त्यांनी या अस्वस्थतेचं स्वागत केलं होतं. ती कृतीशील व्हायला हवी हे त्या पत्रातून लक्षात आलं होतं.

त्या काळातला एक छोटासा प्रसंग आठवतो. कवितांमध्ये न मावणारं बरंच काही मी डायरीत नोंदवत असे. माझं डायरीलेखन म्हणजे ‘स्वतःशी संवाद साधणारं’ मी चालवलेलं दैनिक होतं. या ‘दैनिका’तल्या निवडक नोंदींचे संकलन ‘मी, माझ्या डायरीतून’ या नावानं अलिकडेच प्रकाशित झालं आहे. त्यातली एक नोंद अशी- ‘संध्याकाळी महर्षी कर्वे संस्थेतल्या कार्यक्रमाला गेले. तिथे नारी समता मंचात काम करणाऱ्या पुष्पा रोडे भेटल्या. त्यांच्याबरोबर तिथल्या हॉस्टेलवर गेले. त्यांनी नोकरीला लावलेल्या एका बाईंना भेटायला. तिची अवस्था पाहून, तिची हकिकत ऐकून अस्वस्थ व्हायला झालं. अशा आणखी किती असतील. अन्याय अत्याचाराची किती भेसूर रूपं असतील. अशा विचारांनी थकायला झालं. मी माझ्या जागी अगदी सुखात असताना, भोवतीच्या अनंत प्रश्नांनी आतल्या आत माझं खचून जाणं ही कदाचित माझ्या सुखाची किंमत असेल. पण त्यांच्यापर्यंत ती पोचती होत नाहीये. या फ्रॉडला काय म्हणावं?’

अशा प्रत्येक अस्वस्थतेत विद्याताईंशी पत्रसंवाद हा मला सापडलेला मार्ग होता. विद्याताई तत्परतेनं आणि छान समजावणारं उत्तर द्यायच्या. त्यामुळे त्यांना पत्र लिहिताना अवघडलेपण यायचं नाही. ‘मी नुसता विचार करते. प्रत्यक्ष काही काम करत नाही. विचार करून नुसतं अस्वस्थ होण्याला काय अर्थ?’ ही रुखरुख मी बोलून दाखवायची तेव्हा त्या मला म्हणायच्या, "विचार करणं ही पण एक कृतीच आहे. ती सगळ्यांना नाही जमत. विचार आणि लेखन बिनकामाचं नाही. त्यातून प्रत्यक्ष काम करणाऱ्यांना बळ आणि दिशा मिळते. अस्वस्थ विचारांनी निष्क्रीय होण्यापेक्षा जमतं ते प्रामाणिकपणे करत राहाणं केव्हाही चांगलं." मग मी निरंकुश उमेदीने लेखनाकडे वळले. वेळोवेळी विषय देऊन विद्याताईंनी मला लिहितं ठेवलं. आता गीतालीताई पण हे काम करत आहेत.

हळूहळू लेखन हा माझा परीघ विस्तारणारा मार्ग झाला. लेखन म्हणजे कविताच. क्वचित लेख. वेगवेगळ्या संदर्भात कुणाकुणाला पत्र लिहिणं आणि डायरीलेखन... एवढंच. पण कुठल्या ना कुठल्या प्रकारे लिहित राहाणं ही माझी गरज होती. आजही आहे. मी नुसतं कधी वाचू शकत नाही. वाचताना समांतर विचार येत राहतात. काही पाहिलं, ऐकलं, अनुभवलं की त्या संदर्भात प्रश्न पडणं, त्यावर विचार होणं हा माझा स्वभाव आहे. विचारांचं ओझं पेलवेनासं झालं की ते मी शब्दांवर सोपवते. निराकार विचार शब्दांत उतरताना स्पष्ट होतात. विचारात न आलेलं, अव्यक्त राहिलेलं लिहिता लिहिता शब्दात उतरतं. बरेचदा प्रश्न स्पष्ट होण्यातूनच आपले आपल्याला खुलासे मिळतात. ही लेखन-प्रक्रिया अनुभवण्यासारखी आहे. समज आल्यापासून मी हे करतच होते. पण घर आणि नोकरी या परिघातून बाहेर पडून सखी मंडळात आल्यावर माझं विचारविश्व विस्तारत गेलं. कविता लिहिण्यापूर्वीचं मौन प्रवाही झालं.

मनात अनाम अस्वस्थता पेरणाऱ्या ‘त्या’ तात्त्विक प्रश्नांचं बोट सोडून मी वर्तमान वास्तवात रमू लागले. तेव्हा मी स्टेट बँकेत नोकरी करत होते. बँकेत जाण्यासाठी लूना घेतली होती. वयाच्या पस्तिसाव्या वर्षी लूना चालवायला शिकले. पर्वतीजवळ घर आणि ऑफिस ससून हॉस्पिटलजवळ. एवढं अंतर लूनावर जा-ये करणं हा मी माझ्या शारीरिक, मानसिक कमजोरीवर मिळवलेला विजय होता. सकाळी साडेनऊला बाहेर पडून संध्याकाळी साडेसहापर्यंत घरी हे रूटीन छान बसलं होतं. एके दिवशी बँकेतलं काम संपायला उशीर झाला. अंधार पडायला लागला. लूनावर जायची भीती वाटायला लागली. पण पर्याय नव्हता. बाहेर पडले. धीर गोळा करून लूना सुरू केली आणि निघाले. रोजची ठरलेली वाट सहज पार करता आली. घरी सुखरूप पोचले. आधी भीती वाटली होती. पण प्रत्यक्षात सहज जमलं. हे काही फार मोठं धाडस नव्हतं. पण वेगवेगळ्या कारणांनी आलेल्या माझ्या मर्यादांना मला ओलांडता आलं याचा आनंद झाला. स्वसामर्थ्याची ओळख करून देणारा तो उत्कट आनंद कविताबद्ध झाला-

‘तुझ्या दिव्याचा लख्ख उजेड
नसतानाही
वाट स्वच्छ दिसते आहे!
संधीप्रकाशासारखा
तुझाच उजेड
अजून रेंगाळतोय?
की
मी स्वयंप्रकाशी आहे?’

अनुभव छोटा असला तरी त्यातून मिळालेला ‘स्वयंप्रकाशी असू शकण्याचा’ प्रत्यय महत्त्वाचा आहे. या कवितेत तो अधोरेखित झाला आहे.

मिळून साऱ्याजणी मासिक १९८९ साली सुरू झालं. ऑगस्टच्या पहिल्याच अंकात माझ्या ‘प्रिय सखी’ या कवितेला स्थान मिळालं. छोट्या सुखवस्तू परिघात रमलेल्या मनाला त्यातून बाहेर पडण्यासाठी साद घालणाऱ्या सखीला उद्देशून लिहिलेल्या या कवितेने माझ्यासह अनेकांना प्रेरणा दिली. आकाशवाणी दिल्ली तर्फे आयोजित, जयपूर येथे झालेल्या सर्वभाषी कवीसंमेलनात या कवितेची निवड झाल्यामुळे या कवितेचा सर्व भारतीय भाषांमधे अनुवाद झाला. ही कविता वाचकांच्या स्मरणात राहिलीय. अजून कुणी कुणी या कवितेचा शोध घेत माझ्यापर्यंत पोचतं! ही कविता फक्त स्त्रियांना अंतर्मुख करते असं नाही. **(पान ३५ वर)**

एकेक दीप विझू विझू...

विनोबांच्या मानसकन्या: कालिंदीताई

सुभाष पाटील

राष्ट्राच्या उन्नतीसाठी सर्वोदयी भारताच्या उभारणीचं स्वप्न असणाऱ्या गांधी विनोबा यांच्या वैचारिक समृद्धीचा महामार्ग दाखवणाऱ्या कालिंदीताई यांचं दुःखद निधन झालं. सामान्य कार्यकर्त्यांपासून विद्वान अभ्यासकांपर्यंत सर्वांना आश्वस्त करणारं जीवन कालिंदीताई जगल्या. एका प्रामाणिक कार्यकर्त्यांनी जागवलेल्या त्यांच्या या हळव्या आठवणी! कालिंदीताईंच्या तेजस्वी स्मृतीला साऱ्याजणीची प्रेमांजली!

दि. ७ एप्रिल २०२५ च्या रात्री रोजच्या प्रमाणे मी झोपलो होतो. रात्री साडे बारा वाजता जाग आली. किती वाजले म्हणून मोबाईल बघताना रात्री साडे अकरा वाजता आदरणीय कालिंदीताईंच्या मृत्यूच्या बातमीचा पवनारहून आलेला मेसेज पाहिला. आणि त्यांच्या आठवणीमध्ये मी हरवून गेलो, त्यांच्या सर्वच आठवणी आमच्या जीवनाला अज्ञान निद्रेतून जागृत करणाऱ्या आहेत. त्यांच्या या सर्वच आठवणी देशभरातील सर्वोदयी कार्यकर्त्यांशी व सर्वोदय कार्याशी निगडीत असत.

जन्मदात्या मातापित्यांप्रमाणे विनोबांचा कालिंदीताईंवर खूप विश्वास होता. कालिंदीताईंनीही या विश्वासाला अंतिम श्वासापर्यंत प्रामाणिकपणे समर्थतेने सांभाळले. हे आम्ही गांधी-विनोबांचे कार्यकर्ते खूप जवळून पाहिले-ओळखले-समजले हे आमचे महाभाग्य आहे.

विनोबांनी ब्रह्मविद्या मंदिर आश्रमाच्या भगिनी आणि देश दुनियेतील भगिनींकडून अपेक्षा ठेवली की भगिनींमधून आद्य शंकराचार्याप्रमाणे भगिनी निघावी आणि शास्त्रांची निर्मिती करावी. विनोबा ऋषी होते, ऋषी विनोबांनी अपेक्षा केली आणि त्यांची अपेक्षा पूर्ण झाली नाही असे कधी होत नाही. कालिंदीताईंनी विनोबांच्या मानसकन्या बनून विनोबांच्या अपेक्षा शतप्रतिशत पूर्ण केल्या आहेत. हेच कालिंदीताईंच्या समग्र जीवनाचे सार आहे. विनोबांचा पूर्ण प्रभाव कालिंदीताईंच्यात अंतर्बाह्य उमटला आहे. हे कालिंदीताईंवर असलेल्या विनोबांच्या कृपाशीर्वादाची ओळख आहे.

गांधी - विनोबांचे नाते राष्ट्राच्या उन्नतीचे होते. त्याप्रमाणे विनोबा - कालिंदीताईंचे जिव्हाळ्याचे नाते होते. हे नाते सर्वोदयी भारताच्या उभारणीचे आहे. या नात्यात दुनियेला वैचारिक समृध्दीचा महामार्ग मिळतो. अशा थोर पंडिता कालिंदीताईंचा भरभरून स्नेह आम्हां गांधी-विनोबांच्या कार्यकर्त्यांना लाभला आहे. यात सारे काही भरभरून मिळाले आहे,

भूदान चळवळीवेळी विनोबा भावे यांच्याबरोबर कालिंदीताई

सन ८६ - ८७ मध्ये कालिंदीताई गागोद्यासाठी एक स्वप्न घेऊन एक वर्षभरासाठी गागोद्यात राहायला आल्या. मी विनोबा महानिर्वाणानंतर सन १९८३ पासून विनोबांचा जन्मजिल्हा म्हणून रायगडमध्ये कर्जतच्या आदिवासी भागात कुष्ठसेवेचे व इतरही सामाजिक काम करत होतो. मला कालिंदीताईंनी घाटकोपर गोरक्षा सत्याग्रहात आदरणीय अच्युतकाकांकडे बोलावून घेऊन म्हणाल्या, "मी एक वर्ष गागोद्यात द्यायचे ठरवले आहे, तुझ्या बहीणीला-महानंदाला माझ्यासोबत ठेव." अच्युतकाकांचीही हीच इच्छा होती. तेव्हा मी ही सुवर्णसंधी समजून महानंदाला वर्षभर कालिंदीताईंच्या सान्निध्यात ठेवले. कालिंदीताईंचे सान्निध्य म्हणजे आमच्यासाठी साक्षात विनोबा सान्निध्यच होते. यावेळी वर्षभरात मीही मनात येईल तेव्हा गागोद्यात जात असे. त्यामुळे मलाही त्यांच्या सान्निध्य लाभाचे धनी होता आले.

ताईंचे पुणे नगरीत, ज्ञानदेवांच्या आळंदीत व्याख्यानांचे आयोजन केले होते. तेव्हा मी या दोन्ही ठिकाणच्या व्याख्यानांना कर्जतहून आवर्जून गेलो होतो. ताईंच्या वाणीत व लेखणीत विनोबांच्या कृपेच्या वाणीचा स्पर्श जाणवतो.

विनोबांच्या सान्निध्यात संपूर्ण जीवन समर्पित केलेल्या ताईंचा विनोबा साहित्याचा अभ्यास खूप सूक्ष्म होता. त्यांच्या सर्वच साहित्याचे प्रकाशन - संपादन तसेच मैत्री पत्रिकेचे संपादन यावर ताईंचे बहुमोलाचे मार्गदर्शन त्यांच्या अंतिम श्वासापर्यंत मिळत होते.

ताईंनी लेखन, संपादन केलेल्या प्रसिद्ध साहित्याची यादी.

प्रेमपंथ अहिंसेचा, अभंग जीवन-व्रत, स्नेह-सान्निध्य, गीतेतील परिसाच्या संगतीत, ज्ञानेश्वरी ओव्यांच्या सहवासात, सर्वशक्तिदायीनी पदयात्रा, विनोबांची पूर्व पाकिस्तान भूदान - पदयात्रा, इस्लामचा संदेश, ज्ञानोबा माऊली, तुका आकाशाएवढा, महामानव विनोबा, ऐसी जीवनाची कळा.

मैत्री या विनोबा आश्रमाच्या पत्रिकेच्या ४० वर्षे संपादिका.

यातील पुस्तकांचे इतरही इंग्रजी-हिंदी भाषेत अनुवाद झाले आहेत. यातील प्रेमपंथ अंहिसेचा या पुस्तकाच्या इंग्रजी अनुवादित Moved by Love या पुस्तकाच्या नावाने या पुस्तक चाहत्यांनी एक व्हॉट्स ॲप ग्रुपही केला आहे.

पवनार आश्रम व आश्रमाच्या भगिनी, विनोबा; परंधाम आश्रमीय कार्यकर्ते इत्यादी विषयावर मी काही लिहीलेले दरवर्षी मित्र मिलनात आश्रमात गेल्यावर कालिंदीताईंना वाचून दाखवत असे, यासाठी खास वेळ देऊन ऐकून आपले मत त्या सांगत. त्यांचा अभिप्राय मला आश्वस्त करणारा असे. सामान्य कार्यकर्त्यांपासून ते विद्वान अभ्यासकांना आश्वास्त करणारे असेच त्यांचे समस्त जीवन होते. कालिंदीताईंना भावपूर्ण आदरांजली!

सुभाष वि.पाटील, *कर्जत जि. रायगड*

(पान ७ वरून) त्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी त्यांच्या वातावरणाशी संवाद साधतात. त्यांनी सक्रिय आकलन विकसित करून ही संकल्पना संगणकात रूपांतरित करण्याचा प्रयत्न केला, तिने असे एक फ्रेमवर्क बनवले जेथे यंत्रे त्यांचे दृष्टिकोन बदलू शकतात, त्यांचे सेन्सर समायोजित करू शकतात आणि त्यांची समज सुधारण्यासाठी आजूबाजूच्या वस्तूंशी गतिशीलपणे संवाद साधू शकतात (आजची सेल्फ ड्रायविंग कार याच गृहितकावर चालते). रुझीनेने शोधलेली ही 'सक्रिय आकलन प्रक्रिया' म्हणून संवेदनाक्षम माहिती मिळवण्यासाठी आणि त्याचा अर्थ लावण्यासाठी रोबोटच्या हालचालींचे महत्त्व अधोरेखित करते.

१९७० च्या दशकातील या तिच्या मूलभूत संशोधनामुळे रोबोटिक आकलन आणि नियंत्रण प्रणालींच्या विकासावर रुझीनेचा लक्षणीय प्रभाव पडला आहे. या दृष्टिकोनाने निष्क्रिय आकलन मॉडेलपासून एक वेगळी वाट चोखाळली, ज्यामुळे अधिक कार्यक्षम आणि अनुकूल रोबोटिक प्रणाली शक्य झाल्या. संगणक दृष्टी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील प्रगतीसाठी तिचे हे कार्य पायाभूत ठरले आहे. सक्रिय आकलना व्यतिरिक्त, बायची हिने वैद्यकीय इमेजिंगमध्ये, विशेषतः लवचिक जुळणी अल्गोरिदमच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. हे अल्गोरिदम वेगवेगळ्या वैद्यकीय प्रतिमांचे संरेखन करण्यास मदत करतात, ज्यामुळे अधिक अचूक निदान आणि उपचार नियोजन शक्य होते. बायची यांच्या नवकल्पनांचा शैक्षणिक आणि औद्योगिक दोन्ही क्षेत्रांवर मोठा प्रभाव पडला आहे.

१९७८ मध्ये, तिने पेनसिल्व्हेनिया विद्यापीठात जनरल रोबोटिक्स, ऑटोमेशन, सेन्सिंग आणि परसेप्शन (GRASP) प्रयोगशाळेची स्थापना केली. तिच्या नेतृत्वाखाली, GRASP प्रयोगशाळा रोबोटिक्स संशोधनाचे एक अग्रगण्य केंद्र बनली, जिथे अभियंते, संगणक शास्त्रज्ञ आणि संज्ञानात्मक शास्त्रज्ञ यांच्यात आंतरविद्याशाखीय सहकार्याला प्रोत्साहन मिळाले. रुझीनेने महिलांनी तंत्रज्ञान क्षेत्रात यावे म्हणून मुद्दाम खूप प्रयत्न केले. तिच्या मार्गदर्शनाने अनेक विद्यार्थ्यांना, विशेषतः महिलांना तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीमध्ये करिअर करण्यासाठी प्रेरित केले आहे. तिच्या नवकल्पना आजही अत्यंत समर्पक आहेत. सक्रिय आकलनाची संकल्पना स्वयंचलित कार आणि ड्रोनसह स्वायत्त प्रणालींच्या डिझाइनवर प्रभाव टाकत आहे.

१९८० च्या दशकात, संगणक विज्ञानात महिलांची संख्या वाढू लागली. या काळात, महिलांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विज्ञान आणि सॉफ्टवेअर अभियांत्रिकीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी स्पार्क जोन्स आणि बायची यांच्यासारख्या अग्रणी संशोधकांचे कार्य पुढे नेले ज्याची चर्चा आपण पुढील भागात करणार आहोत.

चिन्मय गवाणकर, *वसई*

chinmaygavankar@gmail.com

मिळून साऱ्याजणी मासिक आवडतं... पण परवडत नाही का?

होतकरू विद्यार्थी- विद्यार्थिनी, बचत गट सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, गृहिणी, ज्या ज्या कुणाला मिळून साऱ्याजणी मासिक आवडतं पण परवडत नाही त्यांना फक्त ३५० रुपयात वर्षभर अंक घरपोच मिळेल. ज्यांना काहीच पैसे भरणे शक्य नाही, त्यांनी ९८२२७४६६६३ वर आपलं नाव, पत्ता, फोन नंबर व्हॉट्सॲप करावा. मासिकात असलेला विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावा असा आमचा हा प्रयत्न आहे.

अंक ऑनलाईन विक्रीसाठी MAGZTER वरही उपलब्ध आहे. याचा जरूर लाभ घेत मासिक नव्हे चळवळ ... याच्याशी जोडून घ्या ही प्रेमाग्रहाची विनंती!

- संपादक -

भारतीय पुरुषत्वाचा समाजशास्त्रीय धांडोळा

मंगेश कुलकर्णी

स्त्रियांवरच्या हिंसाचार, अत्याचाराच्या समस्या सोडवताना पुरुषत्व म्हणजे काय आणि ते कसं घडवलं जातं हे समजून घेणे अत्यावश्यक असतं. म्हणूनच आधुनिक भारतीय पुरुषत्व आणि नागर संस्कृती यांचा वेध घेताना संजय श्रीवास्तव यांनी इतर देशीय सामाजिक वास्तवाच्या महत्त्वपूर्ण पैलूंवर केलेल्या मौलिक भाष्यामुळे त्यांच्या मस्क्युलिनीटी, कंझ्युमॅरिझम अँड पोस्ट नॅशनल सिटी हा ग्रंथ अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे. या ग्रंथाचा परिचय साऱ्याजणीचे स्नेही मंगेश कुलकर्णी यांनी अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने करून दिला आहे. जरूर वाचा

लंडन विद्यापीठातील ब्रिटीश ॲकॅडमी ग्लोबल प्रोफेसर संजय श्रीवास्तव ह्यांनी गेली तीस वर्षे भारतातील पुरुषत्वाच्या विविध नागर आविष्कारांचा समाजशास्त्रीय धांडोळा घेऊन त्या आधारे विद्याक्षेत्रीय तसेच वर्तमानपत्रीय स्वरूपाचे विपुल लेखन केले आहे. शिवाय त्यांनी माहितीपटही निर्मिले आहेत. सदर वैचारिक प्रकल्पातून प्राप्त झालेल्या अंतर्दृष्टी त्यांच्या मॅस्क्युलिनिटी, कन्झ्यूमॅरिजम अँड द पोस्ट नॅशनलसिटी (केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, २०२२) या ग्रंथामध्ये साररूपाने उपलब्ध आहेत. श्रीवास्तवांच्या लेखनात शास्त्रशुद्ध तथ्य संकलन, सैद्धांतिक व्यासंग, काटेकोरपणा, कल्पकता आणि समानुभूती यांचा मनोज्ञ मिलाफ आढळतो.

या ग्रंथातील मांडणीच्या केंद्रस्थानी असलेल्या काही कळीच्या संकल्पना आणि विषयसूत्रे पुढीलप्रमाणे.

पुरुष असणे म्हणजे काय? या विषयीच्या समाज निर्मित वर्तनात्मक आणि देहलक्ष्यी संकेतांचा तसेच व्यवहारांचा समुच्चय म्हणजे 'पुरुषत्व'. जेथे सामाजिक अस्मिता घडतात आणि अभिव्यक्त होतात तो 'पैस'. भारतीयत्व राखण्याचे चिंतायुक्त व्यवधान बाळगून उपभोग परतेचा सक्रीय पाठपुरावा करण्याची प्रवृत्ती 'नैतिक उपभोगवाद' या संज्ञेतून सूचित होते. अशा उपभोगवादाशी संबंधित खासगीपणा व व्यक्ती परायणता जोपासणाऱ्या संस्कृती, तद्जन्य आकांक्षा आणि त्यांचा राष्ट्रभावनांशी असलेला अनुबंध दर्शविण्यासाठी 'उत्तर राष्ट्रवाद' ही संकल्पना योजली आहे.

नव्वदीच्या दशकात श्रीवास्तव ह्यांनी डेहराडून येथील डून स्कूल या १९३५ मध्ये स्थापन झालेल्या केवळ मुलांसाठीच्या प्रख्यात निवासी शाळेचा सांगोपांग अभ्यास केला. ही शाळा इंग्लंडमधल्या पब्लिक स्कूलच्या धर्तीवर बेतलेली असूनही निव्वळ एक प्रतिकृती नव्हती. प्रत्येक विद्यार्थ्याचे शरीर, बुद्धी आणि चारित्र्य यांची राष्ट्र उभारणीच्या कार्यास अनुरूप जडणघडण करणे हे या शाळेचे मुख्य उद्दिष्ट होते. विवेकनिष्ठता, धर्मनिरपेक्षता व महानगरी संवेदनशीलता ही आदर्श नागरिकत्वाची सांस्कृतिक गुणवैशिष्ट्ये असल्याची धारणा या कार्यक्रम पत्रिकेस पायाभूत होती. श्रीवास्तव ह्यांच्या मते डून स्कूल हे वसाहतवादाच्या दीर्घ छायेत उदयाला आलेल्या राष्ट्रीय संस्था प्रणालीचे प्रारूप असून या शाळेच्या मुशीत घडलेले अभिजनवादी पुरुषत्व भारतीय समाज-वास्तवाशी विसंगत होते.

विसाव्या शतकाच्या संधिकाळामध्ये देशात घडलेल्या स्थित्यंतरांमुळे डून स्कूलने स्वीकारलेला नागरिकत्वाचा आदर्श भंग पावला आणि त्याचबरोबर हिंदू बहुसंख्यांकवादाचा व्यापक प्रसार झाला. या परिवर्तनातून नागरी पैसात अवतरलेले पुरुषत्वाचे आणि धार्मिकतेचे आविष्कार व त्यांच्यातील आंतरसंबंध हा श्रीवास्तवांच्या आस्थेचा विषय आहे. बजरंग दल या कट्टर उजव्या संघटनेचे सदस्य असलेल्या युवकांवरील त्यांचा लेख याची प्रचीती देतो. नागर समाजातील ह्या युवकांच्या जीवनाचे विविध पैलू संदर्भ तपासून श्रीवास्तव असा निष्कर्ष काढतात की केवळ 'हिंदू राष्ट्रावादाचे वाहक' म्हणून त्यांची संभावना करणे अयोग्य ठरेल. त्यांच्या पुरुषी अस्मितेची रचना व तिचे विखंडीत स्वरूप, तसेच पुरुषीसत्ता निर्मितीतील नव्या उपभोग-संस्कृतींची महत्त्वाची भूमिका यांकडे ते लक्ष वेधतात.

हिंदी चित्रपट हा आधुनिक भारतीय जनसंस्कृतीचा आणि सामूहिक जाणिवेचा एक प्रमुख निर्धारक आहे. स्वाभाविकपणे श्रीवास्तव या चित्रपटांमधून प्रतीत होणाऱ्या पुरुषत्वाच्या आविष्कारांची चिकित्सा करतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या दोन दशकांत हिंदी चित्रपटांचा नायक सहसा 'पंचवार्षिक योजनांचा

अध्वर्यू' या स्वरूपात दिसतो असे निरीक्षण ते नोंदवतात. योजनाबद्ध विकासाच्या तत्कालीन राष्ट्रीय प्रकल्पाला उपकारक अशा पुरुषत्वाचे तो प्रतिनिधित्व करतो. नागरी सुसंस्कृतपणा, विज्ञान/तंत्रज्ञान यांतील पारंगतता, मितव्ययी वृत्ती, राष्ट्रउभारणीच्या कार्याप्रतीची प्रतिबद्धता हे गुण त्याच्या ठायी आढळतात. मात्र १९७० च्या दशकात एक नवी नायक-प्रतिमा उदयाला आल्याचे जाणवते. निमशहरी पार्श्वभूमी असलेला, अन्याय्य व्यवस्थेशी झगडणारा हा 'संतप्त तरुण' अमिताभ बच्चनने यशस्वीपणे साकारला व उदंड लोकप्रियता मिळवली. राज्यसंस्थेविषयीचा अविश्वास, उपभोगवादाचे आकर्षण आणि उत्तर राष्ट्रवादाची भुरळ हे ह्या नायकाचे गुणविशेष भावी जनसंस्कृतीचे द्योतक ठरतात.

पारंपरिक उपचार पद्धतींद्वारे लैंगिक समस्या सोडवण्याचा दावा करणारे दवाखाने दिल्ली, मुंबई व इतर शहरांमध्ये आढळतात. त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात निम्नस्तरीय पुरुषांचा राबता असतो. आरोग्यविषयक व्यावहारिक सल्ला देणाऱ्या ह्या दवाखान्यांमध्ये ग्राहकांच्या लिंगभाव अस्मितांविषयी ज्या चर्चा होतात तत्संबंधी ज्या ज्ञानप्रक्रिया घडतात त्यांचा नेटका अभ्यास श्रीवास्तव ह्यांनी केला आहे. पदपथावर विकल्या जाणाऱ्या कामोद्दीपक साहित्यातून दृग्गोचार होणाऱ्या शहरी जीवनाबद्दलच्या पुरुषी कल्पनारतींची चिकित्सा देखील त्यांनी केली आहे. उपभोग-संस्कृती आणि 'आधुनिक' स्त्रीविषयीची भयमिश्रित लाल साह्यांच्या मुशीत घडलेल्या पुरुषत्वाचे स्वरूप त्यातून स्पष्ट होते.

हिंदी चित्रपटांप्रमाणेच त्या भाषेतील गुप्तचर कथा लोकप्रिय आहेत. पण अभ्यासकांनी त्यांच्याकडे पुरेसे लक्ष दिल्याचे दिसत नाही. या पुरुषप्रधान, प्रायः नागरकेंद्री साहित्याचे महत्त्व श्रीवास्तव जाणतात. वेदप्रकाश शर्मा (१९५५-२०१७) ह्या बहुप्रसव व मोठा वाचक वर्ग असलेल्या लेखकाच्या दोन कादंबऱ्यांचे विवेचन करून त्यांतील लैंगिकतेच्या आशयसूत्राचे 'ब्रह्मचर्य' आणि तथाकथित 'स्थिर भारतीय कुटुंबव्यवस्था' या रूढ कल्पनांशी असलेले साहचर्य ते अधोरेखित करतात. जागतिकीकरणाच्या जमान्यातील उपभोगप्रधान आधुनिकता आणि 'पारंपरिक' नीतिमत्ता यांची सांगड घालून या कादंबऱ्या नागर पुरुषत्वाला पाठबळ देतात.

समकालीन नागर स्त्रिया सार्वजनिक अवकाशात वावरतात आणि ठरावीक उपभोगवादी व्यवहारांमध्ये सामील होऊ शकतात. मात्र हे करत असताना पुरुषी वर्चस्व आणि नियंत्रण यांपासून त्या मुक्त नसतात. या पार्श्वभूमीवर श्रीवास्तव स्त्रियांच्या सुरक्षेसाठी योजलेल्या उपाययोजनांची चिकित्सा करतात. व्यामिश्र सामाजिक समस्यांतून सुरक्षाविषयक आव्हाने निर्माण होतात याकडे दुर्लक्ष करून सुयोग्य तंत्रज्ञानातून त्यांचे निराकरण होईल असे मानण्याकडे साधारणतः कल असल्याचे ते दाखवतात. नागर जीवनासंबंधीच्या पुरुषी मनोविश्वातील तंत्रकेंद्री कल्पितादर्श आणि नैतिक उपभोगवाद विषयक धारणा यांची गुंफण यातून नजरेसमोर येते.



इथवर चर्चिलेली बहुतांश आशय सूत्रे पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांच्यावरील लेखात एकवटली आहेत. गेल्या दशकात मोदींची एक प्रतिमा देशाच्या सार्वजनिक जीवनात केंद्रस्थानी विराजमान झाली. ती घडवण्यात त्यांचा सक्रीय सहभाग तर आहेच; शिवाय प्रसारमाध्यमे आणि निवडणूक मोहिमा यांचे देखील या प्रतिमा निर्मितीत लक्षणीय योगदान आहे. तिच्यातून मोदींची शक्तिशाली, गतिमान मर्दानगी अधोरेखित होते; तसेच सुरक्षा, कार्यक्षमता व सुबत्ता यांची ग्वाही मिळते याकडे श्रीवास्तव निर्देश करतात. पुरुषत्वाच्या या मोदीप्रणीत प्रतिमानात जुन्या भारतीय पुरुषी परिभाषितांना कलाटणी दिली आहे आणि वेगाने बदलणाऱ्या नागर जीवनात उद्भवणाऱ्या आकांक्षा वंचिता यांची दखल घेतली आहे. पुरुषत्व, नागर समाज आणि भांडवल यांचे परस्परसंबंध जाणण्यासाठी उत्तर राष्ट्रवाद व नैतिक उपभोगवाद या संकल्पना कशा प्रस्तुत ठरतात ते या प्रतिमा- चिकित्सेतून प्रतीत होते असे श्रीवास्तव ह्यांचे प्रतिपादन आहे.

आधुनिक भारतीय पुरुषत्व आणि नागरसंस्कृती यांचा वेध घेताना श्रीवास्तव ह्यांनी एतद्देशीय सामाजिक वास्तवाच्या महत्त्वपूर्ण पैलूंवर मौलिक भाष्य केले आहे. त्यांच्या संशोधनपर लेखनातून समाजशात्रीय चिकित्सेचा एक वस्तुपाठ निष्पन्न होतो व त्यापासून अनेक समानधर्मी अभ्यासकांना चालना मिळाली आहे. सदर ग्रंथ परिचयात त्यातील काही ठळक मुद्द्यांचा धावता आढावा घेतलेला आहे. तो वाचून मूळ ग्रंथ संपदेविषयी कुतूहल जागृत झाल्यास ह्या टिपणाचा हेतू साध्य झाला असे म्हणता येईल.

मंगेश कुलकर्णी, *पुणे*
mangshra@yahoo.co.in

मानसशास्त्र: विचार, व्यवहार आणि स्त्रीचळवळ – समारोप लेख ५

डॉ. साधना नातू

लिंगभाव आणि स्त्रीवादी परिप्रेक्ष्य हे प्रमुख प्रवाही मानसशास्त्राला कशी टक्कर देऊ लागले? प्रश्न विचारू लागले आणि स्त्री चळवळीच्या रेट्यातून आलेले स्त्रीवरची हिंसा, शोषण, खाजगी आणि सार्वजनिक अवकाशातला स्त्री पुरुष भेदभाव व त्याचे मनोसामाजिक परिणाम असे अनेक प्रश्न ऐरणीवर कसे आले ते सोडवण्यासाठी काय प्रयत्न झाले याचा सखोल ऊहापोह करणारी ही लेखमाला स्त्री चळवळीतल्या कार्यकर्तीच्या संपन्न अनुभव आणि अभ्यासातून साकार झाली आहे. आपल्या जगण्याशी या लेखांचं नातं काय आहे हे उलगडून बघण्याचा प्रयत्न केला असेल तर आम्हाला जरूर कळवा.

पाश्चिमात्य जगात प्रमुख प्रवाही मानसशास्त्रातील विचार आणि व्यवहाराला स्त्री चळवळीने, इतर सामाजिक चळवळींनी दिलेल्या टक्करीमुळे व उपस्थित केलेल्या प्रश्नांमुळे काही ठळक बदल व सुधारणा झाल्या. यांचा उल्लेख मी मागच्या चार लेखांमध्ये केलेला आहे. पण त्यातील काही उल्लेखनीय बाबींची दखल या समारोपाच्या लेखांमध्ये घेत आहे.

उदाहरणार्थ २०२० मध्ये ब्लॅक लाईव्ह मॅटर ही चळवळ जेव्हा तीव्र झाली तेव्हा त्याचे पडसाद अमेरिकन सायकॉलॉजी असोसिएशनच्या धोरणांमध्ये जाणवले. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या वेबसाईटवर लगेच उमटले. १९९५ पासून, म्हणजे आपण भारतात इंटरनेट वापरायला लागलो तेव्हापासून ही वेबसाईट आणि त्याच्या आधारे मिळणारी माहिती मी वाचत आले आहे. अचानक या वेबसाईटवर ब्लॅक सायकॉलॉजीचे समर्थन तसेच ब्लॅक सायकॉलॉजीतील अनेक संशोधन, शोधनिबंध व ब्लॅक लाईव्ह मॅटर या मोहिमेला समर्थन; हे वाचायला मिळाले. काय हा चमत्कार! याचा अर्थ स्पष्ट होता, अमेरिकन सायकॉलॉजी असोसिएशनला जर वर्णभेदी ठरायचे नसल्यास हे समर्थन करणे आवश्यक बनले होते! हे टोकनीझम असले तरी एक पाऊल पुढे गेले असेच म्हणावे लागेल.

दुसरे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे संशोधनातील लैंगिक भेदभाव दर्शवणारी भाषा वर्ज्य करण्याचे नियम अधिक कडक करण्यात आले. मागचा इतिहास बघता ही पाश्चिमात्य जगातील स्त्रीवादी मानसशास्त्रज्ञांनी उठवलेल्या आवाजाचा व तीव्र निषेधाचा परिपाक म्हणावा लागेल.

स्त्री विरोधी (misogynist) व समलिंगी तसेच पारलिंगी विरुद्ध (homophobic) लिखाण, संशोधन व विचार, व्यवहार या करताही निर्बंध व नियम प्रमुख राष्ट्रीय संस्थांनी घालून दिले. याच्यामागे अनेक वर्षांपासून स्त्री चळवळ तसंच समलिंगी व पारलिंगी व्यक्तींची चळवळ, संशोधक व संस्था संघटनांनी केलेला तीव्र संघर्ष होता.

प्रमुख प्रवाही मानसशास्त्रातील विचार, व्यवहार व धोरणांवर त्यामुळे आपोआपच एक अंकुश बसले. आता एकतर त्यांनीच बदल करून सर्वंकष बनवलेले हे नियम त्यांना पाळावे लागतील किंवा न पाळल्यास त्याच्याकरता जाहीर मानखंडना कबूल करून घ्यावी लागेल. स्त्री विरोधी, वंशिक गटांच्या विरोधी, समलिंगी व पारलिंगी व्यक्तीविरोधी धोरण आणि काम आता लपून राहण्यासारखे नव्हते तर ते जाहीररीत्या एक्सपोज होणार होते! असा बराच लांबचा पल्ला गाठला गेला.

(IUPsyS) International Union of Psychological Sciences ही मानसशास्त्राची जागतिक शिखर संस्था मानली जाते. याची स्थापना १८८९ मध्ये झाली. जगभरातील ९३ देश याचे सभासद, ज्यामध्ये १९५१ पासून भारतही आहे. अर्थातच जगातील विविध स्थित्यंतर सामाजिक व परिवर्तनवादी चळवळी यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम इथेही दिसून येतात. दर चार वर्षांनी इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ सायकॉलॉजी ही शिखर संस्था भरवते. पहिल्या शंभर वर्षात ही काँग्रेस युरोप बाहेर भरवली गेलीच नाही.

मागच्या ५० वर्षातही काँग्रेस आशिया खंडातील देश, आफ्रिका खंडातील देश अशी इतरत्र भरवली गेली आहे. काही स्थित्यंतर आणि सकारात्मक बदल निश्चित दिसतात. पण आजही ओढा गोऱ्या, पाश्चिमात्य जगातील अभ्यास, व्यक्ती, त्यांची जीवनशैली

यांना केंद्रबिंदू मानतो असे दिसते. रोचक भाग असा आहे की ग्लोबल साऊथ म्हणजेच भारत, दक्षिण आफ्रिका, कॅरेबियन आयलंड इत्यादी देशांची व तिथे होणाऱ्या मानसशास्त्रावरच्या कामाची दखल आता घेतली गेली आहे; नव्हे घ्यावीच लागली आहे.

दीडशे वर्षात पहिल्यांदा २०१६ मध्ये पेममारास ही पहिली महिला अध्यक्ष बनली. ही ब्रिटिश मानसशास्त्रज्ञ आहे. खेदाची बाब अशी आहे की हे पण टोकनीझम होते. २०२० ची काँग्रेस कोविड महामारीमुळे ऑनलाईन झाली. त्यामध्ये तिचे अध्यक्षीय भाषण तसंच चार वर्षांमधील धोरणात्मक प्रगती ही अतिशय सुमार होती. या काँग्रेसमध्ये मी ऑनलाईन सहभाग घेतला होता व त्यामुळे याची प्रचिती आली. २००८ पासून २०२४ पर्यंत भारतीय प्रतिनिधी म्हणून मी या काँग्रेसकरता निवडले गेले व दक्षिण आशियातील स्त्रीवादी मानसशास्त्रीय परीप्रेक्षातून माझ्या संशोधनाबद्दलची मांडणी मला वारंवार करता आली. तसंच आंतरराष्ट्रीय ताणेबाणेही अनुभवता आले.

त्यातलेच अजून एक महत्त्वाचे निरीक्षण : २०१६ मध्ये योकोहोमा, जपान येथील इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ सायकॉलॉजीमध्ये प्रो. डॉ. साथ कुपर यांना ऐकण्याची व भेटण्याची संधी मिळाली. त्यांची आई भारतीय आहे व वडील दक्षिण आफ्रिकामधले. त्यांचे मूळ नाव सथा शिवन असे आहे. दक्षिण आफ्रिकेमध्ये त्यांनी नेल्सन मंडेलांबरोबर वंशभेदाच्या विरोधातल्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला तसेच पाच वर्षे तुरुंगवासही भोगला होता. सामाजिक न्यायाचे मानसशास्त्र हा त्यांचा विचार- व्यवहार आणि कृतीचा विषय आहे. २०१२ मध्ये ते IUPsyS चे पहिले आफ्रिकन अध्यक्ष झाले.

२००८ ते २०२४ च्या प्रत्येक काँग्रेसमध्ये ते सातत्याने सामाजिक न्यायाचे मानसशास्त्र आणि लिंगभाव, वंश, जात, धर्म यामुळे बळावणाऱ्या पूर्वग्रह वैमानस्य आणि हिंसा यावर केवळ मांडणीच करत नव्हते तर अनेक कृती कार्यक्रमही सुचवत होते. त्यांनी व त्यांच्या गटाने केलेल्या कृती कार्यक्रमांची चर्चा करत होते. वंशभेद आणि लिंगभेद दर्शवणाऱ्या कामांवर व व्यक्तींवर कोरडे ओढत होते! याचा फटका जागतिक कीर्ती तसंच अपकीर्ती हे दोन्ही मिळवलेल्या अमेरिकन मानसशास्त्रज्ञ डॉ.फिलीप झिंबारडोर्यांना बसला.

आता वळू या भविष्यातील मार्गक्रम कसा असेल याच्याकडे :

मिळून साऱ्याजणी

नव्यानं वर्गणी भरायची आहे?

अनुबंध निधी पाठवायचा आहे?

वर्गणी मनीऑर्डरने किंवा 'निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'च्या नावे डिमांड ड्राफ्टने / AT PAR चेकने पाठवावी.

वर्गणी इंटरनेट बँकिंगद्वारे तसेच, मिळून साऱ्याजणीच्या www.miloonsaryajani.in या वेबसाईटवरूनही भरता येईल.

यासाठी आमचे खाते क्रमांक आहेत -

भारत			
	वार्षिक	३ वर्षे	१०वर्षे
व्यक्ती	५००/-	१४००/-	५०००/-
संस्था	७००/-	१९००/-	७०००/-

भारताबाहेर		
	वार्षिक	३ वर्षे
व्यक्ती	५० यु. एस. डॉलर्स	१२० यु. एस. डॉलर्स
संस्था	६० यु. एस. डॉलर्स	१५० यु. एस. डॉलर्स

A/C Name : Niramaya Public Charitable Trust	युनियन बँक, कर्वे रोड, पुणे	बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वे रोड, पुणे
	Saving Ac. No. - 370002010908793	Saving Ac. No. - 60029908172
	IFSC - UBIN0537004.	IFSC - MAHB0000116.

SCAN & PAY

कार्यालयीन पत्ता : फ्लॅट नं. १०१, पहिला मजला, नचिकेत को-ऑप. हौ. सोसायटी, प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४, एरंडवणा, पुणे ४११००४

एक महत्त्वाची सूचना - वर्गणी ऑनलाईन भरल्यानंतर ७४४७४४१६६४ या क्रमांकावर नांव, पत्ता, वर्गणीची रक्कम आणि वर्गणी कोणत्या बँकेत भरली याची SMS/WhatsApp करून माहिती द्यावी, म्हणजे खात्यात जमा झालेली वर्गणी कोणाची आहे हे आम्हांला कळू शकेल. आता स्कॅनकोडवरूनही वर्गणी आणि अनुबंध निधी पाठवू शकता.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेमध्ये एक्झिक्युटिव्ह ऑर्डर्स आणि खर्चामधील कपात जाहीर केल्यामुळे जो फटका सर्वदूर बसला आहे तो प्रमुख प्रवाही मानसशास्त्रातील संशोधन, उपयोजन कार्य यालाही बसला आहे. तेथील विद्यापीठ, प्राध्यापक व संशोधक काळजीत आहेत व एकूणच उच्च शिक्षणामध्ये आता काय होईल याच्याबद्दलच्या आगामी काळाची एक भयंकर चिंता त्यांना सतावत आहे. अशा प्रकारचे भाष्य एपीएच्या संकेत स्थळावर वाचायला मिळतंय. मानसिक आरोग्यातील संशोधन तसंच हस्तक्षेपाच्या कामाकरता जो निधी कोविड महामारीनंतर राखून ठेवलेला होता त्यामध्येही आता प्रचंड कपात होणार आहे.

ब्रिटिश सायकॉलॉजिकल सोसायटी तसेच कॅनेडियन सायकॉलॉजिकल असोसिएशनसुद्धा जागतिक घडामोडी, जगभरातील संघर्ष, युद्ध किंवा युद्धसदृश्य परिस्थिती याच्याबद्दल काळजी व्यक्त करत असतानाच मानसशास्त्रातील विचार, व्यवहार व उपयोजना करता पुरेशी तरतूद व संसाधनांशी जुळवता येते आणि समाजाभिमुख काम कसं चालू ठेवता येईल ज्याची आज कधी नव्हे ते सर्वाधिक आवश्यकता आहे याचा उहापोह करत आहेत.

या नंतर मी पाश्चिमात्य जगातील स्त्रीवादी मानसशास्त्रज्ञांनी केलेल्या एका उत्तम व सातत्यपूर्ण उपक्रमाची माहिती येथे देणार आहे. माझ्या पुस्तकामध्ये मी याबद्दल ठळक वैशिष्ट्यांसह विस्तृतपणे लिहिलं आहे. त्याची एक संक्षिप्त नोंद इथे घेते आहे. Building a Better Psychological Science of Gender/ Feminist Psychological Science असे त्या उपक्रमाचे नाव होते. हे काम अमेरिकेमध्ये २०११ ते २०१६ मध्ये केले गेले.

या मागची भूमिका अशी होती की साधारण १९७३ पासून स्त्रीवादी मानसशास्त्रामध्ये काम सुरू झाले व पाश्चिमात्य जगातील विविध स्त्री चळवळी, त्यातील प्रवाह, इतर सामाजिक व परिवर्तनवादी चळवळी, त्यांचे प्रवाह, ऐरणीवरील प्रश्न असं सर्व बरोबर घेऊन हे काम चालू होते. त्या विशिष्ट टप्प्यावर येऊन पुढच्या काळाकरता काही ठोस बांधणी करता येईल का की ज्यामुळे या विषयांमधील अध्यापन, व्यवहार आणि संशोधन याला स्त्रीवादाची एक योग्य धार मिळेल आणि अधिक उत्तम रीतीने काम होईल असा हा उपक्रम होता.

त्या करता सातत्याने स्त्रीवादी मानसशास्त्राच्या विविध उपशाखांमधून तसंच स्त्री अभ्यास व इतर जोडविषयांवर काम करणाऱ्या तरुण अभ्यासक, संशोधक व प्राध्यापकांची निवड केली गेली आणि पाच वर्ष चर्चा, मांडणी व आदान-प्रदान झाले. यामुळे अनेक गोष्टी साध्य झाल्या. एकतर अमेरिका व युरोपमधील या विषयांवर काम करणाऱ्या आणि काही थोड्या प्रमाणात ग्लोबल साऊथमधील व्यक्तीसुद्धा एकत्र आल्या. काही प्राधान्यक्रम ठरवले गेले व आधी झालेल्या कामावर लिखाणही केले गेले. त्यावर विश्लेषणात्मक टिप्पणीही झाली आणि पुढच्या कामाकरता दिशा मिळाली.

यातून तयार झालेले पुस्तकसंच हे धोरणकर्ते त्या त्या देशातील सरकारी यंत्रणा तसंच प्रमुख प्रवाही मानसशास्त्रातील काम करणाऱ्या लोकांपर्यंत पोहोचवलं गेलं. या कामाची रचना, बांधणी आणि त्यातून परिणाम स्वरूपी तयार झालेलं दस्ताऐवजीकरण हा एक स्त्रीवादी मानसशास्त्राचा वस्तुपाठ ठरतो असे मला हे पुस्तक संच वाचल्यावर जाणवले. माझ्यापरीने अनेकांपर्यंत यातील मुद्दे मी पोहोचवले आहेत.

आता जाऊ या भारतातील आव्हानांकडे

इथे मी दोन्ही प्रकारची मांडणी करणार आहे. जे बहुतांशी निराशाजनक चित्र आहे ते ही विशद करणार आहे आणि ज्या आशावादी शक्यता दिसतायेत त्यांचीही नोंद घेणार आहे. अध्यापनाच्या पातळीवर आधीच्या लेखांमध्ये विस्तृतपणे मांडल्यानुसार आजही प्रमुख प्रवाही मानसशास्त्र आणि स्त्रीवादी मानसशास्त्र याच्यामधली दरी कायम आहे. ती भरून काढायचे प्रयत्न फार कमी प्रमाणात दिसतात. याची कारणे खूप व्यामिश्र आहेत पण आज जिथे एकूणातच उच्च शिक्षणालाच अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे त्यात इतर विषयांसारखेच मानसशास्त्र आणि स्त्रीवादी मानसशास्त्र यांनाही ही आव्हानं चुकणार नाहीत हे निश्चित.

व्यवहाराच्या पातळीवर मानसोपचाराचा विचार करता मी गेल्या पाच वर्षात सातत्याने The Good, Bad and Ugly of Mental Health मांडत आले आहे. यातले गुड अतिशय कमी आहे, बॅड वाढते आहे आणि अग्लीचा सुकाळ धक्कादायक आहे!

याची कारणे: मानसिक आरोग्यातील उपचारांचे विकृत बाजारीकरण, प्रशिक्षण व परिप्रेक्षकाचा अभाव आणि कायदे आणि नीतिनियमांचा आभाव. कोणीही उठते आणि आज 'मानसतज्ज्ञ' बनत आहे. त्या करता आवश्यक असलेले काटेकोर प्रशिक्षण, पूर्वानुभव, कल, व्यक्तिमत्त्व, लोकाभिमुख कामाचा निश्चय, हे काही काही नसले तरी चालते. त्यात भरीस भर म्हणून इंस्टाग्राम, मेंटल हेल्थ इन्फ्लुअन्सर्स, एआयएमएलचा वापर करून केले जाणारे उपचार! यांच्यावर कोणतेच नियंत्रण किंवा निर्बंध नसणे! अशी अनेक आव्हानं आ वासून समोर उभी आहेत! या सर्व आव्हानांना सामोरे जाण्याकरता सज्ज असणे क्रमप्राप्त झाले आहे!

अर्थात हा धुमाकूळ जास्त प्रमाणात मानसशास्त्र, चिकित्सा मानसशास्त्र, समुपदेशन आणि मानसोपचार इथे आढळतो. प्रशिक्षणाच्या बाबतीत काटेकोरपणा मनोचिकित्सा, जी जैववैद्यकीय शाखा आहे तिथे पाळलेला दिसतो.

भोवतालच्या घडामोडीमधील आशादायक गोष्टींची दखल घेत त्या ही इथे नोंदवत आहेत. या आशादायक गोष्टींमुळे भविष्यामध्ये

यांचे प्रमाण वाढेल अशी इच्छा करायला हरकत नाही असे वाटते. आधीच्या लेखांमध्ये म्हटल्याप्रमाणे प्रमुख प्रवाही मानसशास्त्रामध्ये एक उतरंड निश्चित दिसते आणि त्याला टक्कर देत तथाकथित तळातल्या व्यक्तींनी कौशल्य आणि दांडग्या इच्छाशक्तीच्या जोरावर आज भारतामध्ये प्रमुख प्रवाही मानसशास्त्राला प्रश्नांकित करणे आणि वेगळे पर्याय, विचार, व्यवहार आणि उपयोजनांमध्ये बांधणी करून तयार करणे हे केलेले आहे.

यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे अनुभूती ट्रस्टच्या दीपा पवार. त्या स्वतः डीटीएनटी कार्यकर्ती आहेत. लिंगभाव आणि मानसिक आरोग्यावरचे त्यांचे काम हे अतिशय मूलभूत आणि प्रत्ययकारी आहे. या कामाचा स्त्रोत सामाजिक समता, न्याय आणि त्याचा मानसिक आरोग्याशी असलेला निकटचा संबंध हा आहे. दीपा असं म्हणतात की असमानता हे मानसिक अनारोग्याचे प्रमुख कारण आहे. संसाधनांचा अभाव, भेदभावाचे वर्तन, दुय्यमत्व आणि वंचितता आणि सततचा सामाजिक जाच आणि अन्याय दूर करणे याची निकड आहे. चौदाव्या वर्षांपासून गेली २२ वर्ष त्या सातत्याने काम करत आहेत. त्यांचे नुकतेच आलेले पुस्तक 'पोलादी बाया' आणि त्यांच्या व्यापक कामाची आज देशात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली जाते आहे. त्यांचं काम, त्याची व्यापकता, हे निश्चितच आशादायी आहे आणि प्रेरकसुद्धा!

दुसरा आशावादी पैस म्हणजे दिव्या कंडूकुरी. त्या ब्लू डॉन नावाचा मानसिक आरोग्य समूह गट चालवतात. जात आणि मानसिक आरोग्य याला अधोरेखित करणारे हे काम आहे. दीपाप्रमाणेच सामाजिक समता, न्याय आणि मानसिक आरोग्याचा अनन्य साधारण संबंध आहे असं त्याही मानतात. त्यांचं लिखाण, हस्तक्षेपाचं काम व धोरणात्मक काम हे सर्व बहुजनवाद, जात आणि मानसिक आरोग्याला अधोरेखित करणारे आहे. प्रमुख प्रवाही मानसोपचार पद्धतीने डावलून, प्रश्नांकित करून, त्या स्त्रीवादी मानसोपचार पद्धतीच्या सर्वात जवळ येणाऱ्या नॅरेटिव थेरपीचा उपयोग करतात. स्वतःच्या आंतरजातीय-अंतरधर्मीय वास्तवाचा त्या आपल्या कामांमध्ये उपयोग करून घेतात. या दोघींच्या कामामुळे भारतातील स्त्रीवादी मानसशास्त्रीय कामाला बळकटी येत आहे.

समारोपाच्या लेखाचा शेवट भविष्याकरता रोड मॅप देऊन करणार आहे :

ज्याला मी 'फॅमिनिस्ट युटोपिया फॉर सायकॉलॉजी' असे म्हणते. पुढच्या काळामध्ये मानसशास्त्रातील विचार, व्यवहार आणि उपयोजने या चार महत्त्वाच्या गोष्टींची दखल घेतील, निर्माण करण्यामध्ये भागीदार असतील अशी अपेक्षा करते: सर्वप्रथम समताधिष्ठित घर-कुटुंब, सर्वसमावेशक अध्यापन क्षेत्र, समताधिष्ठित कामाचे ठिकाण, आणि सुरक्षित भवताल! त्या करता योग्य ते समाजमानस तयार करायलाही मदत करतील!

स्त्रीवादी मानसशास्त्र आणि लोकाभिमुख मानसशास्त्र भारतामध्ये अधिक दृढ करण्याची गरज तीव्र झालेली आहे. असे झाले तरच सर्वांकरता मानसिक आरोग्य, मूलभूत हक्क म्हणून पोहोचवणे शक्य होईल असे वाटते! त्या करता पारंपरिक व पठडीबाजपणे काम करणाऱ्या लोकांनी जागे होण्याची गरज आहे आणि नव्या उमेदीने जे थोड्याफार प्रमाणात लोकाभिमुख मानसशास्त्रात काम करत आहेत त्यांनी एकत्र येण्याची गरज आहे. मानसशास्त्रामध्ये गेल ऑम्व्हेट म्हणतात त्या प्रमाणे 'सीकिंग बेगमपुरा'ची सक्त गरज आहे!

प्रा. डॉ. साधना नातू

(प्राध्यापक व विभाग प्रमुख मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड, स्त्रीवादी मानसशास्त्रज्ञ, संशोधक, कार्यकर्ती, अभ्यासक, स्वयंसेवी संस्थांच्या सल्लागार, POSH समिती तज्ज्ञ)

(अजून संदर्भाकरता कृपया ईमेल करणे dr.sadhana.natu@gmail.com)

एकेक दीप विझू विझू....



माधव वझे

राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त श्यामची आई सिनेमातला छोटा श्याम म्हणजे बालपणीचे साने गुरुजी अशी अखेर पर्यंत ओळख असलेला बालकलाकार माधव वझे यांचं नुकतंच दुःखद निधन झालं.त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अखेर पर्यंत साने गुरुजींचा अंश सतत डोकावत राहिला. लेखक, अभिनेता, दिग्दर्शक आणि नाट्य समीक्षक असलेला ज्येष्ठ नाट्यकर्मी विद्याताई आणि साऱ्याजणीचा घनिष्ठ स्नेही होता. त्यांच्या प्रेमळ स्मृतीला अखेरचा दिल से सलाम!

विज्ञानयात्री अनंतात...



डॉ. जयंत नारळीकर

खगोलतज्ज्ञ, शालेय शिक्षणाचं माध्यम मातृभाषा असावे हे सांगणारे, फलज्योतिष यावर भूमिका घेणारे विज्ञानकथा लेखक, ९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि पद्मविभूषण सन्मानित डॉ. जयंत नारळीकर यांना साऱ्याजणीकडून विनम्र आदरांजली!

विशेष ओळख

ध्येयवेड्या डॉक्टरची वाटचाल

मुक्ता मनोहर

वैचारिक बांधिलकीला सामिलकीची जोड देत डॉ. अनंत फडके यांनी दुर्गम भागांत आरोग्य सेवा पुरवण्यापासून रुग्णहित केंद्रस्थानी ठेऊन औषध कंपन्यांविरोधात जनजागृती करण्यापर्यंतच्या अनेक वाटांवर स्वतःला झोकून दिले. मार्क्सवादातून घडलेला मजबूत पाया त्यांना उपेक्षितांना सावरण्यासाठी उपयोगी ठरत गेला. मागोवा हे समविचारी मित्रांचे विचारवर्तुळ ते 'मेडिको फ्रेंड सर्कल' अशा अनेक मार्गी वाटचालीतून इतरांच्या आयुष्याला स्पर्श करणारे आणि साऱ्याजणीचे हितचिंतक-मित्र डॉ. फडके यांनी एप्रिल महिन्यात वयाची पंचाहत्तर वर्षे पूर्ण केली. या निमित्ताने त्यांची आजवरची वाटचाल जवळून न्याहाळणाऱ्या स्नेही मुक्ता मनोहर यांनी त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला हा वेध...

दारिद्र्य-दैन्य-अज्ञान आणि शोषण या कोंडीत अडकलेली असंख्य माणसं आहेत. मोठ्या संख्येने. पण तरी अदृश्यच आहेत. ते आदिवासी आहेत. ते शेतमजूर आहेत. ते प्रकल्पग्रस्त आहेत. ते श्रमिक आहेत. पण ते आहेत! त्यांना बघून, त्यांना भेटून एखादा उच्चभ्रू सुशिक्षित डॉक्टर तरुण अमुलाग्र बदलून जाऊ शकतो, असंही कधी घडतं! हा डॉक्टर कोण? तो प्रसिद्धीच्या झोतात का नाही? त्यानं असा कोणता विचार आत्मसात केला? कसा केला? त्याची जिवंत हाकिकत म्हणजे डॉक्टर अनंत फडके. पुण्याच्या बीजे मेडिकल कॉलेजमधून वैद्यकीय डिग्री घेऊनही व्यवसाय म्हणून डॉक्टरकी न करणारा डॉक्टर अनंत फडके.

लॉकडाऊनच्या काळात कोविडबाबत सोप्या भाषेत माहिती देऊन आपल्याला धीर देणारा डॉक्टर फडके वृत्तपत्रातल्या अनेक लेखांतून आपल्याला भेटतो. शासनाच्या वैद्यकीय धोरणाबाबत सातत्याने टीका करत सर्वसामान्यांना परवडेल असे आरोग्य विषयक धोरण सरकारने कसे घेतले पाहिजे, याबाबत पोट तिडकीने आपल्याशी संवाद साधणारा डॉक्टर फडके आपल्याला त्याने लिहिलेल्या विविध लेखांच्या माध्यमातून नेहमीच भेटतो. या व्यतिरिक्त जन आंदोलनाबाबतचे त्याचे अनेक पैलू आहेत,

डॉ. अनंत फडके

डॉक्टर विनायक सेन यांच्या अन्याय्य अटकेविरोधात आवाज उठवण्यामध्ये मोलाचा सहभाग अनंत घेतो, किंवा 'जबाब दो' सारख्या आंदोलनातही तो असतो, अशी अनेक आंदोलने आहेत, जी विविध संघटना उभी करतात, त्यात पुढे होऊन उत्स्फूर्तपणे चालना देण्यामध्ये अनंताचा सहभाग असतो, मौलिक सूचना असतात. पण प्रत्यक्ष आंदोलनाच्या पटलावर तो मागच्या बाजूलाच उभा असतो. म्हणूनच एक खूप मोठा जनतेचा पुढारी अशी त्याची प्रतिमा नाही. कारण ती त्यालाच मान्य नाही. तो जाणीवपूर्वक मागेच राहतो. त्याला समजून घेणं आपल्याला समृद्ध करणारा अनुभव आहे.

अगदी तरुण वयातच कसं जगायचं हे अनंतानं ठरवलंच होतं. वास्तविक आपल्या हुशार मुलांनी आयुष्यात काय झालं पाहिजे म्हणजे त्याचं आयुष्याचं कल्याण होईल, अशी स्वप्नं पालकांची असतातच. त्यात डॉक्टर किंवा इंजिनियर होणं म्हणजे आयुष्यात पैसा मिळण्याची निश्चितता. अशी निश्चिंत निश्चितता नाकारणे म्हणजे काय? डॉ. अनंत फडकेंच्या आयुष्याची वाटचाल आपल्याला हेच उलगडून सांगते.

खरंतर इंजिनियरच व्हायचं होतं

वास्तविक इंजिनियर होण्यातच अनंताला जास्ती रस होता. तेच विषय जास्त आवडीचे होते. वर्गमित्र अच्युत गोडबोले, विश्वास काकडे जसे पवई आयआयटीत गेले तसंच जाण्याचा इरादा होता, पण ते राहून गेलं. त्यातून वडिलांची इच्छा अनंतानं डॉक्टर व्हावं अशीच होती. त्यांचा तर इंजिनियरिंगला जाण्याला विरोधच होता. अर्थात इंजिनिअर किंवा डॉक्टर होण्याचा हा निर्णय करताना, भविष्यात आपण खूप पैसे मिळवू अशी कोणतीही अपेक्षा किंवा स्वप्नं त्यांच्या मनात नव्हती. मग डॉक्टर होण्यासाठी अनंत फडके पुण्याच्या बीजे मेडिकलमध्ये दाखल झाले. सुरुवातीला वैद्यक शास्त्रातले काही अवघड विषय १४-१४ तास अभ्यास करायला त्यांना भाग पाडत होते, पण हे आव्हान त्यांनी पेललं, कारण कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करण्याचीच त्याची वृत्ती होती. पण याच काळात एकीकडे तो आयआयटी मुंबई इथे जात असायचा. आयआयटीमध्ये शिकत असणाऱ्या अच्युत गोडबोले, अच्युतमुळे प्रफुल बिडवाई, सुहास परांजपे त्यांनी स्थापन केलेला

एक अभ्यास गट (जो गट पुढे मागोवा म्हणून कार्यरत झाला.) याकडे अनंतासारखा बुद्धिमान तरुण आकर्षित होणं स्वाभाविक होतं. प्रत्यक्ष आयआयटीची लायब्ररी बघणं आणि त्यातून अवाक होऊन जाणं, या सगळ्यामुळे त्यांचं आयुष्यच बदलून जाणार होतं आणि गेलंही.

आपल्या देशात प्रचंड दारिद्र्य का आहे. एवढी विषमता का आहे, त्यात बदल करता येईल का आणि कसा अशा गंभीर विषयांची त्यांची एकमेकांत चर्चा सुरू होती. ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, मानवतावाद यातून मानवी जीवनाचे वास्तव दर्शन देणारे महाद्वार त्याच्यासाठी उघडलं गेलं. या मित्रमंडळींकडून त्याला मार्क्सवादाची ओळख झाली. या दृष्टिकोनामध्ये त्याच्या बौद्धिक क्षमतेलाही बरंच आव्हान असल्याचं त्याला जाणवलं. जगाची एक नवीच ओळख व्हायला लागली. आपल्याभोवती असणारा आणि आपल्यासाठीच राबणारा कष्टकरी वर्ग आपल्याला दिसला नाही-जाणवला नाही. आपण सुखासिन आयुष्य जगू शकणाऱ्या प्रिव्हिलेज्ड वर्गातले आहोत, एक दुखरी बोचही मनात आकाराला यायला लागली. याच क्रमात एमबीबीएसची परीक्षा होऊन गेलेली आहे आणि काहीसा रिकामा वेळ हातात आहे, अशा मूडमधला अनंत फडके शहाद्याला आला.

संघर्षाला भिडताना

धुळे जिल्ह्यातला शहादा, तळोदा, नंदुरबार वगैरे भाग म्हणजे सातपुड्याच्या पर्वतरांगांमधील भिल्ल आदिवासींचा भाग. असंख्य समस्यांनी आणि अन्यायाने जखडलेलं त्यांचं जीवन.

आदिवासींना न्याय मिळावा म्हणून मागोवा गटातले अनेक तरुण तिथे आलेले. अनंतची ही शहाद्याची भेट त्याच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. साक्षात दारिद्र्य शहाद्यातील आदिवासींच्या जीवनातून अनंतच्या समोर उभं ठाकलं. आदिवासींच्या जमिनी हडपण्याचे इथे सर्रास प्रकार चालत होते. त्या विरुद्ध आवाज उठत होते. चळवळ चालू होती. बिकट गरिबीमध्ये सुद्धा माणसं आनंदाने जगतात आणि लढ्याची जिद्द बाळगतात हे बघून तर अनंत अमुलाग्र बदलून गेला. त्याची जीवनावरची कष्टकऱ्यांवरची आणि संघर्षावरची निष्ठा अधिकच ठाम झाली.

आपल्याला ही परिस्थिती काहीच कशी माहीत नव्हती याचंही आश्चर्य मनात दाटून यायला लागलं. मग त्यानं एक निर्णय घेतला की आपणही आता भविष्यकाळात फुल-टायमर व्हायचं. त्यानंतर अन्याय्य, विषमतेवर आधारलेलं जग बदलण्याच्या चळवळीसाठी पूर्ण वेळ झोकून दिलेले आयुष्य स्वीकारलेला तरुण कार्यकर्ता उदयाला आला- डॉक्टर अनंत फडके.

एमबीबीएस पास झाल्यानंतर आवश्यक ती इंटर्नशिप आणि मान्य केलेल्या बाँडनुसार त्यानं दोन वर्ष नोकरीही स्वीकारली. हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये मेडिकल हेल्थ ऑफिसर म्हणून तो रुजू झाला. चार खोल्याचं घरं मिळालं होतं. याच काळात अनंतनं संध्याशी लग्न केलं. खरं तर सोलापूरच्या संध्या आठवलेनं अनंतशी लग्न केलं, असं म्हटलं पाहिजे. कारण संध्या ही 'मागोवा' गटाच्या संपर्कातलीच होती. संध्याला-आयुष्याला सुरक्षितता देईल, पैसा कमवेल, एखाद्याची पत्नी म्हणून प्रतिष्ठितपणे मिरवता येईल याहीपेक्षा आयुष्य झोकून दिलेला पूर्णवेळ कार्यकर्ताच नवरा म्हणून हवा होता. नवीन लग्न झालेलं असतानाही आणि अनंतला चार खोल्यांची क्वार्टर मिळालेली असताना सुद्धा आणि नवविवाहितांना हवासा वाटणारा एकांतपणा तिथे मिळण्याची शक्यता असून सुद्धा, तो मुद्दा जणू गायबच होता! हे घर केवळ त्याचंच राहीलं नव्हतं. अडचणीत असणारे, घराची गरज असणारे तिथं अजून पाच जण सामावले गेले. तीन जोडपी व एक कामगार. त्यांच्या घरात अशी येणी आजतागायत सुरूच आहेत. त्यांनी घरं बदलली पण वेगवेगळ्या राजकीय छटा असणारे मित्र त्यांच्या घरी हक्काने येतात, राहतात. त्यांच्या घरांनी स्वीकारलेला हा वारसाच आहे. पिंपरीच्या हफकीनच्या क्वार्टरमध्ये सात जणांचं कम्युनच झालं होतं. अनंत-संध्याचं सहजीवन अशाच पद्धतीचं आहे.

संध्या नोकरी करणारी असूनही चळवळीमध्ये नेहमीच सक्रिय राहिलेली आहे. तिचा चळवळीतला सहभाग उत्सदायीच राहिलेला आहे. अत्यंत प्रसन्न स्वभावाची संध्या संगीत, कला, साहित्य अशा अनेक गोष्टींमध्ये रस घेते. ती एका अर्थाने अनंतपेक्षा वेगळ्या प्रकृतीची आहे. संध्या-अनंतची ही जोडी डाव्या चळवळीतली एका अद्भुत रसायनाची जिवंत हाकिकत बनलेली आहे! अनंतची मेडिकलसाठी बाँड म्हणून करावी लागलेली हाफकीनची नोकरी संपली. तिथूनच निवड केलेल्या आयुष्याच्या पूर्णवेळ कार्यकर्त्याची वाटचाल सुरू झाली.

पूर्णवेळ कार्यकर्ता होणे म्हणजे काय?

चळवळ करायची म्हणजे विविध प्रकारची कामं होतीच. आता पुण्यामधल्याही अनेक मार्क्सवादी विचारवंतांबरोबर अनंतची ओळखदेख झाली होती, उठबस होती. विविध विषयांवर लेखन करण्याचं काम तर त्यांनी कधीच सुरू केलं होतं. 'मागोवा' गटातूनच पुण्यातला सुधीर बेडेकर 'मागोवा' नावाचं नियतकालिक चालवत असे. सुधीर बरोबर अनंतची चांगलीच मैत्री होती. त्यातून अनंतचाही ओढा लेखन करण्याकडे होताच. पुण्यातल्या गोखले इन्स्टिट्यूटची लायब्ररी आता अनंतची कर्मभूमी झाली. अभ्यास, वाचन, चिंतन आणि चिकित्सा ही 'मागोवा' गटाची धुरा अनंताने स्वीकारली. या काळामध्ये नव मार्क्सवादावरचे अनेक ग्रंथ त्यांनी वाचून काढले, त्यातले विचार आत्मसात केले आणि स्वतःची टीकात्मक दृष्टीही विकसित केली. अर्थशास्त्रज्ञ दांडेकर यांच्यावर सडेतोड टीका करणारा एक परखड लेख त्यानं 'समाज प्रबोधन

पत्रिका' या प्रतिष्ठित व बौद्धिक जगतात मानाचे स्थान असलेल्या नियतकालिकात लिहिला होता. अशा लिखाणामुळे पुण्यातील मार्क्सवादी विचारवंत डॉ. सुलभा ब्रम्हे, रा.प. नेने अशा व्यक्तींशी चर्चाही सुरू झाल्या. त्यांच्या मांडणीचाही प्रभाव अनंतवर पडत होता. 'मागोवा' गटातील एक सैद्धांतिक मांडणी करणारा तसंच 'मागोवा' व त्यानंतर 'तात्पर्य' नियतकालिक चालवणारा सुधीर बेडेकर तर त्याचा चांगलाच जवळचा मित्र झालेला होता. त्यांच्या तर रोजच गाठीभेटी होत होत्या.

मराठीमध्ये मार्क्सवादावर कमी पुस्तकं आहेत या जाणिवेतूनच मग दोन पुस्तकही त्यांनी या काळात लिहिली जी 'मागोवा'नेच प्रकाशित केली. 'भारतात दारिद्र्य का आहे', आणि 'भांडवली अर्थव्यवस्था' ही ती दोन महत्त्वाची पुस्तकं. अनंत त्यावेळेस कोणाही प्रस्थापित कम्युनिस्ट पक्षातल्या पुढाऱ्याच्या सानिध्यात नव्हता. प्रस्थापित डाव्या पक्षांच्या व्यवहाराबद्दल तसेच वैचारिक मांडणीबद्दल पण चिकित्सक असणे, 'मागोवा' विचारधारेमधला एक महत्त्वाचा पैलू होताच.

पुढे 'मागोवा' गट जेव्हा विसर्जित झाला, तेव्हा हाच 'मागोवा' परंपरेचा धागा हातात पकडून अनंतने पुढील वाटचाल केली. रशियन नेता जोसेफ स्टालिन व रशियातीलच एक विचारवंत पुढारी ट्रॉट्स्की या प्रवाहांबाबत मूल्यमापन करण्यावरून हा वाद टोकाला गेला आणि मागोवा विसर्जित झाला. त्यावेळेस जवळजवळ अठरा पूर्ण वेळ कार्यकर्ते 'मागोवा'मध्ये कार्यरत होते. प्रफुल बिडवाई, डॉ. राम पुनियानी, सुभाष काणे, अनिल गोखले या चौघा जणांचीही ट्रॉट्स्की समर्थनाची भूमिका होती. ते एक वैचारिक घमासाम होतं. व्यक्तिगत लाभ-लोभ, द्वेष, महत्त्वाकांक्षा, स्पर्धा अशा कोणत्याही कारणास्तव 'मागोवा'चे विसर्जन झालेले नव्हते. सोव्हिएत युनियन, त्यातला बोल्शेविक क्रांतिकारक पक्ष, त्या काळातले रशियातले विचारवंत व त्या पार्श्वभूमीवरती स्टालिन आणि ट्रॉटस्की यांच्याबाबत मागोवामध्ये झालेला वाद सखोलपणे समजून घेण्याचं अनंतनं मनावर घेतलं. सी. एच. कार या इतिहासकाराचे 'अ हिस्टरी ऑफ सोव्हिएत रशिया' याचे खंड तपशीलवार नोट्स काढून अनंतने आत्मसात केले. आंतरराष्ट्रीय राजकारणावर बरेचसं वाचन तसंच वृत्तपत्रं नियतकालिकं यातून नियमितपणे लेखन अनंतने सुरू केलं. तसंच वैद्यकीय क्षेत्रही एक आव्हान म्हणून त्याच्यासमोर स्पष्टपणे उभं राहत होतं. स्वतः वैद्यकीय क्षेत्रातले आहोत आणि समोर दिसत आहे की या क्षेत्रात अंधश्रद्धांपासून, नफेखोरीसारख्या अनेक गोष्टी धुमाकूळ घालत आहेत. त्यावर काही करणं अत्यंत आवश्यक व गरजेचं आहे. 'ते आपण नाही करणार तर कोण?' मग अनंतनं औषध कंपन्यांच्या गुंतागुंतीच्या विश्वात प्रवेश केला. सहाजिकच 'मेडिको फ्रेंड सर्कल' या राष्ट्रव्यापी संस्थेमध्ये तो अधिक सक्रिय झाला. देशातल्या विविध भागांमधल्या वार्षिक मीटिंगांना उपस्थित राहणे ही जणू त्याची एक जबाबदारीच झाली. वास्तविक अनंतला खाण्यामध्ये महत्त्वाच्या गोष्टींची एलर्जी आहे. त्याला गहू चालत नाहीत, बाहेरचं काही शक्यतो चालत नाही, पण लांबचे सर्व प्रवास घरून भाकरीचा चुरा घेऊन व आवश्यक त्या पथ्यपाण्याच्या गोष्टी घेऊन तो विमानाने नव्हे तर रेल्वेनेच करत राहिला. 'मेडिको फ्रेंड सर्कल' या गटाबरोबर पूर्वीच अनंतचा संपर्क आलेला होता.

जनजागृतीच्या वाटेवर

समाजातल्या वंचित घटकांसाठी आरोग्य सेवा व्यवस्थित मिळाली पाहिजे, या भावनेनं प्रेरित झालेले अनेक गांधीवादी मानवतावादी तरुण 'मेडिको फ्रेंड सर्कल'मध्ये कार्यरत होते. डॉक्टर अभय बंग, डॉक्टर आश्विन पटेल इत्यादींच्या ओळखी झालेल्या होत्या. डॉक्टर अनंत मार्क्सवादी विचाराचा असल्यामुळे कोणताही अडथळा आला नाही. त्या गटामध्येही अनेक मार्क्सवादी विचारांची तरुण मंडळी होती. औषध कंपन्यांचे गैरव्यवहार उघडकीस आणणं, वेळ प्रसंगी बलाढ्य औषध कंपन्यांना कायदेशीर आव्हान देणं, ही सोपी गोष्ट नव्हती. पण ती त्यांनी केली, ज्यामध्ये अभ्यासाची बाजू अनंतने मजबूतपणे स्वीकारलेली होती. त्या पद्धतीचं लेखन करून समाजात जागृती निर्माण करणं, सरकारच्या आरोग्यविषयक धोरणांच्याबाबत सतर्कपणे लिखाण करणं असे या कामाचे अनेक पैलू आजही आहेत. या सगळ्यासाठी प्रचंड वेळ देण्याची गरज होती, पण तरीही 'मागोवा'नं मनात चेतवलेली धगधग संपलेली नव्हती. 'मागोवा'तले शहाद्यामध्ये कार्यरत असणारे अनेक मित्र प्रस्थापित कम्युनिस्ट पक्षाचे भाग बनले. जन संघटना उभी करताना 'मागोवा'ने स्त्री चळवळ, दलित चळवळ तसेच जातिव्यवस्थेचे विश्लेषण, चिकित्सा इत्यादीची वेगळी परंपरा निर्माण करण्याची धडपड केली होती. 'मागोवा'ची हीच परंपरा जिवंत ठेवण्याची जबाबदारी काहींनी स्वीकारली. तर हीच परंपरा घेऊन आम्ही डाव्या राजकीय पक्षात काहीतरी घडवू अशा अपेक्षेनं काहीजण प्रस्थापित डाव्या पक्षांमध्ये सामील झाले होते. मैत्रीचे स्नेहबंध मात्र मनात रेंगाळत राहिलेले होते, त्यामुळे अनंत-संध्याच्या घरी राहायला येणा-यांचा राबता मात्र तसाच दिलखुलासपणे सुरू राहिला.

डॉ. भारत पाटणकर यांच्यासारख्यांनी 'मागोवा'च्या परंपरेनुसार संघटनात्मक वाटचाल करण्याचा निर्णय घेतला. 'श्रमिक मुक्ती दल' म्हणून ते काहीजण कार्यरत झाले. डॉ. भारत पाटणकरची भूमिका अनंतला अधिक संयुक्तिक वाटली व वेळात वेळ काढून तो 'श्रमिक मुक्ती दला'च्या आंदोलने, राजकीय प्रचार मोहिमा या प्रकारच्या विविध कार्यक्रमात सहभागी झाला. कष्टकऱ्यांची जीवन बदलण्याच्या, घडवण्याच्या तीव्र उर्मी व त्यासाठी चिवटपणांनी व्यवस्थेला आव्हान देत लढण्याच्या

निष्ठा, लढा देण्याच्या त्यांच्या प्रचंड ताकदीचा पुन्हःपुन्हा प्रत्यय अनंतला मिळत राहिला. या आठवणी त्याच्याकडून ऐकणे म्हणजे, कष्टकऱ्यांबाबत त्याच्या मनात असलेल्या अपार बांधिलकीचा प्रत्यय घेण्यासारखं असतं.

अढळ वैचारिक निष्ठा

अनंत-संध्या अत्यंत साधेपणानेच जगतात, तरीही स्वतःला प्रिव्हिलेड क्लासमधले असल्याचे अनंत वारंवार सांगतो. अत्यंत कष्टमय जीवनातही माणसं न्याय मिळवण्यासाठी किती धडपडतात, चिवटपणाने लढतात असं भारावून जाऊन सांगतो तेव्हा ऐकणारेही भारावून गेल्याशिवाय राहत नाहीत. अनंत जणू सांगत असतो, 'ही मोठी विसंगती दूर करण्याची जबाबदारी सगळ्यांचीच असावी. नाहीतर आज बहुसंख्य शिक्षित उच्चभ्रू लोकांचं जीवन चंगळवादातच बुडालेले दिसतं.' आपलेही मन हुंकार करतं, त्याच्या मते खरा बदल हा मार्क्सवादी दृष्टिकोनातूनच कार्य केल्यानंतर घडू शकतो. लोक विज्ञान चळवळीद्वारे वैज्ञानिकतेचा प्रचार करत असतानाही त्याला हे पक्क आकलन होतं, की केवळ विज्ञान सांगून माणसं वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारू शकत नाही. त्याला मार्क्सवादी दृष्टिकोनाची जोड असावी लागते. अनेक बाजूंनी रशियन विचार करून अनंतने मार्क्सवादाबाबतचा दृष्टिकोन स्पष्ट केलेला आहे. मार्क्सवादाच्या मांडणीवर झालेली रशियन क्रांती तर फेलच गेली. मग मार्क्सवाद सुद्धा फेलच गेला असा निष्कर्ष काढला जातो. याबाबत अनंतची वैचारिक भूमिका काय, तर त्याच्या बारकाईने केलेल्या अभ्यासातून मनन चिंतनातून ही भूमिका तयार झालेली आहे. त्यामुळे आपण स्वीकारलेला हा जीवन पथ चुकला की काय, अशा प्रश्नाला अनंताच्या आसपासही फिरकता येत नाही. मागोवाच्या विसर्जनाच्या काळातच झालेल्या घमासाम चर्चेनंतर अनंतने जो बारकाईने अभ्यास केला त्याच काळात त्याचे स्टॅलिनबद्दल अतिशय प्रतिकूल मत तयार झालं. मॉडेल फेल गेलं, पण तरी सुद्धा बाजारपेठेवर वर्चस्व असलेल्या भांडवलशाहीपेक्षा सोविएत मॉडेल आणि तिथली हुकूमशाही वेगळ्या स्वरूपाची होती याबद्दल अनंत ठाम आहे. अगदी चीनचेही या कम्युनिस्ट देशाचं मॉडेल मार्क्सवादाच्या निकषावर फेलच गेल्याचं दिसतं. दोन्ही देशातील समाजवादाचे झालेले प्रयत्न, त्यातून उभी राहिलेली समाज रचना भांडवलशाहीतील बाजारपेठेच्या वर्चस्वापेक्षा वेगळी कशी आहे, याबद्दल अनंत म्हणतो, "सर्वसामान्य लोकांचे अनेक प्रश्न सोडवण्यात या मॉडेल्सना यश मिळालं. मात्र तिथे संसदीय राजकीय लोकशाही अस्तित्वात नव्हती, हेही कटू सत्य आहे. भांडवलशाहीला जगामध्ये कुठेच बेकारी, विषमता, युद्धखोरी हे प्रश्न सोडवता आलेले नाहीत. या सर्व गोष्टी आकलन करायला मार्क्सवादी विश्लेषण पद्धतच उपयोगाला येते. भांडवलशाहीला पार्लमेंटरी लोकशाहीच विकसित करता येते व भांडवलदारांच्या आपसातील वादाचा आखाडा पार्लमेंटमध्ये प्रतिबिंबित होतो, तसं कामगार कष्टकरी चळवळींनासुद्धा ही पार्लमेंटरी लोकशाही चळवळीसाठी आवश्यक असते हे विसरता कामा नये.

आजच्या तांत्रिकदृष्ट्या अतिशय विकसित झालेल्या कालखंडात कामाचे तास कमी करता येतील, हा विचार मार्क्सवादी दृष्टिकोनातूनच आपल्या समोर पर्याय म्हणून पुढे येतो. आज तर पर्यावरणाचा प्रश्न एवढा बिकट आहे, की खरोखरच नजीकच्या ३०-४० वर्षात खूप मोठ्या प्रमाणात मानवी समुदाय विस्थापित होतील. अनेक देशांची हुकूमशाहीकडे चाललेली वाटचाल तर हा प्रश्न नक्कीच सोडवू शकणार नाही. समुद्र पातळी वाढून जर बांग्ला देश मोठ्या प्रमाणांत पाण्याखाली गेला तर विस्थापित झालेली हजारो माणसं शेजारच्या देशांमध्येच येणार ना? त्यातून युद्धे पेटतील, सर्वनाशी अणुयुद्धाकडे वाटचाल होऊ शकेल, हे लक्षात घेता माणसाच्या अस्तित्वालाच एक आव्हान तयार झालं आहे." त्यावरही अनंतचं लेखन सुरू आहे. अशा अनेक गोष्टींवर बोलताना त्याच्या डोळ्यात तरळणारे अश्रू, आपल्याला स्पष्टपणे जाणवतात. वरवर काहीसा अलिप्त-तटस्थ राहणारा अनंत आत खोलवर किती संवेदनाक्षम आहे, त्याची ही साक्ष असते.

डॉ. अनंत फडके 'मी फार काही केलेलं नाही' असं म्हणतो, त्याला एक व्यापक वैचारिक आधार आहे. आपल्या सामाजिक राजकीय कामाबद्दल फारसं बोलू नये, असा एक दंडक अनेक जण पाळतात व विशेष करून डाव्या चळवळीत तर तो एक नॉर्म मानला जातो. एक परंपराच. आपण समाजाच्या मुशीत घडतो. दारिद्र्य-दैन्य-अज्ञान आणि शोषण या कोंडीत अडकलेल्या असंख्य माणसांना बंध-मुक्त होण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे. या संघर्षाला किती काळ लागेल हे कोणीच ठरवू शकणार नाही. संपूर्ण समाज बदलाच्या या प्रक्रियेत आल्याशिवाय ते घडणार नाही आणि म्हणूनच 'मी' ची वेलांटी काही कामाची नाही. अशी डाव्या चळवळीत विचारांची परंपराच आहे.

सोविएत युनियन संपल्यापासून आणि चीनने ही वेगळी वाटचाल स्वीकारल्यापासून डावा विचार संपला, हे आता जगावर खूप मोठ्या प्रमाणात बिंबवलं गेलं आहे. पण डावा विचार आणि चळवळ काय होती, त्यात झोकून देणारे कसे जगले किंवा जे थोडे दीपस्तंभ आहेत त्यांची वाटचाल, तरुण पिढी पुढे यावी, चळवळीचे हे भारावलेपणं काय आहे, या हकीकती सांगणं आनंदाचाही भाग आहे. अनंतच्या पंचाहत्तरीनिमित्त शुभेच्छा देताना हा आठवणींचा छोटासा गुलदस्ता त्याला भेट!

मुक्ता मनोहर, *पुणे*

(मुक्ता मनोहर या पुणे मनपा कामगार युनियनच्या सेक्रेटरी असून डाव्या चळवळीत कार्यरत आहेत)

(साभार - पूर्वप्रसिद्धीः समतावादी मुक्त संवाद पत्रिका मे २०२५)

गंगू बोहारीण

चिंतामणी प्रभाकर मुळे

बोहारीण म्हणजे पैशाविना वस्तूंच्या देवघेवीचा पर्यावरण पूरक व्यवहार! अतिशय प्रामाणिकपणे, सचोटीनं आपला व्यवसाय चोखपणे सांभाळणारी गंगू बोहारीण आणि निगुतीनं काटकसरीचा संसार करणारी स्वतःची आई यांच्या मायेच्या अनुबंधाची ही हृद्य चित्तरकथा!

"भट बाई, ओ, भटबाई, मोटा टोप आनि डबं आनलत बगा, तुमाला हवं तसं" खांद्यावरील जुन्या कपड्याचे गाठोडे अंगणात उतरवत गंगू बोहारीण आईला बोलावत असायची. ती आईला भटबाई का म्हणायची ते एक कोडेच होते.

गंगू बोहारणीची, महिन्यातून एखादी तरी चक्कर असायची. ती दुपारी साधारण बारा साडेबाराला येत असे. तेव्हा मी शाळेत निघालेला असे. मग मला ती सांगायची,

"दादा, वाईस हात लाव की रं पाटीला" मी खांद्यावरील दफ्तर सांभाळत तिची पाटी उतरवून देत असे. त्या नंतर माझी आई, शेजारच्या अजितच्या आई, इनामदारांच्या मनुमामी, सिंधू मावशी, सगळ्या आपापली जुन्या कपड्यांची बोचकी घेऊन येत आणि दुपारभर देवाण घेवाण चाले. देवाण घेवाण कसली? घासाघीस चाले. शाळा घराजवळ असल्याने मी मधल्या सुट्टीत तीन वाजता, चहा प्यायला घरी येत असे, तरी देखील कोणाचं तरी बोहारी पुराण चालूच असायचं.

गंगू आल्या आल्या आधी आमच्याच ओटीवर बसून झुणका भाकर खाऊन घेत असे. चाळीतील कोणी तीला लोणचे देत, कोणी खारातील मिरची देत, कोणी प्यायला ताक देत, पण ती नेहमी आईला सांगत असे "भटबाई, तुज लोनचं एकदम झ्याक बरं". जेऊन झाल्यावर पेल्याला तोंड न लावता घटाघटा पाणी पिऊन ती एक मोठी ढेकर देत असे. अंगणा समोर लावलेल्या झाडांमध्ये चूळ भरून, हात पदराला पुसत, मग दिलेले कपडे बघायला सुरवात करत असे.

एक एक कपडा उलगडून नीट न्याहाळून झाला की प्रथम चहा गाळायच्या गाळणीपासून भांडे दाखवायला सुरवात करत असे. तिला त्या गाळणीपासून एखाद्या पातेल्यापर्यंत किंवा एखाद्या मध्यम आकाराच्या डब्यापर्यंत नेण्याचं आमच्या चाळीतल्या बायकांचं कसब सुद्धा वाखाणण्याजोगे होते, म्हणूनच की काय हा कार्यक्रम दीड दोन तास चालत असावा.

गंगू बोहारीणीला मी लहानपणापासून बघत आलो होतो. त्या वेळी बऱ्याचदा तिच्या कडेवर एखादं तान्ह पोर असायचं. टपोऱ्या डोळ्यांचे, भरपूर काजळ घातलेलं, डोक्यावर लाल झालर असलेले रंगीबेरंगी टोपडं घातलेलं, कधीकधी कुंची घातलेलं, नजर लागू नये म्हणून गालावर काजळाची टीट लावलेले आणि वीतभर चड्डी घातलेलं. त्या पोराच्या हातात चाळीतल्याच कोणीतरी दिलेला खाऊ असायचा, नाकातून शेंबूड गळत असायचा आणि त्या वर माश्या घोंगावत असायच्या. त्या पोराकडे बघत गंगू मग नाराजीने सांगायची

"ह्या, टायमाला पण पोरगीच झाली बगा"

मग आई तिला सांगायची "तू झालीस तेव्हा किंवा मी झाले तेव्हा आपल्या आई वडिलांना पण असंच वाटलं असेल, पण काय वाईट झालं? पोरींना आईबापाची माया जास्त असते. पोरी, लग्न झाल्यावर एका नाही तर दोन घराण्याचं नांव मोठं करतात. कष्टाला मागे नसतात, तुझंच बघ ना. नवरा एव्हढा पितो पण तू काय कमी कष्ट करतेस संसाराकरिता? पोरगा काय, नीट शिकला सवरला तर ठीक, नाहीतर घराण्याचा वंशज म्हणून लाडावून ठेवायचा आणि वाया जायचा, चारचौघात घराण्याचं नाव घालवून बसायचा, तुझा नवरा नाही दारूत पैसा घालवत? ही पोर तर चांगली नक्षत्रासारखी आहे, शाळेत घाल, शिकव तिला, शिकली तर नोकरी लागेल, चांगली मोठी होईल, नाव काढेल तुझं." मग गंगूला आईचे म्हणणे पटत असे "अगदी बराबर बोललात बगा ताई, धन्याला बी सांगते" असं ती म्हणायची, पण ते तेव्हढ्यापुरतेच पुन्हा सात आठ महिन्यांनी पोटुशी राहिलेय म्हणून वाईस लोनच द्येवा कि मिरचीचं" म्हणून तिची मागणी असायची.

गंगू बोहारीण बरीच वर्षे आमच्या चाळीत येत असे. मजबूत बांधा, थोडीशी ठेंगणी, चटपटीत तरतरीत. नेहमी कपाळावर ठसठशीत कुंकू. गळ्यात जाड काळ्या मण्यांच मंगळसूत्र, इरकली चोळी त्याला ठिकठिकाणी काचेचे आरसे लावलेले, नाकात नथ, पायात पैंजणपट्ट्या, काखेत एखादी कळशी नाहीतर हंडा, खांद्यावरून मागे सोडलेले जुन्या कपड्यांचे गाठोडे, डोक्यावर बांबूची टोपली त्यात लहान मोठे अल्युमिनिअमचे डबे, पराती, थाळ्या, ताकाचा गंज, किसणी आणि छोटे मोठे चमचे आणि खणखणीत आवाज "भांडीय SSS, भांडीय SSS" अशी आरोळी

ऐकली की चाळीतील सातआठ जणी तरी लगेच जमा होत. सकाळी कुठं मनासारखा सौदा झाला असेल तर गंगूच्या डोळ्यात एक वेगळीच चमक दिसत असे.

त्या वेळी हल्ली सारखे मॉल वैगरे नव्हते. तयार कपड्यांचे फॅड नव्हते. शाळेचे युनिफॉर्म वर्षानुवर्षे त्याच रंगांचे असत, आमच्या शाळेचा निळी पॅन्ट - पांढरा शर्ट होता. मोठ्या भावाचे कपडे लहान्याला येत आणि आम्ही कोणी जुने कपडे म्हणून तक्रार करत नसू. नातेवाईकांत देखील येईनासे झालेले कपडे आपापसात बदलून वापरले जात. त्या वेळी कपड्याची शिलाई मजबूत असायची आणि कापडही टिकाऊ असायचे. शिंप्याकडून कपडे शिवून घेतले जात. शिंपीही वर्षानुवर्षे ठरलेला असे. सणासुदीला शिंप्याकडे प्रचंड काम असायचे पण शिंपी वडिलोपार्जित असल्याने दसरा दिवाळीला दिवसाची रात्र करून नवीन कपडे शिवून देत असत. अंगावरून माप घेताना मोठ्या मायेने चौकशीही करत असे. कपडा थोडाफार आटला तर वाढवण्याकरिता कापडाला माया ठेवत ती वेगळीच.

त्या वेळी शाळेत इस्त्री केलेले कपडे घालायची फॅशन नव्हती. शाळेत काही कार्यक्रम असला तर स्टोव्हवर पाणी पिण्याचा तांब्या गरम करून आम्ही युनिफॉर्मला इस्त्री करत असू. रोज इस्त्री न केल्याने कपडे जास्त खराब होत नसत त्यामुळे बोहारिणीला द्यायला जुने कपडे फारसे नसत. पण गंगूची ख्याती आमच्या नातेवाईकांत पसरल्यामुळे माझी मावशी, काकू आणि मामी आमच्याकडे येताना त्यांचे जुने कपडे घेऊन येत. मावशीच्या सासूबाई नऊवारी साड्या पाठवत. काकांचेही कपडे असत. त्यांनी कोठल्या प्रकारचा डबा हवा की पातेले हवे ते सांगून ठेवलेले असे त्या प्रमाणे आई घासाघीस करत गंगूकडून ते घेत असे.

मला आठवते आजीच्या नऊवारी जरीच्या साड्या गंगूला नेहमी हव्या असत. त्या जरीच्या काठपदरात म्हणे सोने असायचे. जरीच्या साडीवर हमखास मोठे पातेले किंवा मोठी परात मिळत असे. आई नेहमी गाठोड्यातील अर्धेच कपडे बाहेर आणत असे, कारण, दिलेल्या कपड्यांमध्ये गंगू कधीच खूश होत नसे. कितीही दिलं तरी तिला अजून काही हवं असे. तास दीडतास ती आणि आई एक एक कपडा काढून त्यावर साधक बाधक चर्चा करीत असत.

साडी उलगडून एक एक पदर बघत गंगू म्हणायची "ताई, ही साडी लय इरली बगा खालच्या बाजूला"

मग आई म्हणायची, "विरलीय म्हणून तर बाद केली ना, दुकानातून नवीकोरी साडी आणून देऊ की काय तुला?"

मग एखादी पॅन्ट उलगडून गंगू म्हणायची "ढोपरावर पार घासली की हो पॅन्ट, मला तर रफू करायलाच चार दिस जातील आणि हा शर्ट पण जुनाट वाटतोय, ह्ये डाग कसले खिश्यावर?"

"अग जुना कसला? हा शर्ट दोनदा का तीनदाच घातलाय, इस्त्री करतात ना पोरं, तापलेल्या तांब्यानं, तेव्हा दादांच्या हातून थोडा जळलाय, म्हणून तुला देतेय. तसा नवीनच आहे!" आई.

"अहो, ताई जळालेलं कापड कोन बी घ्येत नाय. नवीन असून काय फायदा?" गंगू सांगायची. मग चाळीतील बाया तिला विचारत "करता काय गं, आम्ही दिलेल्या कपड्याच?"

मग ती सांगायची "आधी तर आमी कपडे वायले वायले ढिगात लावतो, खूप फाटकं कापडं पायपुसनी करता व्यापारी नेतो, थोडं फाटलं असलं तर आमी आधी शि**वून ठीकठाक करतो**, सगळी कापडं धुतो, **सोच्छ झाल्यावर इस्त्री** करून घेतो, मग व्यापारी घेऊन जातात. हिथं, तुमच्या मागं बगा, गणेश शिणेमाच्या गल्लीत बुधवार बाजार भरतो, तशा बाजारात ह्ये व्यापारी त्ये कपडे ईकतात, कदी एखादी साडी लयच ईरली असेल तर वाकळीत किंवा गोधडीत घालाया वापरतो आणि एकदम चिंधी झाली असलं तर गॅरेज वाले किलोवर घेऊन जातात, हल्ली हल्ली त्ये रश्शी बनवणारे पण फाटकी लुगडी न्हेतात. "

"अरे वा, म्हणजे बरेच उपदव्याप करावे लागतात, पण पैसे लगेच मिळतात की उधारीवर ?" कोणीतरी विचारायचे.

"हा, कदी मिळत्यात कदी बुडत्यात, पण भांड्यांच्या दुकानाला उधारी चालते, म्हून जमतं सारं"

"पण, पण भांड्यांच्या किमती कशा लक्षात राहतात आणि कपड्यांचे किती पैसे येतील त्यातून भांड्यांची किंमत वजा केल्यावर तुला काय सुटणार हे गणित, बरं पटकन लक्षात येत ग तुझ्या?" सिंधू मावशी विचारायची.

"आता ग बाया? तुमि म्हणजे माझी मुकालात घेताया, रेडिओवर घ्येतात तशी?" गंगू गमतीने म्हणायची. मग ती भांड्यांच्या तळाशी लाल पेन्सिलीने लिहिलेले किमतीचे आकडे दाखवायची.

आमच्या इतर नातेवाईकांचे कपडे देखील गंगूला द्यायचे असल्याने माझ्या आईची कपडे देण्याची वारंवारिता जास्त होती आणि त्या मुळेच गंगूशी घसट देखील. त्या काळी अमेझॉन वैगेरे नव्हते, क्रेडिट कार्ड वैगेरे पण नव्हते. भिशी लागल्यावर काय घ्यायचे, दिवाळीच्या बोनसला काय घ्यायचे, बोहारीणी कडून काय घेता येईल, ते सर्व ठरवून ठेवावे लागे. पगार बेताचे असल्याने

संसार काटकसरीने केले जात. वाचवलेल्या एक एक रुपयाला किंमत होती, गृहिणी शिकल्या सवरल्या नसल्या तरी अर्थशास्त्रात पारंगत होत्या. जुने कपडे देताना मावशीने काय हवे ते आधीच सांगितलेले असायचे, मग आई गंगूला त्या हुन मोठासा डबा तिला हवा आहे म्हणून सांगायची. गंगू त्यातला थोडा आतला डबा काढायची. त्यावरून मग जुगलबंदी सुरू होत असे.

"हा मोठा डबा देतेस का ठेऊ कपडे परत बांधून?, माझे थोडेच आहेत, गोरेगावच्या मावशीचे आहेत, हा असला लहान डबा, तिला गोरेगावला पण बोहारिण देत होती, मोठा डबा पाहिजे म्हणून तर तिने इकडे कपडे पाठवले. चल जाऊ दे" म्हणत आई गाठोडं बांधायला घेई आणि मग सुवर्णमध्य म्हणून थोड्या आतल्या घेराच्या डब्यावर दोघींमध्ये समेट होत असे. उठताना आई म्हणे “जाऊ दे, डबा जरा लहानच मिळाला पण बाबीच्या गाठोड्याची अडचणच झाली होती घरात. त्यापेक्षा हा ठीक आहे.”

एकदा असेच आईने आमच्या भिवंडीच्या काकूंचे कपडे दिले. साड्या होत्या, शर्ट होते काकाच्या काही पँट्स होत्या. काकूच्या आईच्या नऊवारी साड्या होत्या. त्यावर तिला दूध तापवायचा शिटीवाला कुकर हवा होता. ह्या कुकरमधून दूध ओतू जात नसे. दूध तापले की शिटी वाजू लागे, शिटी वाजली की स्टोव्ह बंद करायचा. खूप घासाघीस केल्यावर गंगूने हो नाही करत स्टीलचा कुकर दिला होता. हा काका सरकारी नोकरीत होता त्या मुळे फिरतीवर असायचा. थोडा विसराळू देखील होता. मंगळवारी कुकर देऊन गेलेली गंगू दुसऱ्याच दिवशी परत दारात हजर बघून आईला आश्चर्य वाटले. कालच्या हिच्या हिशेबात काही गडबड झाली की काय? “काय ग? काल तर येऊन गेलीस ना? आज परत सकाळी सकाळी?” आईने बाहेर येऊन विचारले.

“अहो, वाईस पाटी खाली तर उतरवा, मंग सांगत्ये” गंगू म्हणाली.

आईने पाटी उतरवताच तिने चुंबळ मोकळी केली आणि आतून एक चामड्याचे पैशाचे पाकीट काढले.

“काल तुमी त्या पँटी दिल्या नव्ह, त्यातल्या एका पॅन्टीत ह्ये होतं बागा” गंगूने पाकीट आईकडे देत सांगितलं.

“अरे, हे तर अविभावजींचं पाकीट, तो काय फोटो पण लावलाय त्यांनी वरती, पैसे वैगेरे पण आहेत कि काय?” आईने पाकीट हातात घेत घाईघाईने विचारले.

“काय माहित? म्या कशाला बगतेय, काल रातच्याला पॅन्टीचा खिसा शिवाया घेतला तर हाताला जाड लागला, म्हणून बगितलं तर ह्ये गावलं, तसंच चुंबळीत बांधून ठेवलं, आले घेऊन” मग ती थोडी उठून खाकरून थुंकून आली.

“भट बाई, थोडा च्या टाका, चपाती आणलीय, च्यात बुडवून खात्ये जरा, भूक लागलीया, तशीच निगल्ये घरातून, येक तर रातभर डोल्याला डोला न्हाय, तुमचं पाकीट डोक्याखाली घेऊन झोपली व्हते.” आईने पाकीट उघडून बघितले, दोन हजार रुपये होते. मग आईने ताबडतोब काकूला फोन केला तेव्हा समजले की हे पाकीट गेले दोन महिने ते शोधत होते. त्यांना वाटत होते की ट्रेनमध्ये कोणी मारले असेल. अविकाकाने मग फोन करून सांगितले की गंगूला माझ्यातर्फे शंभर रुपये बक्षिशी दे म्हणून, पण गंगूने ते घेतले नाहीत. उलट ती म्हणाली,

“न्हाय बा, तुमचं पैसं तुमाला आणून दिलं त्यात बक्षिशी कसली? नशीब माझ्या ध्यानात आलं नायतर मारवाड्यानं आनुन दिलं असतं का काय माहित?” त्यानंतर मात्र आईच काय चाळीतल्या सगळ्याच बायकांनी गंगूशी कपड्यांवरून हुज्जत घालणे सोडून दिले आणि गंगूबद्दल त्यांचा आदर खूप वाढला.

काकूने शिटीचा दुधाचा कुकर घेतल्यापासून आईलाही तसा हवा होता. आईने त्या दृष्टीने कपडे जमवायला सुरवातही केली होती.

पण एके रात्री अचानक वाईट घटना घडली. आम्ही जेवायला बसलो असताना आईला अचानक उच्च रक्तदाबाचा झटका आला आणि ती जेवता जेवताच बेशुद्ध पडली. आमच्या शेजारी तेव्हा शिवसेनेचा एक कार्यकर्ता अजित साळवी म्हणून राहत असे, आता तो भारतीय कामगार सेनेचा कार्याध्यक्ष आहे, त्याने ॲम्ब्युलन्सची वाट न पाहता आईला दोन्ही हातावर उचलून ताबडतोब नगरपालिकेच्या इस्पितळात नेले पण व्यर्थ. दोन दिवस आई बेशुद्धावस्थेत होती आणि तिसऱ्या दिवशी आम्हाला सगळ्यांना सोडून ती कायमची सोडून गेली. एक तर पावसाळी दिवस. त्या वेळी पाऊस धोधो पडत असे. आमची चाळ जुनी झालेली. गळकी कौले आणि फुटक्या भिंती. कौलातून पाणी गळायचे, अचानक अशी घटना घडल्याने भेटायला येणाऱ्या मित्र मंडळी आणि नातेवाईकांची रीघ लागलेली. ह्या अघटित घटनेने आम्ही दोघे भाऊ आणि वडील खूपच भांबावून गेलो होतो. कोणालाच काय करावे ते सुचत नव्हते. तरी बरे आईची मोठी बहीण म्हणजे आमची बाबीमावशी आईचे दिवस कार्य होईस्तोवर राहायला आली होती.

त्या दिवशी दुपारी अंगणातून आईला कोणीतरी बोलावत होते, गंगूच असावी.

“ओ, भट बाई, ओ, भटबाई, कापडं आणा, तुमचा दुधाचा कुकर घेऊन आलीया” शेजारच्या अजितच्या आई खूण करून तीला बोलावत होत्या पण तिचे लक्षच नव्हते.

“ओ, भटबाई, ओ भटबाई” गंगू बोलावतच होती. शेवटी बाबीमावशी बाहेर आली.

“अग, कोण तू गंगू ना? अगं, भटबाई गेली, आपल्याला सोडून गेली, कायमची गेली.” आणि मावशीने डोळ्याला पदर लावला. एकंदरीत घरातील वातावरण बघून गंगूला पण संशय आला असावा. गंगू मटकन खालीच बसली. तिलाही दोन मिनिटे काय

बोलावे ते सुचेना.

"अरं देवा, असं कसं झालं हो ? काय झालं भट बाईला? ताई, लय मायेची होती बगा तुमची बहीन, लय मायेची, अशी कशी गेली? अवो, ह्यो दुधाचा कुकर हवा होता तिला, गेल्या टायमाला मागत व्हती, दिला असता तर.. अशी कशी गेली भटबाई.? आणि गंगू हमसून हमसून रडू लागली. निघताना तिने आमच्या खोलीबाहेर आढ्याला बांधलेल्या आईच्या अस्थींच्या मडक्याखाली तो कुकर ठेवला, नमस्कार केला आणि मागे वळून न बघता ती निघून गेली.

नंतर शिक्षणाचे दृष्टीने, मी आणि माझा लहान भाऊ, आमच्या द्वारका मावशीकडे विलेपार्ल्याला राहायला गेलो. कधीकधी आम्ही सुटी पडल्यावर, वडिलांबरोबर राहायला मुलुंडला घरी येत असू पण गंगू बोहारीण कधी दिसली नाही. शेजारच्या अजितच्या आई सांगत, गंगू हल्ली पूर्वीसारखी येत नाही, कधी सहा महिन्यांनी आली तरी तुमच्या खोलीसमोर उभी राहून "भटबाई, अशी कशी गेली? कशापाई गेली लवकर?" म्हणत दारातल्या तुळशीला नमस्कार करून जाते. पण आम्हाला गंगू नंतर कधीही भेटली नाही.

आता त्या गोष्टीला बरीच वर्षे झाली. आमची चाळ पाडून तेथे एक टोलेजंग इमारत झाली आहे. चाळीत पूर्वी येणारे पिंगळा, वासुदेव, पोतराज, नंदीबैल हल्ली दिसतही नाहीत. बाहेरील विक्रेत्यांना इमारतीत येण्यास मनाई आहे. चाळीतील आईच्या समवयस्क मैत्रिणीही एक एक करत गेल्या. चाळीतील जुनी माणसे आता उरली नाहीत. गंगूने दिलेला तो दुधाचा कुकर मात्र अजूनही आमच्याकडे आहे, कधीही न वापरता आम्ही तो तसाच शोकेसमध्ये ठेऊन दिला आहे आईची आणि गंगूची आठवण म्हणून.

चिंतामणी प्रभाकर मुळे, *ठाणे*
cpmulye@yahoo.com

(पान १९ वरून) स्व-परिघात रमलेल्या कुणालाही त्यातून बाहेर पडण्यासाठी ती साद घालते. 'आरसा' संग्रहातली ही कविता वाचून 'रारंगढांग' या कादंबरीचे लेखक प्रभाकर पेंढारकर यांचे अशा आशयाचे पत्र आले होते. ते लक्षात राहिले आहे. ती कविता-

प्रिय सखी

प्रिय सखी,
सध्या मी आटपाट नगरातील
एका भव्य पिंजऱ्यात राहाते आहे.
याच्या भिंतींना पाचूचा रंग आहे
आणि याला चांदीचे छत आहे!
याची दारं पारदर्शी आहेत.
आणि गंमत म्हणजे
ती बाहेरून नाही,
आतून बंद आहेत!
उडी मारून कडी काढता येईल
एवढीच ती उंच आहे..
पण इथल्या संगमरवरी फरशीला
गुरुत्वाकर्षण फार आहे!
उंच उडीचा सराव असूनही
उडी जमेनाशी झालीय.
नि आतल्या भव्यपणातच
मला वाटतं, मी आता रमू लागलीय!

'चिऊताई, चिऊताई दार उघड'
असं म्हणत तू आलीस तर
'अंघोळ घालते थांब माझ्या बाळाला'
असंच काहीसं माझ्या तोंडून येईल.
पण सखी,
रागावून तू लगेच निघून जाऊ नकोस.
मला साद घालीत रहा.
मी केलेला उंच उडीचा सराव
बहुधा मला इथे रमू देणार नाही!

सुखवस्तू मन आटपाट नगरातल्या भव्य पिंजऱ्यात रमलेलं असणं, दरवाजा बाहेरून नाही आतून बंद असणं, उडी मारून कडी काढता येईल इतकीच ती उंच असणं, संगमरवरी फरशीला गुरुत्वाकर्षण फार असल्यामुळे उडी जमेनाशी होणं... या सर्व प्रतिमा पटकन रीलेट होणाऱ्या आहेत. स्वतःतून बाहेर पडण्याची प्रेरणा देणाऱ्या सखी मंडळातील वेगवेगळ्या उपक्रमांच्या प्रभावातून 'साद घालत राहा' असं म्हणणारी ही कविता जन्माला आली.

विद्याताईंच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या पाच संस्थांपैकी सखी मंडळ आणि मिळून साऱ्याजणी या दोन संस्थांमधे मी थोडी सक्रीय होते. एकदा अक्षरस्पर्श या नाविन्यपूर्ण ग्रंथालयाच्या कार्यकारिणीत काम करण्याविषयी मला विचारलं गेलं. तेव्हा मी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. त्यामुळे लगेच हो म्हटलं. तिथे काम करण्यातून संपर्क-संवादाचे नवे मार्ग माझ्यासमोर खुले झाले. अक्षरस्पर्श मधल्या अक्षरगप्पांमधून, नवी पुस्तकं वाचण्यातून वेगवेगळ्या अनुभव-विश्वांचा परिचय झाला. त्या त्या लेखकांशी पत्र-संवाद होत राहिला. विचारांना नव्या दिशा दिसू लागल्या. अंतर्मुखता समृद्ध होत गेली. नव्या ऊर्जेसह माझ्या कवितेचा प्रवास चालू राहिला.

आसावरी काकडे, *पुणे*
asavarikakade@gmail.com

रेऊ कथा स्पर्धा २०२४ / पारितोषिक प्राप्त कथा

(विज्ञान कथा) :

2050 AD एक गोष्ट सोडून...

डॉ. अभिराम दीक्षित

वसूने डाव्या कोपराने जंतुनाशकाच्या बाटलीचे बटण दाबले. ते निळे द्रावण उजव्या हातात घेतले. प्रथम दोन्ही हातांची बोटे चोळली मग तळहात. मागची बाजू. आधीच उघडून ठेवलेले निर्जंतुक ग्लोव्ह्ज चिमटीने उचलून हातांवर चढवले. ॲक्सेस कंट्रोल पाशी बुब्बुळ दाखवले. पहिला दरवाजा उघडला.

मग दुसरा दरवाजा उघडण्यासाठी तिने पुन्हा ॲक्सेस कंट्रोल पाशी बुब्बुळ दाखवले. ती तिच्या कॅबिनेटमधे दाखल झाली. डॉ. वसुंधरा सुब्रमण्यम वय वर्षे ४३. अविवाहित. ती एम.बी.बी.एस. ला होती तेव्हा तिच्या टप्पोऱ्या बोलक्या डोळ्यात भरपूर पोट्टी बुडाली होती. विजय त्यातलाच एक. ज्या डोळ्यात तो तासन् तास हरवून जायचा त्याखाली आता काळी वर्तुळे येऊ लागली होती. वसुने मेकअपचे साहाय्य कधीच घेतले नाही ती वर्तुळं लपवायला. विजयने परदेशी उच्च शिक्षणासाठी त्याच्या प्रेमाचा त्याग केला; तेव्हाच तिचा पुरुष जमातीवरचा विश्वास उडायला हवा होता. पण तसं झालं नाही.

मायक्रोबायोलॉजी – एम.डी.च्या शेवटच्या वर्षाला होती ती... तेव्हा एका देखण्या प्राध्यापकाच्या प्रेमात पडली. बाहुपाशात विसावली. मनालीच्या हवेचा कैफ अन् केरळच्या समुद्राची नशा आकंठ प्यायली दोघं एकत्र. पण प्राध्यापक महाशय आणखी बऱ्याच विद्यार्थीनिंबरोबर भारत दर्शन करून आले होते. अन् त्यांचा प्रवासी बाणा मोठा चिवट होता. तेही जहाज एका दुसऱ्या बंदराला लागलं. वसू रडली नाही त्यादिवशी. नंतर कधीच रडली नाही ती.

अमेरिकेतल्या जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटीतून पीएच. डी. पूर्ण केलं आणि तिथेच रिसर्च असिस्टंट म्हणून काम करू लागली. जिद्दीच्या, कष्टाच्या आणि अंगभूत हुशारीच्या जोरावर अतिशय कमी वेळात तिथल्या मायक्रोबायोलॉजी विभागाची प्रमुख बनली ती. तेही एवढ्या कमी वयात.... ४३ म्हणजे कमीच वय हो त्या पोस्टसाठी.

वसूनं आत पाऊल टाकताच डॉ. जॉन तिच्याकडे पाहत मान हलवता झाला. हसायची सोय नव्हती कारण बायोहजार्ड चेंबरमधे तोंडावर मास्क घालून बसला होता तो. आता मास्कच्या आड हसलं काय? किंवा जीभ दाखवून वेडावलं काय? दिसणार कसं समोरच्याला? पण वसू कधीच हसण्याला प्रतिसाद द्यायची नाही. चेंबर बाहेरही नाही. कोणाच्याच नाही.

वसूची एक ज्युनियर अमेरिकन मुलगी हॉस्पिटलमधून आलेली सॅंपल्स चेक करत होती. युरिन, स्टूल, स्पुटमची रूटीन सॅंपल तिनं बाजूला काढली. टीबीची, एंडोस्कोपी करून काढलेली वगैरे स्पेशलाइस्ड सॅंपल्स वेगळी केली. आत्ता मुद्दा असा की. युरिन इंन्फेक्शन झालंय म्हणजे कुठल्यातरी जंतूचा संसर्ग झालाय. पण कोणत्या जंतूचा? ते कसं ओळखणार? त्यासाठी ते सॅंपल एका कल्चर प्लेटवर लावायचं ती ३७ डिग्री सेल्सियसला उबवायची. त्या कल्चर प्लेटमधलं अन्न खाऊन जंतू वाढतात. आणि सुरेख अशा कॉलन्या बनतात त्यांच्या.

त्या कॉलोन्यांचे गुणधर्म प्रत्येक जंतुसाठी वेगवेगळे असतात. म्हणजे प्स्यूडोमोनास ह्या बॅक्टेरियाची कॉलोनी हिरवी असते. इ कोलाय नावाच्या जंतूची कॉलनी लाल रंगाची बनते. तर कोणी रेअर जिवाणू निळ्या जाभळ्या कॉलन्या बनवतो.

कॉलन्यांच्या रंगावरून, त्यांच्या रासायनिक गुणधर्मावरून, आणि मायक्रोस्कोपखाली त्या जंतूचे निरिक्षण करून त्याची बिनचुक प्रजाती ओळखता येते.

त्या जंतूंची प्रजाती ओळखणं आता फारच महत्त्वाचं बनत चाललं होतं. कारण अँटीबायोटीक्सना (प्रतिजैविक औषधे) हे रोगजंतू प्रतिकारशक्ती डेव्हलप करू लागले होते. प्रत्येक प्रजातीसाठी वेगळं अँटीबायोटीक् आवश्यक बनलं होतं. त्यामुळे जंतूची प्रजाती ओळखणं हे औषधोपचारासाठी अतिशय आवश्यक बनल होतं. आणि वसू या शास्त्रातल्या सर्वश्रेष्ठ तज्ज्ञांपैकी एक होती.

ती काम करायची जीव तोडून, विद्यार्थ्यांना शिकवायची जीव तोडून, पण जीव कोणालाही लावत नव्हती. बॅक्टेरियांच्या कॉलन्यात रमत होती. पण मनुष्याच्या कॉलन्यातून - समाजातून तिचा जिव उठला होता.

तिनं सगळ्यांसाठीच रेसिस्टन्स तयार केला होता.

एक गोष्ट सोडून...

लाइफबुक - सोशल मीडिया

सोशल मीडिया आता जीवनाचा अविभाज्य भाग बनला होता. नोकरी देताना किंवा महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी सुद्धा सोशल मीडियावरची लोकप्रियता जमेस धरली जाते. सोशल मीडियापासून दूर राहणे अशक्यच होतं. वसूचा जीव माणसांच्या कॉलन्यातून उठला होता. बॅक्टेरियांच्या कॉलन्यात रमत असताना मानवी समाजाशी संबंधाचा एकच तंतू शिल्लक

होता. सोशल मीडिया.

२०४० साली फेसबुक बंद झाले. त्यानंतर लाइफ बुक नावाची स्वतंत्र प्रणाली अस्तित्वात आली. फेसबुक, गुगल, व्यावसायिक लिंक्ड इन, व्हॅट्स ॲप, इंस्टाग्राम, कौटुंबिक फॅमिली इन, शैक्षणिक स्टेड या साऱ्या सोशल मीडिया कंपन्यांनी एक होऊन लाइफबुक नावाची नवीन सोशल मीडिया साईट सुरू केली होती. मनोरंजन, लेखन, पत्रकारिता, शिक्षण, नोकरी आदी सर्वांसाठी लाइफबुक हा मानवी जीवनाचा आधार बनला आहे. काही कंपन्या नोकरी देताना सोशल मीडियावरील लोकप्रियतेचा आढावा घेत आहेत.

नोकरीसाठी नाही पण.. वसुंधरा माणसांच्या कॉलनीशी फटकून होती म्हणून तिने लाइफबुकला आधार बनवले होते. 'विजया' अशा खोट्या नावाने ती फेक अकाउंट चालवत असे. आणि कामाशिवायचा सारा वेळ लाइफबुक वर घालवत असे. हळूहळू तिला लाइफ बुकशिवाय चैन पडेना. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा लाइफ बुक. पुढे लाइफ बुकसाठी कामातून वेळ काढू लागली.



अशीच एकदा ती लाइफ बुकमध्ये दंग असताना मोबाईल खणाणला... फोन वॉशिंग्टनहून होता. अमेरिकेच्या आरोग्यमंत्र्यानी तातडीची मिटिंग बोलावली होती. जंतुशास्त्र - मायक्रोबायोलॉजी मधले देशभरातले शास्त्रज्ञ बोलावून घेतले होते. लाइफ बुकवरची विजया बंद झाली आणि मायक्रोबायॉलॉजिस्ट डॉ. वसुंधरा भानावर आल्या.

अमेरिकेच्या आरोग्य मंत्र्यानी प्रत्यक्ष मिटिंग बोलावणे म्हणजे काहीतरी भयंकर असणार हे उघड होतं. प्रत्यक्ष भेटी जवळ जवळ कालबाह्य झाल्या आहेत. व्हिडियो कॉन्फरन्सिंगवर बोलता येणार नाही, इतके गुप्त आणि अतिमहत्त्वाचे असल्याशिवाय का फोन आला?

वसुच्या मनात काळोख दाटला (कदाचित) तिने मागच्या महिन्यात वर्तवलेला अंदाज खरा ठरला होता? आणि दक्षिण आफ्रिकेतल्या कुठल्यातरी शिल्लक जंगलात नार्ड व्हायरसचा जन्म झाला होता? स्वतःचं भाकीत खरं ठरल्याचे भयंकर दुःख वैज्ञानिकाला सहसा होत नाही. पण ही केस वेगळी होती.

नार्ड व्हायरस हे डॉ. वसुंधरा सुब्रमण्यम यांचेच वैचारिक अपत्य होय. कळलाव्या नारदावरून हे नाव सुचले असावे! बॅक्टेरिया आणि व्हायरस हे दोन अतिशय वेगळे सूक्ष्म जीव आहेत. बॅक्टेरिया - जिवाणू हा सूक्ष्मजीव म्हटला तर व्हायरस हा अतिसूक्ष्म जीव आहे. व्हायरसचा आकार बॅक्टेरिया हून अनेक पटीने लहान असतो. व्हायरस इतका लहान असतो की मायक्रोस्कोप खाली जिवाणू दिसतात पण विषाणू दिसू शकत नाहीत. व्हायरसच्या तपासासाठी डी.एन.ए. ॲनालिसीसवर अवलंबून राहावे लागते.

गणित - उत्क्रांतीशास्त्र आणि जीवशास्त्र यांचे दाखले देत वसूने नुकतेच काही प्रबंध सादर केले होते. त्यात तिने असे सिद्ध केले होते की व्हायरसच्या सध्याच्या प्राजातीमधले अनुवांशिक बदल धोक्याची घंटा वाजवत आहेत. एका नव्या व्हायरसचा जन्म होतो आहे. हा व्हायरस माणसाला अपाय करणारा नाही. जीवाणूंना संसर्ग करणारा हा व्हायरस आहे. पण त्यामुळेच मानव जातीचे भविष्य धोक्यात येऊ शकते.

जिवाणू आणि विषाणू (व्हायरस) हे दोघेही माणसाला संसर्ग करतात हे आपल्याला माहीत आहे. पण काही व्हायरस असे असतात की ते फक्त जीवाणूंना संसर्ग करतात. माणसाला नाही. २०५० साली सर्व जिवाणू म्हणजेच बॅक्टेरियानी अनेक ॲंटीबायोटीक्स औषधांना रेसिस्टन्स म्हणजेच प्रतिकारशक्ती तयार केलेली आहे. त्यामुळे प्रत्येक जिवाणूसाठी एक औषध राखीव ठेवण्यात आलेले आहे. हा जो कळलाव्या नार्ड व्हायरस आहे त्याची गोम इथेच आहे.

नार्ड व्हायरस फक्त जीवाणूंना संसर्ग करतो. त्याला बॅक्टेरियोफेज असेही म्हणतात. Bacteriophage म्हणजे जिवाणू भक्षक विषाणू. जिवाणूला व्हायरल इन्फेक्शन कसे होते? हे मोठे मनोरंजक आहे. व्हायरस हा एकपेशीय जीवसुद्धा नाही. त्यापेक्षाही निम्नस्तरीय आहे. व्हायरस म्हणजे फक्त डीएनए किंवा आरएनए असतो. तो दुसऱ्या पेशीत प्रवेश करतो आणि स्वतःचा

डीएनए त्या पेशीत मिसळवून टाकतो. स्वतःच्या असंख्य कॉप्या तयार करतो - शेवटी पेशी फुटते.... आणि त्यातून असंख्य व्हायरस पिल्ले बाहेर पडतात. जी पुढच्या पेशींवर हल्ला करायला तयार असतात.

बॅक्टेरिया- जिवाणू हा एकपेशीय जीव आहे. नार्ड व्हायरस फक्त जीवाणूंना संसर्ग करतो. जिवाणू फोडून बाहेर पडताना त्याची पिल्ले रिकाम्या हाती बाहेर पडत नाहीत. त्या जिवाणूंच्या डीएनए मधली प्रतिकारशक्ती घेऊन बाहेर पडतात. स्वतः:च्या शेपटीला जोडलेले हे जीन्स नव्या ब्याक्टेरियाला देतात. परिणाम भयंकर आहे.

जीवाणूंना नवी प्रतिकारशक्ती हा व्हायरस पुरवतो आहे. जीवाणूंना नवी अक्कल मिळाली तर हळूहळू सर्व अँटीबायोटीक्स औषधांना रेसिस्टन्स म्हणजेच प्रतिकारशक्ती निर्माण होणार आहे. गणित - उत्क्रांतीशास्त्र आणि जीवशास्त्र यांचे दाखले देत वसूने नेमके हेच सिद्ध केले आहे.

टॅक्सी एयरपोर्ट जवळ आली तशी वसू भानावर आली. एयरपोर्टवर पोचण्याआधी तिने चटकन मोबाईल बाहेर काढला आणि लाइफ बुकवरचे विजयाचे अकाउंट उघडले. वाईट, भीतीदायक आणि निराशाजनक विचारांचे मोहोळ उठले की डॉ. वसुंधरा सुब्रमण्यम - विजया बनत असत आणि लाइफ बुकच्या सोशल मीडियावर रमत असत.

अकाउंट उघडताच तिला धक्का बसला. विजय दिसला. हो तोच देखणा विजय त्याच्या बाहुपाशात संगीत होते. नजरेत काव्य होते आणि श्वासात नृत्य होते. त्याची म्हणूनच तर वसूने विजया हे टोपण नाव सोशल मीडियावर धारण केले होते. विजय कसा दिसला? पीपल यु नो? तुम्ही यांना ओळखता? ह्या सदरात विजय कसा दिसला?

एकतर वसूचे अकाउंट फेक होते. तिने कटाक्षाने जुने मित्र मैत्रिणी या अकाउंटला घेतले नव्हते. स्वतःचे खरे शिक्षण, नाव, गाव सारे लपवले होते. विजय कसा दिसला? ह्या विचारात गर्क असताना ती चालत होती. तिकीट काढले. सेक्युरिटी पार केली विमानात बसली. मोबाईल बंद केला तशी विजया बंद झाली. डॉ. वसुंधरा सुब्रमण्यम जाग्या झाल्या. आणि त्याच क्षणी वसुच्या डोक्यात विचार कडाडला. विजा चमकाव्यात तसा प्रकाश दिसला.

सोशल मीडियावर आपण किती लोकांना ओळखतो. ओळखतो म्हणजे काय असते. संवाद साधतो म्हणजे काय असते? ही एक माहितीची देवाण घेवाण असते. नार्ड व्हायरस नेमके काय करतो आहे? माहितीची देवाण घेवाण करतो आहे. काळ्या अंधाऱ्या खोलीत काडी पेटावी आणि सारे लख्ख दिसू लागावे तसे वसूचे झाले. तिला नार्डचा हेतू समजला. नार्ड म्हणजे रोगजंतूंचा सर्वव्यापी सोशल मीडिया. जिवाणूंचे लाइफ बुक! नार्डमुळे जिवाणू मोठ्या प्रमाणावर माहितीची देवाण घेवाण करू शकतात.

सोशल मीडिया म्हणजे माणसांच्या महाजालात माहितीची देवाण घेवाण.

विमानतळावर धुवाधार पाऊस पडत होता. विजा कडाडत होत्या. रात्रीच्या अंधारात विमानाने उड्डाण केले. डॉ. वसुंधरा सुब्रमण्यम डोळे मिटून सीटवर पहुडल्या होत्या. कुणाला वाटेल बाई झोपलीय पण वसूच्या डोक्यातले न्यूरॉन्स बाहेरच्या विजांहून जास्त कडाडत होते. लिंकला लिंक जुळत होती. माहिती तपासली जात होते. जुने संदर्भ आठवले जात होते. सांख्यिकी आकडेमोड सरकत होती. बाई विज्ञानातला एक कूट प्रश्न सोडवत होती. विमान अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन इथे उतरेपर्यंत वासूच्या डोक्यात अनेक शक्यता आणि त्यावरील उपायांचे विचार करून झाले होते.

वसू विमानातून उतरली. एका तंद्रीतच सर्व सोपस्कार आटपून बाहेर आली. तिच्या स्वागताला आरोग्य विभागाचे महत्त्वाचे अधिकारी डॉ. मायकेल स्मिथ आले होते. तो वसुला गेली दोन तीन वर्षे कामानिमित्ताने भेटत असे.

"हॅलो स्मिथ", नेहमीच्या कोरडेपणाने वसू बोलली. पण स्मिथ मुळातला बडबडा आणि वाचाळ गृहस्थ. तिच्या कोरडेपणाला त्याने बिलकुल मनावर घेतले नाही. गाडीत बसताच स्वतःच्या अखंड हाय स्पीड बडबडीला सुरुवात केली. वसूचा हालहवाला विचारल्यावर "डुईंग ओके / आय एम फाईन" या दोन चार शब्दापलीकडे उत्तर मिळत नसते हे त्याला सवयीने ठाऊक झाले होते. त्या भानगडीत तो पडलाच नाही. त्याने स्वतःचेच किस्से सांगायला सुरुवात केली. त्याच्या मुलाचे फुटबॉल खेळताना हाड मोडले इथपासून सकाळीच बायकोशी कसा कचाकचा भांडलो इत्यादी विषयावर गडी बोलत राहिला. वसूला हे सारे नकोसे वाटे. या वात्रट माणसाची चहाटाळ बडबड तिच्या विचारप्रवाहात अडथळे आणत होती. वसू तिकडे येऊ घातलेल्या जागतिक संकटाची आकडेमोड करण्यात व्यग्र होती आणि स्मिथची गाडी बायकोपुढे सरकेना.

वसू उगीचच त्याला बरं वाटावं म्हणून तोंडाने "हूं हूं" म्हणत होती. पण तिला तो स्मिथ ऐकू येत न्हवता, दिसतसुद्धा नव्हता. वसूच्या डोळ्यासमोर होते ते असंख्य सूक्ष्मजीव. जिवाणू - विषाणू आणि त्यांच्या माहितीची देवाणघेवाण. व्हायरस जीवाणूवर हल्ले करत होते. त्यांच्या पोटात शिरून डीएनएमधील माहिती चोरत होते. त्याच्या हजारो कॉप्या बनवून आपल्या पिल्लांना वाटत होते. पिल्ले हीच माहिती दुसऱ्या जीवाणूंना वाटणार होती. मग ते जिवाणू सुद्धा औषधांना प्रतिकारशक्ती तयार करणार होते. तिला मानवजातीच्या संहाराचे भविष्य दिसत होते. तिचा मेंदू विजेच्या वेगाने काम करत होता. कानांना झापडे लागली होती. तरीही स्मिथच्या फालतू बडबडीतून दोन - चार शब्द तिच्या चाणाक्ष मेंदूने टिपले. लाइफ बुक - फ्रेंड - अननोन.

तिला आजच वर्च्युअल अननोन विजय लाइफ बुकवर दिसला होता.

क्षणात ती जिवाणूंच्या विचारांच्या तंद्रीतून बाहेर आली.

"काय म्हणालास स्मिथ?" तिच्या प्रश्नाने स्मिथ खूश झाला.

"चला म्हणजे ही ऐकत होती तर. मला वाटलं मी पुतळ्याशी बोलतोय!"

"तसं नाही रे - लाइफ बुक अननोन फ्रेंड असे काहीतरी म्हटलंस ना?" - वसू

पुन्हा पहिल्याच उत्साहात स्मिथने स्वतःच्या बायकोची रामकहाणी पुन्हा सांगायला आरंभ केला. तो पुन्हा अर्धा तास बडबडत होता. त्या बडबडीचा थोडक्यात सारांश असा की - स्मिथने बायकोची अक्कल काढल्याने भांडण झालं होतं. स्मिथच्या बायकोला लाइफ बुकवर तिची शाळेतली जुनी मैत्रीण भेटली होती. बायको आश्चर्यचकित आणि खूश होती. यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही असा स्मिथचा हेका होता. गणित आणि संख्याशास्त्र या विषयात स्मिथची पीएच.डी. होती. आरोग्य विभागात डीएनए विषयक प्रचंड आकडेवारी आणि संख्याशास्त्र हाताळणारे जे डिपार्टमेंट असते त्याचा हेड होता. म्हणून बायकोची अक्कल काढायची काहीच गरज नव्हती. तर आपले संख्याशास्त्री मायकेल स्मिथ म्हणत होते की बिगर ओळखीची माणसे सुद्धा एकमेकांशी सहा स्टेपमध्ये जुळलेली असतात. बिन ओळखीचा माणूस सुद्धा सोशल मीडियावर दिसतो . कधी कधी - पीपल यु नो? या रकान्यात सुद्धा दिसतो. आफ्रिकेत राहाणारा एखादा अनोळखी व्यक्ती सोशल मीडियावर मित्राच्या मित्राचा मित्र असू शकतो. साधे संख्याशास्त्र गधड्या बाईला कळत नाही वगैरे वगैरे...

आफ्रिकेत राहाणारा एखादा अनोळखी व्यक्ती - सोशल मीडियावर - मित्राच्या मित्राचा मित्र असू शकतो.

वसूच्या कानांनी नेमके तिला पडलेले प्रश्न स्मिथच्या बडबडीतून फिल्टर केले होते. आपण खोट्या विजया या नावाने फेक अकाउंट काढलेले आहे. जुने मित्र मैत्रिणी फ्रेंड म्हणून घेतलेले नाहीत. मग आपला जुना प्रियकर ‘विजय’ आपल्या फेक अकाउंटला दिसला कसा? तेही पीपल यु नो मध्ये? तिने स्मिथला पुन्हा खोदून विचारले. "स्मिथ अननोन माणसे कशी दिसतात सोशल नेटवर्क वर? तेही सांभाव्य मित्र म्हणून?"

स्मिथने तिच्याकडे कारुण्यपूर्ण कटाक्ष टाकला. सर्व बायका गणितात गधड्या असतात असा स्पष्ट भाव त्याच्या चेहऱ्यावर वसूला वाचता आला. तिला या पुरुषी डुकरावर हसायला येत होते - तरी हसू दाबत ती उत्तराच्या अपेक्षेने स्मिथकडे आपल्या टप्पोऱ्या डोळ्यातून पहात होती.

लहान मुलाला समजावावे तशा सुरात स्मिथने सुरवात केली. आपली ओळख दोन तीन वर्ष जुनी आहे. तू मला या पूर्वी ओळखत होतीस का? "नाही" हे वसूचे अपेक्षित उत्तर ऐकल्यावर स्मिथच्या चेहऱ्यावर विजयाचे तेज पसरले. "साफ चूक डॉ. वसू - यू आर रॉग. माणसांच्या महाजालात आपली एका अर्थाने ओळख होतीच. माझे बॉस व्हीनसन्ट ना तू अनेक वर्ष ओळखतेस बरोबर?" "हो ओळखते" "म्हणजे आपली प्रत्यक्ष ओळख नसली तरी आपला एक कॉमन फ्रेंड होता. व्हिन्सेंटशी तुझी ओळख व्हायच्या आधी तुझ्या बॉस मार्फत अप्रत्यक्ष ओळख होतीच. म्हणजे त्या काळी आपल्यामध्ये दोन टप्प्याचे कॉमन फ्रेंड होते. बरोबर?" वसूचा कोरा चेहरा पाहून स्मिथने आपला तर्क पुढे वाढवला. आणि पटवून द्यायला दुसरे उदाहरण झाले. अमेरिकेचे माजी लोकप्रिय अध्यक्ष बराक ओबामा यांचे नुकतेच निधन झाले होते. तोच धागा पकडत स्मिथने वसूला पुढचा प्रश्न विचारला, "तू बराक ओबामांना ओळखतेस?" तिच्या उत्तराची वाट न पाहता त्यानेच उत्तर फोडलेयस - "तू ओळखतेस. अप्रत्यक्षरीत्या ओळखतेस. इतकंच काय तर पृथ्वीवरील कोणताही व्यक्ती बराक ओबामांना अप्रत्यक्षरीत्या ओळखतोच. हे मी गणिताने सिद्ध करू शकतो." असे म्हणताना स्मिथचे डोळे लकाकत होते.

"होय - बराक ओबामांना तुम्ही अप्रत्यक्षरीत्या ओळखता, आणि अरनॉल्डला सुद्धा!"

मित्राचा मित्र मित्राचा मित्र असे करत तुमची बराक ओबामांशी ओळख निघू शकते. बरोबर? आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत स्मिथ वाट पहात नसे. स्वतः:च उत्तर देऊन पुढचा प्रश्न विचारत असे. दोन वर्षांपूर्वी माझा बॉस हा आपला कॉमन फ्रेंड होता म्हणजे आपल्यात एका फळीचे अंतर होते डॉ. वसू! त्यापूर्वी आपल्या ओळखीस कदाचित दोन टप्पे असतील - त्यापूर्वी तीन ... बरोबर? अगदी अगदी बरोबर - पण मी छातीठोकपणे सांगतो की तुझी आणि ओबामांची अप्रत्यक्ष ओळख शोधण्यासाठी सहा टप्पे लागतील. कदाचित कमीच पण जास्त नाही. वसूला स्मिथचे म्हणणे समजत होते पण पटत नव्हते. तिचा प्रश्नार्थक चेहरा पाहून स्मिथने आपले गणिताचे घोडे पुढे दामटले, "गणित म्हणजे कागदी आकडे नाहीत डॉ वसू. गणिताच्या चष्म्याने पहा - सारे जग स्पष्ट होते ... सगळी कारण मीमांसा कार्यकारण भाव - सारा मेट्रिक्स स्पष्ट दिसू लागतो.

कोणताही माणूस कमीत कमी चाळीस ते पन्नास लोकांना छानपैकी जवळून ओळखत असतो. आपले १५- २० नातेवाईक, दहा मित्रमैत्रिणी आणि दहा पंधरा व्यावसायिक ओळखी तर असतातच. आधुनिक शहरी माणसे खरे तर त्याहून जास्त लोकांना ओळखतात - पण आपण कमीत कमी आकडा घेऊ. समजू सर्वसाधारण माणूस सहसा चाळीस ते पन्नास लोकांना ओळखतो. त्याचा एव्हरेज आला ४५. या पंचेचाळीस ओळखीच्या लोकांपैकी प्रत्येक जणांच्या **(पान ५६ वर)**

कविता

द्वंद्व : लाट आणि किनारा

लाट

ती बेभानपणे धावत येते किनाऱ्याकडे
की तिला जायचं असतं त्याही पलिकडे?
तो तिला मज्जाव करतो उद्दामपणे
तीही काही कमी नसते
त्याच्या पायाखालील वाळू सरकवून देते
किनाऱ्याचे अंमळ भेलकांडणे
तो तिला कह्यात ठेवण्याची पराकाष्ठा करतो
नि आपल्या कित्येक गोष्टी गमावून बसतो
त्याच्यावर कुरघोडी केली आहे तिने
या द्वंद्वात समाधानाने माघारी फिरणारी 'ती'
लाटच असते
की आणखी कुणी?

किनारा

मर्यादा उल्लंघणाऱ्या तिला अडवणं
हा त्याचा धर्म आणि त्याच्या मते,
नैतिक सामाजिक कर्तव्य
तिचे रोंरावत अंगावर येणं
माघारताना काही गिळंकृत करणं
पडलं आहे अंगवळणी, तरी...
ती मागे फिरेपर्यंत धाकधूकही
कारण... हात त्याचे पडता थिटे
हाहाकार उडवला होता त्सुनामीने!
रूपाने तेव्हा तिच्या विराट
जबर होता लागला काळिमा
अवघ्या महासागर कुळास
तसं तिचं सामर्थ्य तो मनोमन जाणतो
म्हणून धास्तावत बरंच गमावत रहातो
तरीही तिला पुन्हापुन्हा रोखण्यास...
यशस्वी तोच होऊ शकतो
'तो' 'ती'चा कि ना रा
आणखी कुणीच नाही...
हे द्वंद्व की, द्वैत?

नीलिमा रवि, *मुंबई*
मो.८८९८३४५२८८



'फादर्स डे'निमित्त...

बापमाणूस..

बापाचं बोट सुटल्यावर
स्वतःच्या पोराचं बोट
अगदी काळजीने पकडतो
तेव्हा पुरुषाचा बाप होतो,

उंची वाढवून मुलासाठी
स्वतःला न दिसणारे दाखवत
खांद्यावर उचलून घेत
पुरुषाचा बाप होतो,

मुलाला लागलेली ठेच
बघून डोळे पाणावतात
तेव्हा पुरुषाचा बाप होतो,

आपली खुर्ची सोडून
मुलासाठी जागा करत
स्वाभिमान गुंडाळत
पुरुषाचा बाप होतो.

खरंच खंबीर पुरुष
भक्कम आधार असतो,
घराचा, घरपण राखणारा..

आपण मोठे झालो
आई लहान आहे म्हणणारा
मुलगाही मग बापच वाटतो..

सर्व पुरुष शक्तीला सलाम!

प्रा. डॉ . चित्रा मिलिंद गोस्वामी
हिंदी विभाग, गोगटे जोगळेकर
महाविद्यालय रत्नागिरी
मोबा. ९६६५३३०१५४

काळोखाच्या वाटेवरची उजेडाची फुले...

अपंगत्व आणि आपण : समजून घेण्याचा आणि समावेशकतेकडे वाटचाल करण्याचा प्रवास

आपल्या आजूबाजूला अनेकदा आपण अपंगत्वाबाबतच्या अनेक चुकीच्या समजुती, रूढी आणि भेदभाव पाहत असतो. अपंगत्व हा विषय जरी समोर आला तरी सहानुभूती (sympathy) किंवा प्रेरणा (Inspiration) या पातळीवरच चर्चा येऊन थांबतात. माहितीचा अभाव आणि प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्या संधींचा अभाव असल्याकारणाने बदलासाठी हवा असणारा समजूतदारपणा आणि सहसंवेदना (empathy) पोहोचणं फार दुर्मिळ आहे.

आम्ही तिघे, म्हणजे दिक्षा दिंडे, नितीन जाधव आणि सत्यजित सीमा संजय – या तिघांनी मिळून गेल्या काही महिन्यांपासून अपंगत्व विषयक संवेदनशीलता वाढवणाऱ्या कार्यशाळा आयोजित करण्याचा उपक्रम सुरू केला. ही पोकळी भरून काढण्यासाठी आम्ही तिघांनी एक प्रामाणिक प्रयत्न करायचं ठरवलं. हा प्रयत्न म्हणजे आमची 'Disability and Us' ही कार्यशाळांची मालिका. गेल्या काही महिन्यांपासून आम्ही विविध ठिकाणी या कार्यशाळा घेत अपंगत्वावर संवाद साधत आहोत. हसतखेळत संवाद, सहभाग आणि "फॅसिलिटेशन" पद्धतीला महत्त्व देत लोकांचा अपंगत्वाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलवण्याचा प्रयत्न करतो.

नुकत्याच झालेल्या कार्यशाळेचा अनुभव : Friendship Social Foundation आणि EquiBridge Foundation यांच्या सहकार्याने अलीकडेच एक एकदिवसीय कार्यशाळा झाली. ही कार्यशाळा केवळ माहितीपुरती नव्हती, तर सहभागींना अंतर्मुख करणारी होती. कार्यशाळेत विविध उपक्रमांच्या माध्यमातून सहभागींना अपंगत्व आणि त्यातून सामोरे जावे लागणाऱ्या अडथळ्यांचा अनुभव दिला जातो. उदा. डोळ्यांवर पट्टी बांधून चालणं, हाता ऐवजी पायाने लिहायला लावणं इ. गोष्टी करताना त्यांना जे जाणवतं, तीच भावना बदल घडवून आणण्यासाठी महत्त्वाची ठरते. या कार्यशाळेत सहभागी झालेले बहुतांश लोक अपंग नव्हते. अपंगत्व हे केवळ जन्मजात नसतं, ते कुणालाही, कुठल्याही वयात, कोणत्याही कारणाने येऊ शकतं. म्हणूनच संवेदनशील होणे आणि समावेशक दृष्टिकोन बाळगणे आपणा सर्वांसाठी आवश्यक आहे.

कार्यशाळेच्या शेवटी आम्ही सर्व एकत्र येऊन चर्चा करतो. काय अनुभवलं, काय जाणवलं, आणि यापुढे आपण स्वतःमध्ये आणि आपल्या आजूबाजूला काय बदल करू शकतो, यावर होणारी ही चर्चा फारच अर्थपूर्ण आणि समृद्ध करणारी ठरते.

संख्या काहीतरी सांगतात... : संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार, दर सहा व्यक्तींमागे एक व्यक्ती अपंग आहे. भारतात २०११ च्या जनगणनेनुसार ही संख्या सुमारे २.२% आहे. परंतु प्रत्यक्षात, ही संख्या अधिक असण्याची शक्यता आहे. २०१६ मध्ये लागू झालेल्या 'Rights of Persons with Disabilities Act' नुसार आता २१ प्रकारच्या अपंगत्वांना मान्यता देण्यात आलेली आहे – ज्यात ऑटिझम, थॅलेसेमिया, मानसिक आजार, ॲसिड हल्ल्यातून वाचलेल्या व्यक्तींचा समावेश आहे.

इतकी मोठी संख्या असूनही आज शिक्षण, नोकरी, आरोग्य या मूलभूत गरजांचा लाभ घेताना अपंग व्यक्तींना अनेक अडथळे येत असतात. सरकारी आकडेवारीप्रमाणे अपंग व्यक्तींचा साक्षरता दर फक्त ५२.२%, तर श्रमबळात १५ वर्षांवरील केवळ २३.८% व्यक्तींचा सहभाग आहे. उच्च शिक्षणातील अपंग विद्यार्थ्यांचे प्रमाण फक्त ०.५६% आहे. या आकडेवारीतून स्पष्ट होते की कायद्याने जे बदल अपेक्षित आहेत, ते प्रत्यक्ष कृतीतूनच शक्य होतील.

वर म्हटलं तसं या सत्रांमध्ये आम्ही केवळ माहिती देत नाही, तर संवाद साधतो. 'अपंगत्व म्हणजे काय?', 'संवेदनशील भाषा आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन कसा असावा?', 'समाजाने कोणते बदल कसे स्वीकारावेत?' अशा अनेक कंगोऱ्यांवर या सत्रांत मोकळेपणाने चर्चा होते. ह्या कार्यशाळांद्वारे आम्ही सहभागींना 'sympathy' पासून 'empathy' पर्यंतचा प्रवास घडवण्याचा प्रयत्न करत असतो. 'Disability and Us' ही कार्यशाळा कुठेही आणि कोणासाठीही घेतली जाऊ शकते – शाळा, कॉलेज, NGO, ऑफिस, सोसायटी ग्रुप्स...कोणासाठीही.

जर तुम्हाला अशी कार्यशाळा आयोजित करायची असेल, सहभागी व्हायचं असेल किंवा आर्थिक सहकार्य करायचं असेल – तर आम्हाला नक्की संपर्क करा. हा उपक्रम केवळ माहिती देणारा नाही – तो अंतर्मुख होण्याची, स्वतःला आणि समाजाला नव्याने पाहण्याची आणि खऱ्या अर्थाने समावेशकतेकडे वाटचाल करण्याची सुरुवात आहे. तुम्हीही या प्रवासाचा भाग झालात तर आम्हाला आणखी आवडेल.

आर्थिक सहकार्यासाठी:

Name of Account : Friendship Social Foundation
HDFC Bank, AHURA CENTRE, ANDHERI (E), MUMBAI
Account No.: 50100593151383
IFSC Code: HDFC0000543

संपर्क : नितीन (मॅनेजर, कम्युनिकेशन - मिळून साऱ्याजणी): ७७४१९९७५६९
दिक्षा (कार्यकारी संपादक, मिसा Online): ८१४९७२७२५७
सत्यजित (यूथ कनेक्ट प्रतिनिधी - मिळून साऱ्याजणी): ९५६१६२९२०२

भीमराज की बेटी: पंचशीला भालेराव

केशव वाघमारे

मराठी भाषेत एक म्हण आहे. “बामणा घरी लिहिणं, कुणब्या घरी दाणं आणि मांगा-महारा घरी गाणं”. पारंपारिक गावगाड्यात मांग-हलगी, गोंधळी-संबळ, धनगर-ढोल आणि महार-एकतारी वाजवायचे. ज्ञान, शेती आणि कला संगीत यांचीही संस्कृतीने अशी जातीनिहाय वाटणी केलेली होती. शिवाय गाणं वाजवणं हे अस्पृश्य ठरवलेल्या जातींचं उदरनिर्वाहाचं महत्त्वाचं साधन होतं. दलितांनी शतकानुशतकांच्या दमन, भेदभावाला तोंड देत आपला इतिहास, आपले शौर्य, आपली वेदना, आपला आनंद, आपले तत्त्वज्ञान हे सर्व जात्यावरच्या ओव्या, मौखिक कथा, गाण्यात आणि लोकसंगीताच्या रूपात, त्यांच्या जीवन संघर्षाचा इतिहास पिढीजात जतन केला आहे. १९२० नंतर डॉ. आंबेडकरांचा दलितांच्या राजकीय क्षितिजावर उदय होऊन त्यांनी प्रबोधनाची चळवळ सुरू केली त्या चळवळीचा प्रचार आणि प्रसार करण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका या कलांनी आणि कलावंतांनी निभावली. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीच्या आधारे समाजात होणारी स्थित्यंतरं, क्षणोक्षणी घडणाऱ्या प्रत्यक्ष घटना, डॉ.आंबेडकरांची भूमिका, त्यांचे संदेश, संघर्ष आणि एकूणच त्यांचं जीवन त्या अशिक्षित आणि अडाणी समाजाला समजेल अशा त्यांच्या ग्रामीण भाषेत समजावून सांगितले. आज परिस्थिती अगदी थोडीफारच बदलली असली तरी पूर्ण बदल होण्यासाठी भीमा तुझ्या मताचे... अनेक कलाकार तयार होणं आणि त्यांनी समाजाला जागं करणं अत्यावश्यक आहे, अशाच काही भीमाच्या मताचे शिलेदार या सदरातून आपल्या भेटीला येणार आहेत. मानवी हक्क कार्यकर्ता आणि सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक केशव वाघमारे यांचं 'खैरलांजी ते रोहित! दशकाची अस्वस्थता', हे पुस्तक भीषण जातवास्तवावर जळजळीत भाष्य करणारं आहे. त्या संदर्भात समाजाला जागं करण्याच्या हेतुनं त्यांनी लिहिलेली ही लेखमाला महत्त्वाची आहे. अवश्य वाचा.

पंचशीला भालेराव

अमरावतीला २००५ साली एक लावणी महोत्सव आयोजित केला गेला होता. या लावणी महोत्सवात गायनासाठी पुण्याच्या एका प्रसिद्ध गायिकेला आमंत्रित करण्यात आले होते. परंतु महोत्सवाला प्रत्यक्ष सुरुवात झाली तरी आमंत्रित गायिका कार्यक्रमात पोहोचल्याच नाहीत. सगळे लावणी संघ आपली नृत्यकला सादर करण्यासाठी तयार आहेत. पण लावणी गाणारी गायिकाच नाही. संयोजकांची धावपळ सुरू झाली. तासभर कार्यक्रम पुढे ढकलूनही काही पर्याय सापडला नाही. तेवढ्यात या कार्यक्रमाला गायिकेला साहाय्यक गायिका म्हणून आमंत्रित केलेल्या एका गायिकेला संयोजकांकडून सांगण्यात आले की, आमंत्रित मुख्य गायिका आलेल्या नाहीत. महोत्सवात सहभागी सर्व लावणी नृत्यांगनांची गाणी तुम्हाला एकटीला गावी लागणार. खरं ते आव्हानही होत आणि संधीसुद्धा. गायिकेने त्याला आव्हान न समजता संधी समजून होकार दिला. महोत्सवासाठी स्पर्धक संख्या होती ३५. म्हणजे गाणी ही तेवढीच म्हणावी लागणार. एका गाण्याला साधारणत पाच मिनिट असं गृहीत धरलं तरी दोन तास ४५ मिनिटे सतत गावं लागणार होतं. पण हे आव्हान स्वीकारलं. पहिला स्पर्धक संघ आपली लावणी सादर करून स्टेजवरून खाली जाऊन दुसऱ्या स्पर्धक स्टेजवर येईपर्यंत जी विश्रांती मिळेल तेवढ्या विश्रांतीच्या अवकाशात सतत तीन तास ४० मिनिट गायन करत एकाच कार्यक्रमात तीस लावण्या गाण्याचा विक्रम केला. त्या गायिका म्हणजे पंचशिला भालेराव. परंतु पंचशीला यांच्या या विक्रमाची कधी नोंद घेतली गेली नाही. गुणवत्ता आणि सौंदर्य या ब्राह्मणी कल्पनांसमोर दलित सौंदर्य आणि गुणवत्तेचं काही अस्तित्वच नसते. टी.व्ही., सिनेमा, मालिका गायन, जाहिराती या सांस्कृतिक कला व्यापारात ब्राह्मणी सौंदर्य आणि गुणवत्तेची मक्तेदारी आहे. इथल्या सार्वजनिक चर्चाविश्वात दलित व्यक्तिरेखेचे कौतुक केल्याचं, त्याची योग्य दखल घेतल्याचं चित्र कधीच पाहायला मिळत नाही. महाराष्ट्रातील अभिजन समाजात मांग महार या शूद्र जातीबद्दल जशी घृणा आहे तशीच त्यांच्या कलेबद्दल ही आहे.

लोकप्रिय सांस्कृतिक प्रवाहातून दलितांमध्ये फार मोठ्या प्रमाणात न्यूनगंड रुजवला जातो. टोनी मॉरिसन याला इंटर्नल डेथ

(आंतरिक मृत्यू) म्हणतात. दलितांची गुणवत्ता, मांडणी हे बहुतांश जगाने दुर्लक्षित केली आहे. त्याकडे गुणवत्ताहीन म्हणूनच बघितले आहे. दलितांची भाषा, विद्रोह, अभिव्यक्ती या इतरांसाठी अपरिचित, अनुल्लेखित राहिल्या आहेत. खरं तर गायनाचा कुठलाच वारसा नाही. गायकीचे कुठलेच घराणी नसलेले हे गाणे जात कुटुंब परंपरेनं आले आहे. 'मांगा घरी गाणं, कुणब्या घरी दाणं, अन् बामना घरी ल्हेंन' ही म्हण इथल्या सामाजिक व्यवस्थेचे सार सांगते. गावगाड्यातील मांगांचे स्थान नेमके कोणते हे स्पष्ट होत नाही. कारण 'बावन्न हक्काच्या सनदेत' यांचा हक्कदार म्हणून समावेश नाही. मांग हे पारंपरिक व्यवसायात दोरखंड वळणे, (दोरखंड वळण्याची प्रक्रिया अत्यंत किचकट, कष्टप्रद आणि घाणेरडी असते) शिंदीच्या काटेरी झावळ्यापासून फडे म्हणजे झाडू अर्थात केरसुनी बांधणे, बाजा म्हणजे खाटा विणणे, शिंकाळी विणणे, बैलांना पत्रा ठोकणे, बैलपोळ्याला लेकुळकीच्या (पाटलाच्या) घरी माळ आणि तोरण बांधणे, खळ्यावर हातनी करणे आणि पाटलांच्या घरच्या आणि गावाच्या सर्व मानपानाच्या कार्यक्रमात हलगी वाजवणे. फाशीची शिक्षा झालेल्या गुन्हेगारास फाशीवर चढवणे या बरोबरच लोकदेवतांची कवनं रचणे, त्यांना संगीत देणे, तमाशात काम करणे.

'मांग आन भलतीच खबर सांग' अशीही एक म्हण रूढ आहे. मांग जातीकडे एखाद्या घटनेचे, प्रसंगाचे दृश्यकथन करण्याची कला असल्याने, तमाशातील बतावण्या व सपदण्या (संपादन) करण्याची, गायनाची आणि वादनाची परंपरा चालत आलेली आहे. पण हे फार आनंदाने आले आहे असं नाही. तर उदरनिर्वाहासाठी आणि गावच्या गाव रचनेत वाद्ये वाजवण्याची एक प्रकारची सांस्कृतिक सक्तीच असायची. पंचशीला यांचे आजोबा गावगाड्याची सर्व कामे करायचे. पुढे वडिलांनी काही दिवस हे केले. पण वडील या पारंपरिक वाटेने गेले नाही. शिक्षण आणि आधुनिक ज्ञान मार्गाचे वाटसरू बनले. उंच, धिप्पाड, सावळा रंग आणि आपल्या कसलेला पहाडी आवाजात 'भीमराज की बेटी' हे लोकप्रिय गीत घराघरात पोहचवणारी शाहीरा पंचशीला डॉ. पी. डी. भालेराव आणि सिंधुताई भालेराव यांची सर्वात मोठी मुलगी. डॉ.पी.डी भालेराव हे औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये पशुवैद्यकीय अधिकारी होते. आडगाव सराफ या अत्यंत दुर्गम गावात शिकून पदवीधर झालेले आणि आजूबाजूच्या वीस पंचवीस गावातून पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून नोकरीला लागलेले प्रथमच.

१९७२ ला मराठवाड्यात प्रचंड दुष्काळ पडला. डॉ. भालेराव यांची नोकरी गेली. तेव्हा डॉ. भालेराव यांनी आपल्या वडिलांकडून आलेली कला स्वीकारली. पण वडिलांकडे असलेला कलेचा पारंपरिक आशय न स्वीकारता, कलेचा मुक्तीदायी आशय स्वीकारला. त्यांनी आंबेडकर यांच्या विचारांना प्रमाण मानून 'भीम संदेश' नावाची गायन पार्टी निर्माण केली.

कोरले भिमा तुझे हृदयावर नाव
तुझेच गीत गाईन फिरुनी गावोगाव

असं म्हणत महाराष्ट्रभर भटकंती करू लागले. ते कधी वामनदादा कर्डक तर कधी स्वतंत्रपणे गाऊ लागले. या गाण्याच्या प्रेमापोटी आणि सततच्या भटकंतीमुळे भालेराव हे मूळ गाव सोडून औरंगाबादला स्थायिक झाले. त्यामुळे भटकंती थांबून पंचशीलाची औरंगाबादच्या गुजराती हायस्कूलमध्ये शाळेला सुरुवात झाली. परंतु डॉ.भालेराव यांचा कोरस म्हणून सतत भटकंती करावी लागायची. पंचशीला म्हणतात, "त्या मधूनच गाणं कसं गावं, कोणत्या शब्दावर जोर द्यावा, आवाजाची उंची काय असावी, हे कोरस करता करता शिकता आलं"

त्यामुळे पंचशीला यांच्या व्यक्तिमत्त्वात गाणे रुजत, वाढत आणि फुलत गेले. पण त्यामुळे शिक्षण थांबले ते कायमचेच. त्यांना मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेता आले नाही. पण गाणे हेच त्यांचे शिक्षण झाले होते. आठवी, नववीमध्ये असतानाच वडिलांची बहिण म्हणजे आत्या अत्यंत आजारी पडली आणि माझ्या डोळ्यादेखत माझ्या मुलाचं लग्न बघायचा आहे तेव्हा तुझी मुलगी माझ्या मुलाला दे, म्हणून भाऊ डॉ.भालेराव यांच्याकडे आग्रह करू लागली. बहिणीच्या आग्रहाला बळी पडून डॉ. भालेराव यांनी वयाच्या तेराव्या वर्षी आत्याच्या मुलासोबत पंचशिला यांचं लग्न लावून दिले. तेराव्या वर्षी लग्न, चौदाव्या वर्षी पहिले मूल, पंधराव्या वर्षी दुसरे मूल आणि सतराव्या वर्षी तिसरी मुलगी. असा संसार गळ्यात अडकत गेला आणि शिक्षण कायमचं थांबलं. परंतु गाणं त्यांना शांत बसू देत नव्हतं. त्या सांगतात,"रात्री अपरात्री केव्हाही उठून रियाज करायचे, याच काळात प्रचंड दुःख, कौटुंबिक ताणतणाव आणि एकाकीपण आले होते. आयुष्य बेताल आणि बेसूर बनले होते. पण या काळात संगीताच्या तालाने आणि गाण्याच्या सुराने जीवन पुन्हा प्रवाही बनवले." त्या लावणी मोहत्सवात प्रथमच सार्वजनिक गाणे गायल्या. त्या कार्यक्रमाने त्यांना गायक म्हणून मान्यता मिळाली.

त्या सांगतात, "हा माझ्या जीवनातला सर्वात मोठा आनंद होता, मला माझा स्वर सापडला होता. जगण्याचा ताल स्वर मला पुन्हा भेटला होता." पंचशीला यांनी अत्यंत कठीण प्रसंगाला सामोरे जाऊन गायनाच्या क्षेत्रात स्वतःला सिद्ध केलं होतं. यामधूनच सार्वजनिक कार्यक्रम करण्याचा आत्मविश्वास मिळाला. त्यांचं गाणं पुन्हा नव्याने सुरू झाले. गाण्याला शिक्षणाची जोड असायला हवी म्हणून शिक्षण चालू राहावे यासाठी अनेक प्रकारे धडपडत राहिल्या. कुटुंबीयांशी, नवऱ्याची भांडत राहिल्या. परंतु दहावीच्या पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेता आले नाही. पुढे नवऱ्याला खूप आग्रह करून मूळ खेडेगाव सोडून औरंगाबादला स्थायिक झाल्या. त्यामुळे किमान गाण्यासाठी तरी थोडा मोकळा अवकाश मिळू लागला. गाण्याचे सार्वजनिक कार्यक्रम मिळू लागले. शिवाय

शहरात उदरनिर्वाहाचा प्रश्न होता. उदरनिर्वाहासाठी सार्वजनिक कार्यक्रम, लग्नाचे कार्यक्रम, ऑर्केस्ट्रा, लावणी यामध्ये गाऊ लागल्या. हे गाण्यासाठी घरच्यांचा तीव्र विरोध होता. परंतु यातूनच घरचा उदरनिर्वाह चालत होता, त्यामुळे फारसे अडवता आले नाही.

गाणे जसे पुढे जात होते, तसे संगीतातल्या अनेक गोष्टी समजू लागल्या. त्याचं महत्त्व लक्षात येऊ लागलं. म्हणून xxxxxxxxxxxसरांकडे शास्त्रीय संगीत शिकण्याचा प्रयत्न केला. परंतु लहान मुल आणि संसाराची जबाबदारी यामुळे त्यालाही वेळ देता आला नाही. अर्ध्यावरच सोडावं लागलं. सराव करता आला नाही. पण यामुळे त्यांचं गाणे काही थांबले नाही. गाणे त्यांच्या आतमध्ये रुजले होते. भक्तीगीत, भावगीत, गवळण, लावणी, हिंदी मराठी सिनेमांची गाणी, तमाशाच्या वगातील गाणी, नाटकातील गाणी असे सर्व प्रकारचे गाणे त्यांनी गायले.

लोकांच्या प्रतिसादामुळे ही गाणी त्या गायच्या मात्र या गाण्यातून प्रबोधन होत नसल्याचे कळू लागल्यानंतर त्यांनी ही गाणी बंद केली. गायक म्हणून चुकीचं लेबल लागू नये म्हणून आपण ही गाणी बंद केल्याचं त्या सांगतात. औरंगाबादच्या सार्वजनिक कार्यक्रमात प्रथम वामनदादा कर्डक यांच्या पुढ्यात आंबेडकर गीत गायले. लोकांनी प्रचंड प्रतिसाद आणि प्रेम दिले. त्या म्हणतात, "आंबेडकरांचे गीत गाण्यात जो आनंद आहे तो कशातच नाही. याची प्रथमच त्यांना जाणीव झाली. शिवाय तो वडिलांचा वारसाही होताच. ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांनी डॉ. आंबेडकर यांना अभिवादन म्हणून,

हळूच या ग लाटा
जागेल भीम माझा
झोपेत शांत आहे
कोटी जणांचा राजा

हे गाणे लिहून गायले. त्या म्हणतात, "माझी कला ही प्रबोधनासाठी आहे. मी उदरनिर्वाहासाठी अनेक कार्यक्रम केले, पण आंबेडकर चळवळीला कायम प्राधान्य दिले आहे. त्यासाठी मी विशिष्ट मानधनाचा कधीच आग्रह धरला नाही. आहे त्या साधनांच्या आधारे खेड्यापाड्यातून बाबासाहेबांचे विचार पोहोचवत राहिले. बाबासाहेबांच्या गाण्याने मला कायम ऊर्जा, उत्साह, आनंद आणि समाधान दिले आहे. डॉ. आंबेडकर व चळवळीवर मी स्वतः पंधरा-वीस गाणी लिहिली आहेत. परंतु मी वामनदादा कर्डक आणि प्रतापसिंग बोदडे यांची गाणी गाते आहे. त्यांचीच गाणी मी चालबद्ध केली आहेत. ही गाणी चालबद्ध करताना अनेक गायक सिनेमांच्या गाण्यातील चालीवर आपली गाणी चालबद्ध करतात. काही वेळा तशी काही गाणी मी चालबद्ध केली आहेत. परंतु बहुसंख्य गाणी स्वतंत्रपणे चालबद्ध करण्याचा प्रयत्नही केला आहे."

आई नको ग नको मजला
ती दिवाळी आणि दसरा
घरी भिमाचा फोटो लावून
करते जयंती दिन साजरा

मुक्तीदायी राजकारणात प्रतिमा आणि प्रतिकांचे अत्यंत महत्त्व असते. आजही ग्रामीण समूह गुलामीच्या प्रतीक आणि प्रतिमात अडकलेला आहे. अशा वेळी आंबेडकरी ग्रामीण समूहाला आपली प्रतीके बदलासाठी अशा प्रकारची गाणी प्रोत्साहित करतात. त्यांना आपली प्रतीके बदलायला भाग पाडतात. लोकांच्या जीवनावर त्यांच्या गाण्यांचा काय प्रभाव पडतो? यावर पंचशीला यांनी एक आठवण सांगितली. प्रसिद्ध गायक आणि कवी प्रतापसिंग बोदडे यांनी लिहिलेल्या 'भीमराज की बेटी' या गाण्याने पंचशीला भालेराव यांना खरी ओळख निर्माण करून दिली. या गाण्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र त्यांना ओळखू लागला. त्यांच्या पूर्वी हे गाणं शकुंतला जाधव आणि नंतर निशा भगत यांनी गायलं आहे. परंतु पंचशीला या गाण्याच्या सादरीकरणाचे नवे नवे प्रयोग करतात. त्या गाण्यासोबत लोकांना सहभागी करून घेतात. स्टेजवर गाणं न गाता पब्लिकमध्ये जाऊन हे गाणं गायला सुरुवात करतात. तेव्हा अनेक मुली, स्त्रिया सामूहिक नृत्य करू लागतात. तेव्हा ते गाणं केवळ पंचशीला यांचं न राहता संपूर्ण समूहाचे बनते. एका सुरात समूहच ते गाणं गाऊ लागतो. दबलेल्या, कुंचबलेल्या, घाबरलेल्या महिला सहभागी होतात, मोकळ्या होतात, डान्स करतात, फेर धरून नाचतात. गातात, मुक्तपणे अभिव्यक्त होतात. महिला कायम दबलेल्या असतात. त्यांना अशा गाण्यातून या दबलेपणातून मोकळं करण्याचा प्रयत्न त्यांच्या गाण्याने केला आहे. त्यांच्या गाण्याच्या वेळी अनेक स्त्रिया-मुली या गाण्यातून, नृत्यातून त्या मोकळ्या होतात. व्यक्त होतात, बोलू लागतात.

कलाकाराला कुठलाही जात-धर्म नसावा. त्याने जाती-धर्मात अडकू नये असं माझं मत आहे पण हे एक सुविचार म्हणून ठिक आहे. प्रत्यक्ष जीवनात लोक कलाकाराला जाती-धर्माची लेबलं चिटकवतात. पंचशीला यांनाही लेबल चिकटवले गेले, पण त्यांनी स्वतःला यामधे कधी अडकवलं नाही. पण ते सोपं नव्हतं. त्या जातीने मातंग असल्याने आणि चळवळीत बौद्ध धर्माचे अनुकरण करत असल्याने त्यांना कुटुंबातून त्रास झाला. नातेवाईकांनी एक प्रकारे बहिष्कृत केलं होतं. परंतु त्या डगमगल्या नाहीत. वडिलांच्या संस्कारात, मार्गदर्शनात वाढल्याचा तो परिणाम होता. वडिलांनी हिंदू धर्म सोडून बुद्धाचा धम्म अनुसरला होता. जेव्हा डॉ. भालेराव गाण्यासाठी गावोगाव फिरत तेव्हाही ते कधीच स्वतःला अमुक एका जातीचा म्हणून त्यांनी सांगितलं नाही. ते मातंग वस्तीमध्ये नात्यागोत्यात कधी गेले नाहीत. ते बुद्ध विहारात जाऊन लोकांना जमवून प्रबोधनाचे, आंबेडकरी चळवळीची गाणी गायचे. ते स्वतः

जात वर्तनात कधीच अडकले नाहीत.

वडिलांचा तोच वारसा पंचशीला यांनी जपला आहे. यासाठी अनेक वेळा कुटुंब, जातीमधून जातिगत भेदभावाला, मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले आहे. परंतु त्या जातिगत वर्तनाला कधीच बळी पडल्या नाहीत. त्या स्वतःला कायम जात धर्म नाकारणारी मुक्ता साळवे यांची वारस समजत आल्या आहेत. त्यामुळे त्या मातंग समाजात जाऊन गाण्याच्या माध्यमातून 'आपण धर्म नसलेली माणसे आहोत' हाच विचार पेरण्याचे काम करत आल्या आहेत. मातंग जातीच्या कार्यक्रमात ही 'भीमराज की बेटी' हे गाणं त्या आग्रहाने म्हणत राहतात. या प्रबोधनाचे आणि भूमिकेचे सातत्य याचा परिणाम असा की आता त्यांचं स्वतःचं कुटुंब भूमिका घेऊन त्यांच्या सोबत उभं राहिलं आहे. दोन्ही मुलांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आहे. ते बुद्धाच्या धम्माचे अनुसरण करत आहेत. शिवाय गाण्याच्या माध्यमातून त्या जे प्रबोधन करत आहेत त्याचाही ते भाग बनले आहेत. लहान मुलगा त्यांच्या कार्यक्रमात पॅड वाजवतो. अलीकडे तो काँगो शिकला आहे. तर दुसरा मुलगा शासकीय नोकरी सांभाळून कार्यक्रमात ढोलकी वाजवतो. सर्व कुटुंब हे समतेच्या गाण्यात सामील झाले आहे! त्या म्हणतात, "हेच माझं योगदान आहे आणि समाधानही आहे"

(हा लेख आणि चित्रफिती 'Influential Shahirs, Narratives from Marathwada' (मार्गदर्शक शाहीर, मराठवाड्याची गीते-कथने) या मालिकेतील असून इंडिया फौंडेशन फॉर द आर्ट्स तर्फे राबवण्यात येणाऱ्या संग्रह व वस्तूसंग्रह कार्यक्रमाचा भाग आहेत. पीपल्स अर्काइव्ह ऑफ रुरल इंडियासोबत राबवण्यात येणाऱ्या या प्रकल्पास गोइथ इन्स्टिट्यूट/मॅक्स मुलर भवन दिल्ली यांचे आंशिक अर्थसाहाय्य लाभले आहे.)

केशव वाघमारे, *पुणे*

Kshavwaghmare14@gmail.com

थिएटर ऑफ रेलेव्हन्स... मानवी मूल्यांशी जोडणारी वेगळी नाट्यदृष्टी देणारी रंग चळवळ...

माणूस विसरून गेला आहे की तोही निसर्गाचा एकात्म भाग आहे. आज जेव्हा एखादी मोठी नैसर्गिक आपत्ती समोर येते, तेव्हा राजकारण, समाजकारण, अर्थकारण हे सगळे मुद्दे क्षणात बाजूला सरकतात. कारण निसर्ग जेव्हा आपले रौद्र रूप धारण करतो, तेव्हा आपण किती खुजे आहोत हे जाणवते. मग तो कुठलाही प्रगत देश असो वा गरीब गाव. केदारनाथच्या पुरापासून ते वायनाडमधील दुर्घटनेपर्यंत – अशा प्रत्येक संकटामागे मानवी हस्तक्षेप, निसर्गाची अयोग्य छेडछाड हीच मुख्य कारणे आहेत.

'वसुधैव कुटुंबकम' हे आपण म्हणतो, पण प्रत्यक्षात आपल्या मातीशीच आपण बेईमानी करतो. जमिनी, नद्या, जंगलं – या साऱ्या नैसर्गिक संपत्तींचा अतिरेकी वापर आणि विनाश सुरू आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' हे केवळ घोषवाक्य उरले आहे. पर्यावरण संवर्धनाच्या जागतिक कॉन्फरन्स होत राहतात पण धोरणात्मक बदल काही घडत नाही म्हणूनच निसर्गाविषयीची ही जागृती प्रत्येक स्तरावर आवश्यक आहे.

याच दिशेने काम करत आहे 'थिएटर ऑफ रेलेव्हन्स' – एक वेगळी, मानवी मूल्यांशी जोडणारी नाट्यदृष्टी. या रंगचळवळीने नुकतेच 'The... Other World' हे नाटक प्रस्तुत केले. जर्मनीसारख्या युरोपीय देशात गाजलेले हे नाटक आता भारतातही रंगभूमीवर गाजत आहे. रंगचिंतक मंजुल भारद्वाज लिखित आणि दिग्दर्शित हे नाटक केवळ मनोरंजनासाठी नाही, तर निसर्ग आणि मानवाचे नाते पुन्हा समजून देण्यासाठी सज्ज आहे.

आज रंगभूमीच्या चार प्रमुख प्रवाहांपैकी 'थिएटर ऑफ रेलेव्हन्स' हा सर्वाधिक सशक्त, मानवकेंद्री आणि परिवर्तनवादी नाट्य सिद्धांत आहे. सत्ता-पोषित रंगभूमी जिथे केवळ नाच-गाणी आणि बाह्यरंजन करते, तिथे 'थिएटर ऑफ रेलेव्हन्स' माणसाच्या मनाशी संवाद साधते, विवेकाला जागवते. प्रपोगंडा थिएटर जिथे एका विचारधारेचा प्रचार करतं, तिथे हे समग्र भूमिकेचा पुरस्कार करतं आणि प्रत्येक सत्तेला आरसा दाखवते. बुद्धिजीवी रंगभूमी जिथे केवळ प्रयोग आणि तात्त्विक चर्चा करतात, तिथे 'थिएटर ऑफ रेलेव्हन्स' सामान्य माणसाच्या संघर्षाचे आवाज बनत माणसाला उन्मुक्त करण्याचे मानवी दर्शन आहे.

'थिएटर ऑफ रेलेव्हन्स' मागील ३३ वर्षांपासून कोणत्याही स्पॉन्सरशिप, फंडिंग किंवा अनुदानाशिवाय केवळ प्रेक्षकांच्या बळावर नाट्यकलेतून जनमानसात चेतना जागवत आहे. समाज, पर्यावरण, गरिबी, वर्णव्यवस्था, जेंडर यावर या रंगचळवळीने आपल्या विविध नाटकांतून विचार मांडले आहेत. हे रंगआंदोलन आहे.

थिएटर ऑफ रेलेवन्स नाट्य सिद्धांत अनुसार कला म्हणजे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ती मानवतेचे उमुक्त दर्शन आहे. 'The... Other World' हे नाटक आपल्याला हेच आठवण करून देते, की निसर्ग हाच आपला खरा मार्ग आहे. नैसर्गिक होऊन निसर्गाला जपण्याची आशा जागवते आणि बाहेरील प्रकृती सोबत आपल्या आतील प्रकृतीला वाचवण्याची दृष्टी मांडते.

निर्ऋति – ४

दिलीप चव्हाण

विपन्नावस्थेतून मुक्ततेचा प्रश्न हा भारतातील प्रधान प्रश्न आहे. या सर्वंकष अरिष्टाचा शोध घेण्यासाठी समकालाचं आकलन, भारतीय इतिहासाचं सम्यक आकलन करून घेणं का गरजेचं आहे? जात आणि वर्ग यांच्या सेंद्रीयमिश्रणातून भारतात जातवर्गीय समाज आकारास कसा आलेला आहे? पुरुषसत्तेनं या व्यवस्थेला अधिक क्लिष्ट कसं केलं आहे? या व्यामिश्रतेचं सम्यक आकलन करून घेण्यासाठी शरद् पाटील यांचं योगदान किती अनन्य साधारण आहे याचा वेध घेणारी ही लेखमाला. बहुप्रवाही अन्वेषण पध्दतीचा शरद् पाटील यांनी विकास कसा केला. भारतीय समाजाचा ऐतिहासिक विकासक्रम हा मातृसत्ताक गणसमाज ते पितृसत्ताक वर्ण समाज ते जाती समाज ते जातवर्गसमाज असा कसा राहिला आहे याचा सोप्या भाषेत परामर्श घेत आहेत भाषा आणि साहित्याचे प्राध्यापक असणारे साऱ्याजणीचे विद्वान मित्र दिलीप चव्हाण.

ज्यांना समाजपरिवर्तनाची आस असते त्यांना समाजापुढे आदर्श समाजाचे प्रारूप ठेवावेच लागते. इतिहास काळामध्ये शोषणव्यवस्था निर्माण होण्यापूर्वी कुठली तरी आदर्श अशी समाजव्यवस्था अस्तित्वात होती, असे गृहीतक इथे उपयोगी मानले जाते. ते परिवर्तनगामी जनतेसमोर आदर्श म्हणून मांडले जाते.

इतिहासातील आदर्श अवस्था मानणे म्हणजे उलट्या पावलांनी इतिहासाकडे वाटचाल करणे नव्हे! तथापि, अशी आदर्श अवस्था कशी निर्माण झाली आणि का व कशी नष्ट करण्यात आली, हे जाणून घेणे वर्तमानातील शोषणव्यवस्थेविरोधात लढताना आवश्यक मानले जाते. काल मार्क्सने ‘आदिम साम्यवादी’ अवस्थेला आदर्श अवस्था मानले. जोतिराव फुले यांनी बळीस्थानाला आदर्श समाज मानला; तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौद्ध कालखंड हा भारतीय इतिहासातील आदर्श कालखंड वाटत होता!

इतिहासकाळातील समाजातील आदर्श अवस्था कोणती, या प्रश्नाचे उत्तर शरद् पाटील यांनी या तिघांपेक्षा वेगळे दिलेले आहे! त्यांनी मार्क्सची ‘आदीम साम्यवादी’ समाजाची कल्पना कपोलकल्पित असल्याचे मांडले. त्यांना ‘आदीम साम्यवाद’ हा विचार अनैतिहासिक आणि कालविसंगत वाटला.

पाटील यांच्या मते, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वत्रयींचा उदय हा वर्णव्यवस्थापूर्व अस्तित्वात असलेल्या स्त्रीसत्ताक समाजात झालेला होता. स्त्रीराज्य हे विषमतापूर्व आणि शोषणपूर्व अवस्था होती. वर्गीय परिभाषेत सांगायचे झाल्यास, या काळात 'खासगी मालमत्ता' उदयास आलेली नव्हती; तर भारतीय संदर्भात सांगायचे झाल्यास, या काळात विषमताधिष्ठित 'वर्णव्यवस्था' आकारास आलेली नव्हती. स्त्रीवादी दृष्टीने बघितल्यास, हा पुरुषसत्तेच्या उदयापूर्वीचा काळ होता. हा समाज स्त्री-पुरुष विषमतेपासूनदेखील मुक्त होता.

शरद् पाटील यांच्या मते, भारतात स्त्रियांनीच शेती, विज्ञान, कला यांचा विकास केला. या काळात स्त्रिया सर्वार्थाने सर्जक आणि समाजवर्धिष्णू होत्या. या काळात गणिताचा (भूमितीचा) उदय शेतीच्या मापनातून झाला. सर्वांत प्राचीन सस्वर गायले जाणारे मंत्र-सूक्ते स्त्रियांचीच होती. स्त्रियांनीच नृत्यसंगीत जोपासले. औषधशास्त्राला स्त्रियांनीच योगदान दिले. स्त्रियांनीच सुरुवातीची कृषिमायेचे मंत्र रचले. अथर्ववेद आणि ऋग्वेदात समाविष्ट असलेल्या अनेक ऋचा ह्या स्त्रियांनी रचलेल्या आहेत. सांख्य या भारतातील आद्य तत्त्वज्ञानाची निर्मिती स्त्रियांनी (कपिला या स्त्रीने) केली. संस्कृत भाषेचा विकासदेखील स्त्रियांनी केला. स्त्रियांमध्ये राजत्वगुण असल्यामुळे त्या आद्य राज्यकर्त्या बनल्या.

असा हा सापेक्षत: अधिक समताधिष्ठित असलेला भारतीय स्त्रीसत्ताक समाज नष्ट करून नव्या 'वर्णव्यवस्थाक पुरुषसत्ताक' समाजाची स्थापना केली गेली. या संक्रमणात स्त्रीसत्ताक समाजाच्या नायिकांचे विकृतीकरण आणि विद्रूपीकरण केले गेले. प्रदीर्घ काळापर्यंत इतिहासाच्या ह्या नायिका अदृश्य राहिल्या. त्यात सर्वाधिक उपेक्षा ‘निर्ऋति’ या स्त्रीच्या वाट्याला आली.

अगदी, भारतातील मातृदेवतांवरील पुस्तकांमध्येसुद्धा निर्ऋतिचा उल्लेख अपवादानेच आला. उदाहरणार्थ, एन. एन. भट्टाचार्य यांचे 'द इंडियन मदर गॉडेस' हे पुस्तक. या पुस्तकात निर्ऋतिचा उल्लेख एका तळटीपेत केवळ आहे.

एका बाजूला उपेक्षा आणि दुसऱ्या बाजूला विकृतीकरण आणि विद्दपीकरण! स्त्रीसत्ताक समाजाच्या नायिकांच्या विकृतीकरण आणि विद्रूपीकरणाच्या या प्रक्रियेत सर्वाधिक लक्ष्य हे 'निर्ऋति' या स्त्रीला केले गेले. समाजमनातून ऐतिहासिक प्रतीके पूर्णपणे नष्ट न करता येत असल्यामुळे त्यांचे विद्रूपीकरण करण्याची भूमिका घेतली जाते. त्यासाठी धर्मग्रंथ, कर्मकांड, प्रथा-परंपरा यांचे जंजाळ उभे केले जाते. समाजमनातून निर्ऋतिचे प्रतीक पूर्णपणे नष्ट करता आले नाही. कोण होती ही निर्ऋति?

शरद् पाटील यांच्या मते, भारतातील सिंधू संस्कृतीची आद्य गणमाता निर्ऋति होती. त्या काळात 'स्फ्य' (एक प्रकारची टोक असलेली काठी किंवा लाकडी खड्ग) हे भात पेरण्याचे साधन होते. पाटील यांच्या मते, पाऊस पडून जमिनीची वाफ होताच निर्ऋतिने स्फ्यने पहिले भोक पाडून राष्ट्रजमीन पेरली. पहिले खळे निघाल्यानंतर 'समदम्' (गणभोजन) केले आणि पिकलेला भात घटक कुलांत समान वाटून दिला.

भारताचा इतिहास सुरू होतो सिंधु खोऱ्यात कृष्णा निर्ऋतिच्या ऋती गणाच्या क्षत्र वर्णाच्या स्त्रियांनी आर्ष गणभाषेत गायलेल्या तांत्रिकी श्रुतीने. निर्ऋतिच्या या स्त्रीराज्यात धर्म उदयास आलेला नव्हता. पुरोहित वर्गही नव्हता. 'कृषिमाया' हे उत्पादक तंत्र होते, धर्म नव्हता. या कृषिमायेचे पौरोहित्य स्त्रियाच करीत. पुढे चालून धर्म विकसित झाला. पण या धर्माचे प्राथमिक प्रयोजन चातुर्वण्याचे संरक्षण-संवर्धन करणे, हे होते. या कर्मकांडी श्रौत धर्माचे प्रयोजन चातुर्वर्णी दास-शूद्राधारित राज्याचे प्रशासन करण्याकरता होते, तर कृषिमायेचे प्रयोजन समताधिष्ठित स्त्रीराज्य चालवण्यासाठी होते. वर्णव्यवस्था आणि स्त्रीसत्ताक समाजातील हा मूलभूत फरक होता. 'निर्ऋति' ही या समाजाची प्रतिनिधी होती.

शरद् पाटील यांनी सिद्ध केले आहे, की स्वातंत्र्य, समता व मित्रता ही शब्दत्रयी फ्रेंच भांडवलदारी लोकशाही क्रांतीतून उगम पावलेली नाही, तर ऋतींच्या वैराजातून उद्भवलेली आहे. स्त्रीसत्ताक समाजात भूमीचे समान वाटप होत असे, हे यापूर्वी आलेले आहेच. पाटील यांनी असे वर्णन केले आहे : "मग निर्ऋति वा नैर्ऋती दुर्गा वैदिक मंत्रांचे सस्वर गान करीत, नृत्य करीत गणाच्या पार्लमेंटमध्ये प्रवेश करी. प्रत्येक कुलमुख्येपुढे जाऊन ९६ शलाका ठेवलेले ग्लहपात्र खळखळवी. कुलमुख्येने बाणाचे चित्र असलेली शलाका काढली की बाणाचे चित्र असलेला जमिनीचा तुकडा तिच्या कुलाचा. अशा प्रकारे जमिनीचे समान वाटप सुरू झाले. पुरुषाच्या हाती सत्ता गेल्यानंतर समतेची गॅरंटी असलेला हा चौपट माणसाने माणसाला गुलाम करण्याचे, जुगाराचे, साधन बनला." 'समिती' या संघटनेचा जन्मही स्त्रीसत्ताक समाजात झाला. एका अर्थाने, 'समिती' या संघटनेचे जनकत्व निर्ऋतिकडे जाते.

'निर्ऋति' ही आर्यपूर्व देवता होती. तिचा उल्लेख अनेक ग्रंथांमध्ये आढळतो. 'कल्पसूत्र' ही जैन संहिता सांगते की, महावीराचे निर्वाण 'निर्ऋति' या शूभ अमावस्येला झाले. आर्यांनी स्त्रीसत्ताक समाज नष्ट केल्यानंतर स्त्रीसत्ताक समाजातील सर्वच स्मृती त्यांना नष्ट करता आल्या नाही. पाटील यांच्या मते, निर्ऋतिचा प्रभाव आणि तिचे उन्नत स्थान प्राचीन वैदिक काळापर्यंत टिकवले होते. वेदांचा आद्यशब्दकोश 'निघण्टु' आहे. या शब्दकोशात सुरुवातीचे शब्द पृथ्वीबद्दलचे आहेत. यात 'निर्ऋति' हे आदिती आणि इळाप्रमाणेच पृथ्वीचे दुसरे नाव आहे! 'निघण्टु'नुसार 'निर्ऋति' ही आद्यभूमाता आणि राष्ट्री होती. 'तैत्तिरीयसंहिता' म्हणते की, निर्ऋति ही काळी होती ('नैर्ऋत्ये रूपं कृष्णम्'). तीचे काळे असणे हे तिच्या सौंदर्याचे द्योतक मानले गेले; तसेच ते तिच्या भूमीशी असलेली समीपता दर्शवते. मातृसत्तेचा विकास कुलमातांच्या सभेपलीकडे जेव्हा झाला, तेव्हा त्यांनी सर्वांत सुंदर व बुद्धिमान कुलमातेला राष्ट्री म्हणून निवडले. भारतात 'निर्ऋति' ही आद्यराष्ट्री होती.

तैत्तरीय संहितेत निर्ऋतिचे वर्णन असे आलेले आहे :

विश्वरूपे निर्ऋते, तुला प्रणाम असो,
हे लोहमय पाश मोकळे कर;
यम व यमीसह तू
या सर्वोच्च स्वर्गावर आरोहण कर.
देवी निर्ऋते, तू ज्या पाशांनी
न सोडण्यासाठी याचा गळा बांधलास,
ते मी जणू काय आयुष्याच्या मध्याह्नीपासून मोकळे करीत आहे;
मग बंधमुक्त होऊन जग, व अन्नग्रहण कर.
जिच्या क्रूर मुखात मी
पाशविमोचनार्थ होम करतो,
ज्या तुला "भूमि" म्हणून जन जाणतात,

(पान ५३ वर)

संवाद - स्पंदनं... चलो मुंबई...

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद

अमोल केरकर

महाराष्ट्रातील स्वायत्त स्त्री चळवळीच्या पन्नास वर्षांच्या पूर्ततेच्या निमित्ताने ३ एप्रिल रोजी अंबाजोगाई येथील मानवलोक मनस्विनी महिला प्रकल्पाच्या जागेत मराठवाडा विभागाची प्रत्यक्ष बैठक झाली. या बैठकीला ४५ महिला उपस्थित होत्या. या बैठकीत महिला चळवळीचा पन्नास वर्षांचा आढावा घेण्यात आला. तसेच पुढील कार्यक्रमाची दिशा ठरवण्यात आली. आगामी काळात चळवळ गतिमान करण्याचे ध्येय निश्चित केले गेले. सुकाणू समिती सदस्य सुनिता बागल यांनी या बैठकीस मार्गदर्शन केले.

११-१२ जानेवारी रोजी कोपरखैरणे येथे झालेल्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष बैठकीत सांस्कृतिक संसाधने तयार करण्यासाठी एक गट तयार करण्यात आला. सामाजिक-सांस्कृतिक विषयांवरील कृती कार्यक्रम, डिजिटल माध्यमे, कविता, गाणी, पथनाट्य दस्तऐवजीकरण, पुस्तिका-प्रकाशन अशी संसाधने तयार करण्यासाठी व त्यावर विचारविनिमय करण्यासाठी हा गट कार्यरत आहे. या गटाची ऑनलाईन मीटिंग ६ एप्रिल रोजी संध्याकाळी ७ वाजता झाली. पूर्वीपासून चालत आलेल्या माध्यमांच्या बरोबरीने डिजिटल माध्यमांचा मोठ्या प्रमाणात उपयोग करून तरुण पिढीपर्यंत पोचता येते. या विचाराने पोडकास्ट मुलाखती, कवितावाचन, कथावाचन, दोन मिनिटांची नाटुकली, पाच मिनिटांची रील्स, स्टँडअप कॉमेडी, डिजिटल पोस्टर्स, डिजिटल स्लाईडशोज, यूट्युब चॅनेलचा भरपूर वापर करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा विचार झाला. या कामासाठी आशय-नियमनाबरोबर तांत्रिक कामे करण्यासाठीही टीम तयार करण्यात आली. कुंदा प्र.नि. यांनी या उपक्रमाची जबाबदारी घेतली आहे.

बँक एम्प्लॉइज युनियन तर्फे १० एप्रिल रोजी सातारा येथे बँक महिला कर्मचारी शिबिर घेण्यात आले. मनीषा गुप्ते व अमोल केरकर यांना महिला प्रश्नावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले होते. सोलापूरच्या सरिता मोकाशी सत्राच्या अध्यक्ष होत्या. यावेळी महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेची माहिती देऊन या कार्यक्रमांमध्ये सामील होण्याचे आवाहन शिबिरार्थींना करण्यात आले. तसेच कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा या चार जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन दक्षिण महाराष्ट्र विभागाची परिषद घ्यावी असे सूतोवाच केले.

परभणीमध्ये ११ एप्रिल महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त माधुरी क्षीरसागर यांनी महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेचा कार्यक्रम केला. ११ एप्रिल रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची ऑनलाइन बैठक घेऊन त्यांना 'मनुस्मृती नको, संविधान हवे' व सेफ्टी ऑडिट या मोहिमांबद्दल, विभागवार कार्यक्रमांबद्दल व ८ विषयांवरील पुस्तिकांच्या झालेल्या कामाबद्दल माहिती देण्यात आली व त्यानंतर पुढील कामाची आखणी करण्यात आली.

स्त्री मुक्ती संघटनेचे कौटुंबिक सल्ला केंद्र कोल्हापूरमध्ये 'श्रमिक' कार्यालयात चालते. अनेक संस्था - संघटनांची या केंद्राशी जोडणी करण्यासाठी (लोकल नेटवर्किंग) १२ एप्रिल रोजी प्रत्यक्ष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस १४ संस्था - संघटनांचे ५५ कार्यकर्ते उपस्थित होते. अमोल केरकर यांनी सर्व उपस्थितांना महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेबद्दल माहिती देऊन सर्व कार्यक्रमांमध्ये व मोहिमांमध्ये सामील होण्याचे आवाहन केले. तसेच कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा या चार जिल्ह्यांची विभागवार परिषद ऑक्टोबर महिन्यात घ्यावी असे सुचवले. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सेफ्टी मॅपिंग आणि सेफ्टी ऑडिट या विषयावर १२ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचे ऑनलाईन प्रशिक्षण झाले. सार्वजनिक वाहतूक क्षेत्रातील स्त्रियांचा संचाराचा हक्क, ऑडिट प्रत्यक्षात कसे करावे, कोणत्या गोष्टी टाळाव्यात इत्यादी बाबींवर लता भिसे सोनवणे, मनीषा गुप्ते, अलका पावनगडकर व संगीता सराफ यांनी मार्गदर्शन केले. या सर्वांनी यापूर्वी अशा प्रकारचे काम केलेले असल्यामुळे इतरांना या अनुभवाचा फायदा मिळाला.

महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेची वर्धा जिल्हा बैठक १९ एप्रिल रोजी घेण्यात आली. विशेष अतिथी म्हणून शुभदा देशमुख व अरुणा सबाने उपस्थित होत्या. पुरुषांना संवेदनशील बनवणे, सेफ्टी ऑडिट, 'मनुस्मृती नको, संविधान हवे' इत्यादी विषयांवर मोहिमा घेऊन विदर्भ विभागाचे शिबिर सेवाग्राम येथे घ्यावे असे ठरले. कौटुंबिक अत्याचार, पोक्सो कायदा, आश्रम शाळा सर्वे, महिला कंडक्टर व महिला पोलीस यांची सुरक्षितता, बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन, हॉस्पिटल, आठवडी बाजार अशा सार्वजनिक ठिकाणी स्त्रिया व मुलींची छेडछाड, सुरक्षितता यंत्रणांची कार्यक्षमता, स्त्रियांसाठी सार्वजनिक शौचालयांची सोय इत्यादी विषयांवर चर्चा झाली.

सांस्कृतिक संसाधने या विषयावर काम करणाऱ्या गटाची ऑनलाइन मीटिंग २० एप्रिल रोजी झाली. या मीटिंगमध्ये संसाधन निर्मितीसाठी ज्या संकल्पना आशय सर्वमान्य झाले त्याची मांडणी कशी करावी, अभिव्यक्ती कशी करावी याची चर्चा झाली.

'मनुस्मृती नको, संविधान हवे' या विषयावर २१ एप्रिल रोजी ऑनलाईन बैठक झाली. या बैठकीला सिंधुदुर्ग, चिपळूण, कोल्हापूर, सांगली, पुणे, नांदेड, ठाणे, मुंबई इत्यादी **(पान ५१ वर)**

काफिला...

शहादा, धुळे

रोहिणी भट-साहनी

जेव्हा एखाद्या व्यक्तीला स्वतःचं जगणं शब्दबद्ध करावं वाटतं तेव्हा एक समाजातील धागा जणू मांडायचा असतो, कारण कुठल्याही व्यक्तीचं आयुष्य हे वैयक्तिक नसतं तर राजकीय-सामाजिक असतं. काहींना विशिष्ट धार्मिक-जातीय पार्श्वभूमीमुळं शोषित आयुष्य जगावं लागलेलं नसतं तरीही त्या व्यक्तीची सामाजिक जडणघडण समाजाशीच जोडलेली असते, त्यामुळं पुन्हा एक सकस आत्मचरित्र वाचकांच्या समोर घेऊन येत आहोत... काफिला!

रुईया कॉलेजची ती दोन वर्ष खूप मस्त गेली. पण कॉलेजची खरी मजा मला रुपारेल कॉलेजमध्ये आली. माझ्या बी. ए.च्या शेवटल्या दोन वर्षांसाठी मी कॉलेज बदललं. मला इकॉनॉमिक्सबरोबर दुसरा विषय सायकॉलॉजी घ्यायचा होता. आणि रुईयामध्ये तो ऑफर करत नव्हते. म्हणून मी कॉलेज बदललं.

रुपारेल कॉलेजमध्ये अगदी पहिल्याच दिवशी पहिल्याच तासाला, क्लास मॉनिटरची निवडणूक होती. मी पण माझं नाव दिलं होतं आणि निवडणुकीला उभी राहिले होते. पण मला तिथे कोणी ओळखत नव्हतं, आणि म्हणून मी निवडून आले नव्हते. पण त्या दिवशी मी जेव्हा कॉलेजमधून घरी जायला निघाले, तेव्हा चालत असताना माझ्या वर्गातली - निवडून आलेल्या राजन पडवळ नावाच्या मुलासकट - मुलांची एक गँग माझ्या मागे मागे यायला लागली; मला चिडवत. निवडणुकीला उभी राहते काय? आली तरी कुठून? समजते काय स्वतःला? लय हुशारी दाखवते काय? मी थोडा वेळ ऐकून घेतलं, आणि सरकन वळून त्यांच्यावर उलटले. कोण तुम्ही? कॉलेज काय तुमच्या बापाचं आहे का? मी कुठूनही आलेली असेन. तुमच्या बापाचं काय जातं मी निवडणुकीला उभी राहिले तर? ती पोरं दचकली. मला सोडून माघारी निघून गेली. आयला, लवंगी मिरची निघाली...माझ्या कानावर आलं. मी हसतहसत घरी आले. त्या नंतर तीच पोरं माझी जिगरी दोस्त झाली. राजन पडवळ, पारकर, विजय तापस, अरविंद रे, विवेक राजापुरे आम्हा सगळ्यांचा एक सॉलिड ग्रुप होता. आम्ही खूप खूप वाचायचो. खूप डिस्कस करायचो. साहित्यापासून, अर्थशास्त्रापासून, राजकारणापासून, नाटकापासून सिनेमापर्यंत. मोठ्याने आरडाओरडा करत आम्ही आपलं मत मांडायचो. आम्ही कॉलेजच्याजवळ एक छोटस हॉटेल होतं, तिथे बसून एक चहा चार जणात प्यायचो. एक मेदुवडा सांबार चार जणात खायचो. सिगरेटी ओढायचो. आणि तो हॉटेलवाला आम्हाला हाकलेपर्यंत तिथे बसायचो. भालचंद्र नेमाडे आणि त्यांच्या कादंबऱ्या आम्हाला देवाच्या जागी होत्या. त्यांच्या कादंबऱ्यांची आम्ही पारायणं करायचो. दलित साहित्य, आणि इतर सगळं मराठी साहित्य आम्ही पुस्तकातल्या किड्यासारखं वाचायचो. विवेक आणि विजय काय काय रोज नवीन कविता करायचे (आणि आम्हाला पिकवायचे!)

राजन उचापत्या करण्यात मोठा धाडसी होता. दादर स्टेशनच्या जवळच एक तीन मजली बिल्डिंग होती. त्यातल्या प्रत्येक मजल्यावर रोज एक एक लग्न सोहळा-रिसेप्शन होत असे. आम्ही सगळे तिथे नेहमी जायचो आणि कुठल्याही लग्नात जाऊन आईस्क्रीम खाऊन यायचो. राजन तर स्टेजवर जाऊन फोटो सुद्धा काढून यायचा.

एकदा काय झालं, मी, राजन आणि पारकर कॉलेजच्या कॅम्पसमधे बसून एकच सिगरेट तिघांत ओढत होतो. राजनने एक झुरका मारला मग मी एक झुरका मारला आणि तेवढ्यात प्रिन्सिपल जे त्याच कॅम्पसवर राहत असत, आपल्या घरातून बाहेर आले. आम्ही तिथे जवळच बसलो होतो. त्यांना बघून मी धूर घशात धरून ठेवला आणि सिगरेट राजनच्या हातात दिली. पण ते जवळ येताच सगळा धूर फसकन माझ्या नाकातोंडातून बाहेर पडला. प्रिन्सिपल सरांनी मला लगेच त्यांच्या ऑफिसमधे बोलावून घेतलं. म्हणाले, "जा तुझ्या आई वडलांना बोलावून आण. मग सांगतो त्यांना तू कॉलेजमधे कायकाय चाळे करतेस ते." मी झक मारीत - आईला नाही अर्थात -ती माझा गळा धरेल म्हणून, पण काकांना बोलावून आणलं. काका मला फारसं काही बोलल्याचं आठवत नाही. पण गंमत बघा ना. ते पोरगे सिगरेट ओढत होते त्यांच्या आईबापांना कुणी नाही बोलावलं. ते पोरगे होते ना? ते सिगरेट ओढणारच. त्यात काय मोठंसं. मी मुलगी सिगरेट ओढते म्हणून माझ्या मात्र आईबापांना बोलावलं.

माझं कॉलेज चांगलं चालू होतं त्या दिवसात, काकांनी कांदीवलीच्या कम्युनिस्ट पार्टीच्या शिर्के सरांच्या मदतीने; त्यांनी

एक तरुण मुलांचं, कम्युनिस्ट चळवळीतल्या तरुणांचं एक सुंदर कलापथक बसवलं होतं. रोज रात्री जेवण झाल्यावर काका परळहून कांदीवलीची गाडी पकडून नंतर कांदिवली स्टेशनवरून बस पकडून शिर्के सरांच्या तिथे जात असत. तेव्हा काकांचं वय असेल ५५ वर्ष. दिवसभर काम करून ते रात्री कांदिवली गाठत. तिथे ते त्यांना अमरशेखांची, अण्णाभाऊंची गाणी शिकवत असत. त्यांच्याकडून अण्णाभाऊंची वगनाट्य बसवून घेत असत. त्या कलापथकात खूप टॅलेंटेड तरुण होते. त्या कलापथकाने मी कॉलेजात असताना खूप प्रयोग केले. त्या कलापथकाची डान्सर होते मी आणि सुबल सरकार यांची मुलगी कृष्णा. वगात स्त्रीची भूमिका करत असे मी. त्या दिवसात सुबल सरकार मला आणि कृष्णाला - आम्ही तिला किशू म्हणायचो - अण्णाभाऊंच्या गाण्यांवर, अमरशेखांच्या गाण्यावर, नारायण सुर्वे यांच्या कवितांवर नृत्य बसवून देत असत. मला असं वाटतं, सुबल सरकारांच्या त्या नाचाच्या तालमी मी कधी जन्मात विसरणार नाही. काय नृत्याचा अविष्कार होता त्यांच्यात. त्यांच्याकडून मला शिकायला मिळालं, हे मी माझं भाग्य समजते. आणि किती प्रोग्रॅम आम्ही केले माय गॉड. माझ्या जीवनातला तो एक अतिशय सुंदर कालखंड होता.

दुसरा तितकाच महत्त्वाचा भाग माझ्या त्या वेळच्या आयुष्याचा होता माझी सामाजिक आणि राजकीय जाणीव धारदार करणारा, तिला दिशा देणारा मागोवा ग्रुप आणि त्यांच्या बैठकी. मी तेव्हा तिथल्या सगळ्यांपेक्षा लहान होते. १७-१८ वर्षांची असेन, पण कदाचित म्हणूनच जास्त इम्प्रेशनेबल होते. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या लायब्ररीच्या जागेचा अतिशय सृजनशील उपयोग जर कुणी केला असेल, तर तो माझ्या काकांनी. लायब्ररीची खोली खूप मोठी होती. लायब्ररीत एका टोकाला पुस्तकाच्या रांगा होत्या. आणि दुसऱ्या अर्ध्या भागात वाचायला बसायची टेबलं होती. ती टेबलं सरकवली की खूप मोठी जागा मोकळी होत असे. लायब्ररी बंद झाली की त्या जागेत सुबल सरकारांबरोबर आम्ही नाचाची प्रॅक्टिस करायचो. आणि दर रविवारी संध्याकाळी, पुण्या-मुंबईच्या मागोवा गटाच्या मिटींगा तिथे व्हायच्या. मार्क्सवादावर, राजकीय विषयांवर, सामाजिक जडणघडणीच्या चर्चा आणि विविध वक्त्यांची भाषणं आणि अभ्यासमंडळं तिथे व्ह्यायची. सुधीर बेडेकर, संदीप पेंडसे, छाया दातार, कुमार शिराळकर, तुळशी परब आणि कितीतरी डावे तरुण अभ्यासक आणि देशाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रश्नांनी पछाडलेले युवक त्या अभ्यासमंडळात सामील होते. त्या अभ्यासमंडळात मी ऐकलेली भाषणं आणि चर्चा ह्या माझ्या मानसिक जडणघडणीचा अविभाज्य हिस्सा बनली. हे सगळे अभ्यासक काकांच्या दुकानात येत असत. तिथेही त्यांच्या चर्चा चालत असत. त्याही मी ऐकत असे. मागोवा गटाचा अप्रोच जास्त अभ्यासपूर्ण होता. मागोवा हे मासिकसुद्धा वेगळं होतं. कम्युनिस्ट पक्षाच्या सभांना मी लहानपणापासून गेले होते. पण तिथे मला अशा प्रकारच्या चिकित्सक अभ्यासाची जाणीव कधी झाली नाही. पक्षाच्या सभा या एक राजकीय लढ्याचा भाग होत्या. मागोवा गट काहीतरी वेगळं करण्याच्या उमेदीने चालवला जात होता. मागोवा गटातल्या काही तरुणांनी धुळे जिल्ह्याजवळील शहादा आणि त्या जवळच्या खेडेगावात, आदिवासींना एकत्र आणण्यासाठी, त्यांच्या दारिद्र्य आणि पिळवणुकीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी, त्यांना लढायला तयार करण्यासाठी एक मला वाटतं श्रमिक संघटना म्हणून गट केला होता. त्यात कुमार शिराळकर, विजय आणि विक्रम कान्हेरे, तुळशी परब, अशोक मनोहर आदी तरुण होते.

तो सगळा काळच डाव्या, पुरोगामी आणि एका वेगळ्या विचारांनी भारलेला होता. विजय तेंडुलकरांची नाटकं, शांतता कोर्ट चालू आहे पासून ते सखाराम बाईंडर, गिधाडे आणि घाशीराम कोतवाल इथपर्यंत यांनी मी भारावून गेले होते. गो. पु. देशपांडे यांचं उद्ध्वस्त धर्मशाळा हे नाटक मी छबिलदास सभागृहात पाहिलेलं मला अजून आठवतंय. श्याम बेनेगल यांचे आणि गोविंद निहिलानी यांचे सिनेमे त्या काळात इतिहास घडवत होते. कुमार केतकर आणि राजा पटवर्धन एक 'राजकारण' नावाचं नियतकालिक काढत असत. आणि कम्युनिस्ट पार्टीच्या सभेत ते विकत असत. अनिल बर्वे 'रणांगण' नावाचं नियतकालिक काढत असे. दुसऱ्या बाजूला दलित साहित्य आणि दलित पॅन्थर आपला आवाज उठवत होती. मला तरी असं वाटतं, की आजच्या या भारतीय जनता पक्षाच्या भयानक राजवटीत तो काळ म्हणजे एक वेगळाच सृजनशील आणि विचार करायला लावणारा भारलेला काळ होता.

मी कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाला असेन, तेव्हा मी ठरवलं, आपण शहाद्याला जायचं. त्यांचं काम बघायला. आणि मी एक दिवस गाठोडं बांधून धुळ्याची गाडी पकडली. माझ्याबरोबर माझी मैत्रीण अरुणा धर्माधिकारी होती. धुळे स्टेशनवरून बस पकडून आम्ही शहाद्याला श्रमिक संघटनेच्या ऑफिसमधे पोचलो. तिथे आम्हाला विक्रम कान्हेरे भेटला. तो माझ्या शर्ट पँटकडे बघून म्हणाला, "तुला इथे या कपड्यात हिंडता यायचं नाही. साडी नेस." आता साडी कुठून आणायची? नशिबाने अरुणाने मला साडी ब्लाउज परकर दिला. तोच मी रोज दहा पंधरा दिवस वापरला. त्यांच्या ऑफिसात तुळशी परब भेटला, विजय कान्हेरे भेटला, अशोक मनोहर भेटला. तिथे वंदना सोनाळकर पण आली होती. आमची सगळ्यांची गाढ मैत्री झाली. दिवसरात्र आम्ही त्यांच्या कामाची, मार्क्सवादाची आणि देशाच्या राजकीय आणि आर्थिक घडामोडींची चर्चा करत असू. दुसऱ्या दिवशी मी, अरुणा आणि वंदना जवळच्या एका गावात गेलो. तिथे पोचता पोचता अंधार पडला होता. तिथल्या कार्यकर्त्यांनी आम्हाला एका खोपटात झोपायला जागा दिली. चालून चालून मी इतकी दमलेली होते की लगेच तिथल्या खाटल्यावर जाऊन झोपले. इलेक्ट्रिसिटी

तर अर्थात नव्हती. मी झोपले तेव्हा माझ्या पायाला काहीतरी खरचटतंय असं मला वाटलं. पण मी दमलेली होते. म्हणून गाढ झोपले. सकाळी उठून बघते तर एक शेळी माझ्या खाटेला बांधलेली होती. ती माझा पाय खरचटत चाटत होती. हा मला - एका मुंबईच्या पोरीला नवा अनुभव होता. सकाळी उठून मी टूथपेस्ट आणि टूथब्रश काढला. आता तोंड कुठे धुणार? मी त्या कार्यकर्त्याला विचारलं. तो म्हणाला, "नदीवर जा. नदीवर?" "ती कुठे आहे?" "ती पार डोंगराच्या पलीकडे आहे. इथे पाणी नाही?" "नाही." म्हणाला. मग आमची यात्रा शोधत शोधत नदीवर गेली. तिथे जाऊन दात घासून आलो. आता ब्रेकफस्ट? ब्रेकफस्ट काही नाही. आता जेवण एकदम दुपारी. आम्ही आपल्या तशाच बसून राहिलो. नंतर एक मिटिंग होती वाटतं. पण मी काहीतरी खाण्याची वाट बघत होते. शेवटी एकदा दुपारी मला एक भाकरी आणि कांदा देण्यात आला. त्या कांद्याबरोबर ती भाकरी काही माझ्या घशाखाली उतरेना. ती भाकरी ज्वारी किंवा बाजरीची नव्हती. कुठल्यातरी अनोळखी धान्याची होती. तिच्यात खूप तसू तसू होते. कशीबशी खाल्ली. मला समजलं की आदिवासी माणसं सकाळी उठून काही न खाता चहा सुद्धा न पिता सरळ कामावर जातात. कुणी शेतावर काम करत. कोणी जंगलात लाकडं आणि कंदमूळ शोधायला जात. त्या दिवशीच्या रात्री मात्र त्यांनी आम्ही आलो म्हणून कंदमुळांची भाजी आणि भाकरी केली होती. आणि रात्री शेकोटी पेटवून ढोलाच्या तालावर ते सगळे सुंदर फेर धरून नाचत होते. त्यात मीही सामील झाले.

त्या दहा पंधरा दिवसात आम्ही संघटनेचं मजबूत काम पाहिलं. आदिवासी जीवनाचा जवळून परिचय घेतला. संघटनेने आदिवासींना कसं दारूमुक्त केलं होतं ते पाहिलं. त्यांना शेताच्या मजुरीचे किती कमी पैसे मिळत असत आणि संघटित झाल्यावर कसे थोडे जास्त मिळायला लागले ते ओळखलं. त्यांचं अपार कष्टाचं आयुष्य पाहिलं. बायका कशा दूर नदीवर जाऊन डोक्यावरून पाणी आणतात ते पाहिलं. आपल्या देशात माणसं, स्त्रिया, उघडी नागडी बारकी पोरं कशी खोपटातून राहतात हे बघून मी आपल्या देशातल्या गरिबीचा खोलवर विचार करायला लागले. मी स्वतःला गरीब गरीब म्हणवत होते. मला आपण गरीब आहोत की कनिष्ठ वर्गात आहोत की मध्यम वर्गात आहोत याची धास्ती पडली होती. पण माझ्या घरात पाण्याचा नळ होता. तुंबणारा का होईना जायला संडास होता. सकाळी लोणी पावाची न्याहारी होती. कुठेतरी जायला बस ट्रेन होती. बटण दाबलं की पंखा-दिवा जळत होता. मी कसली गरीब?

रोहिणी भट साहनी, *पुणे*
rohinisahni2000@yahoo.com

(पान ४८ वरून) विविध भागातून सुमारे ३० ते ३५ महिला उपस्थित होत्या. मुंबईमध्ये आयोजित केलेल्या कार्यशाळेसारख्या आणखी कार्यशाळा इतर जिल्ह्यात करण्याचे ठरले. चिपळूणमध्ये ९ मे रोजी व कुडाळमध्ये ११ मे रोजी कार्यशाळा घेण्याचे ठरले. कार्यशाळांच्या तारखा, ठिकाण व वक्ते निश्चित झाल्यावर स्थानिक गट इतरांना कळवतील. या कार्यशाळेसाठी उपस्थित राहू इच्छिणाऱ्यांनी संध्या म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा असे सांगण्यात आले. याच बैठकीत आपत्तीकालीन प्रतिसादासाठी संस्थांची जोडणी (नेटवर्क) करण्यासाठी चर्चा झाली. अत्याचार, दंगल, झुंडबळी, बुलडोझरराज यामुळे एखादी व्यक्ती, समूह किंवा सर्व समाज प्रभावित होत असेल तर संकटकालीन प्रतिसादाची व त्यासाठी नेटवर्कची आवश्यकता सर्वांनीच मान्य केली. विशाळगड दंगलीच्या अहवालाचे सादरीकरण झाले आणि पुढील कृती कार्यक्रमासाठी सूचना मांडल्या गेल्या.

नववी महाराष्ट्र महिला आरोग्यहक्क परिषद २६ एप्रिल ते २८ एप्रिल या काळात पालघर येथे भरली होती. २७ तारखेला दुपारी चार वाजता स्त्री चळवळीच्या पन्नास वर्षावर सत्र झाले. या सत्राची अध्यक्ष या नात्याने अमोल केरकर यांनी महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेच्या मोहिमा व डिसेंबर २०२५ मध्ये मुंबईमध्ये होणारी ३ दिवसांची परिषद याबद्दल मांडणी केली. महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या सुकाणू समिती सदस्य निशा शिवूरकर व मनीषा गुप्ते यांनी या परिसंवादात भाग घेतला.

डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या तीन दिवसाच्या कार्यक्रमासाठी जागेचा शोध चालू असताना दक्षिण मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या इमारतीतील जागेची चौकशी करायचे ठरले होते. २८ एप्रिलला शारदा साठे, छाया दातार, चयनिका शहा व अमोल केरकर यांनी त्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेतली. २०, २१, २२ डिसेंबर या तीन दिवसांसाठी ऑडिटोरियम व इतर दोन सभागृहे उपलब्ध होती. ती बुक केली. त्याचप्रमाणे इतर जागेची पाहणी करून प्रदर्शने लावण्यासाठी, जेवणासाठीही जागा बुक केली. प्रतिष्ठानच्या इमारतीतील इतर सुविधा कार्यक्रमाच्या तीन दिवसात उपलब्ध करून दिल्या जातील असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले. त्यांनी महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेच्या कार्यक्रमादरम्यान प्रतिष्ठानतर्फे सर्व सहकार्य देण्याची जबाबदारी श्री. दत्ता बाळसराफ यांच्यावर सोपवली. प्रतिष्ठानच्या इमारतीत निरनिराळ्याआकाराची सभागृहे, नाट्यगृहे असल्यामुळे वैविध्यपूर्ण कार्यक्रम घेता येतील. ही जागा परिषदेसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिली जाईल. परिषदेसाठी सर्व कार्यकर्त्यांना सहजपणे पोहोचता येईल अशा दृष्टीने निवासाची सोय करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

अमोल केरकर, *मुंबई*

मायला हैदर

लष्कर दलातील लैंगिक छळकथा

वृषाली मगदूम

तथाकथित प्रगत देशातल्याही स्त्रियांवर होणारा संरक्षण विभागासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी कामाच्या जागी होणारा स्त्रियांचा लैंगिक छळ आणि बळीलाच शिक्षा देणारा उरफाटा न्याय वाचून स्त्री पुरुष समता अजून कोसो दूर कशी आहे याची मन उद्विग्न करणारी जाणीव होते. मात्र कामाच्या ठिकाणच्या या लैंगिक छळाच्या कहाण्या वाचून निराश न होता कणखरपणे लढण्याची गरजच यातून अधोरेखित होते हे लक्षात घेऊ या.

लष्करात कार्यरत असलेल्या व न्याय न मिळालेल्या एका धाडसी सैनिक महिलेच्या लैंगिक शोषणाची ही कहाणी आहे. मायला हैदर २००२ मध्ये सैन्य दलातील गुन्हेगारी शोध या तिच्या आवडीच्या विभागात रुजू झाली होती. ती कामावर असताना पहाटे दोन वाजता तिच्या सहकारी सैनिकाकडून तिच्यावर बलात्कार झाला, हल्लेखोर अमेरिकन आर्मी लॉ एनफोर्समेंट एजंट होता. त्याने मायलाला सकाळपर्यंत बराकमध्ये कैद्यासारखे डांबून ठेवले. पण मायलाने तक्रार केली नाही. लष्कराची लैंगिक शोषणाच्या प्रश्नाकडे पाहण्याची एकंदर प्रवृत्ती मायलाला माहीत होती. अशा प्रकारची तक्रार केलेली सैन्य दलातील महिला तिच्या माहितीत नव्हती. मायला समोर तिचा भविष्यकाळ उभा होता. लष्कराच्या गुन्हेगारी तपास यंत्रणेत तिला एजंट व्हायचे होते. त्यासाठी तिने एक वळणदार मार्ग निवडण्याचा निश्चय केला. सतत चालू असलेले युद्ध तिच्या प्रशिक्षणात अडथळा आणत होते.

मायला हैदर १९९४ ते १९९९ या काळात अमेरिकेतील सैन्य दलात होती. २००० ते २००५ पर्यंत ती कोरिया येथे सीआयडीमध्ये होती. सीआयडी हे मिलिटरीमध्ये गुन्हे, बलात्कार, लैंगिक हल्ले याची चौकशी करत असतात. लष्करातील तिच्यावर झालेल्या या हल्ल्याची जरी तिने तक्रार केली नसली तरी अखेरीस ती नैराश्यात गेली. आजही या लैंगिक शोषणाच्या खुणा ती वागवते आहे. तिचे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याची भावना तिच्या मनात आहे. १०१ व्या एअर बोर्नमधील तिचे प्रमुख मार्टी हर्बर्ट यांनी तिला कमांडर बटालियनची गुप्तचर विश्लेषक म्हणून तिने इराकला जावे असे सुचवले. तिने तिच्या आवडीचा गुन्हेगारी शोध विभाग सोडून दिला, एकदा सैनिक असलेला नेहमीच सैनिक असतो असे मायलाला वाटते. मार्टी हर्बर्टना तिचा रास्त अभिमान आहे. अतिशय तल्लख बुद्धिमत्तेची, समानतेच्या विचाराचा आग्रह असणारी अशी ती करारी स्त्री आहे, असं ते म्हणायचे. २००२ ला मायला १०१ एअर बोर्न बरोबर कंधारला गेली. त्यानंतर २००३ मध्ये इराकला गेली, युद्धभूमीवरील अनुभव अतिशय चित्तथरारक होता, ती व तिचे तीन सहकारी सैनिक एका वाहनात अनेक दिवस अडकून पडले होते, लांबपर्यंत फक्त वाळूने वेढलेला परिसर होता. दोन आठवडे मायला तिच्या केमिकल सूटमध्ये होती. रोज त्या सर्वांना फक्त चार पाण्याच्या बाटल्या मिळत असत. पण तरीही ते दिवस अतिशय सुंदर होते, असे मायलाला वाटते. तिचे तिन्ही सहकारी मित्र अतिशय चांगले होते. त्यांच्याबरोबर एकत्र राहताना तिला कधीही भीती वाटली नाही. तिच्याबरोबरचे त्यांचे वर्तन अतिशय सभ्य होते. स्त्री म्हणून त्यांनी तिला वेगळी वर्तणूक दिली नाही. एक सहकारी म्हणून त्या वाळवंटात ते एकमेकांची चेष्टा मस्करी करायचे. त्यांच्याकडे एक नेर्फ फुटबॉल होता तो एकमेकांकडे उडवत राहायचे. युद्धभूमीवर असताना ते एकमेकांच्या आयुष्यातील समस्या, सुख-दुःखे परस्परांना सांगून तणाव कमी करायचा प्रयत्न करायचे. पण मायलावर झालेला घाव मात्र तिने कोणाला सांगितला नाही. अतिशय जड अंत:करणाने ती एवढी मोठी जखम घेऊन आपल्या चेहऱ्यावर हसू आणून वावरत होती. मायलाने निश्चय केला आणि तिने ही भयंकर घटना भूतकाळात गाडून टाकायची ठरवले. हळूहळू ती शांत होऊ लागली.

१०१ व्या एअरबोर्न विभागातील इराक व अफगाणिस्तान युद्धभूमीवरील पुरुष सहकाऱ्यांनी दाखवलेल्या वर्तनाने तिची जखम भरायला मदत झाली. तिचे मतपरिवर्तन झाले. सगळेच सैनिक लैंगिक शिकारी नसतात या मतापर्यंत ती आली. पण भूतकाळ असा लपून राहत नाही. सैन्य दलातील गुन्हेगारी शोध विभागात ती एजंट म्हणून परत आली. एके दिवशी या विभागातून एका अधिकाऱ्याचा तिला फोन आला. तिच्यावर बलात्कार केलेल्या व्यक्तीचे नाव घेऊन त्याचा तपास चालू असल्याचे तिला सांगितले. हा संभाव्य साखळी बलात्कारित असून त्याने अनेकींवर बलात्कार केला आहे, त्यामुळे सैनिक दल त्याच्या गुन्ह्याचा शोध

घेत आहे, असं तिला त्या अधिकाऱ्याने सांगितले. मायलाने या शोध मोहिमेत सहभागी होऊन सहकार्य करण्याचे ठरवले. २०१० मध्ये मायलासह वॉशिंग्टन डी.सी. येथील पेंटागॉनमध्ये बलात्कारी महिला सैनिकांच्या वतीने खटला भरण्यात आला. पेंटागॉन हे अमेरिकेच्या सुरक्षा संस्थेचे मुख्यालय आहे, हे वॉशिंग्टन डी.सी. च्या जवळ व्हर्जिनिया राज्यातील अर्लींग्टन येथे आहे. २६००० लष्करी अधिकारी येथे काम करतात. सुसान ब्रुके यांनी ही केस चालवायला घेतली. सुसान ब्रुके ही आर्मी कर्नलची मुलगी आहे. लष्कराच्या संरक्षण विभागाने नोंदवलेल्या आकडेवारीनुसार दरवर्षी लष्करात १९००० लैंगिक हल्ले होतात. अगदी अलीकडच्या आकडेवारीनुसार ११०८ तक्रारी चौकशीसाठी नोंदवल्या गेल्या. त्यातील ५७५ तक्रारींची प्रक्रिया सुरू करण्यात आली. फक्त ९६ तक्रारी कोर्टापुढे आल्या. इतक्या कमी तक्रारींमध्येही न्याय मिळतच नाही, असं सुसान सांगते. कारण कोर्ट मार्शलमध्ये खटला भरणारा अधिकारी आरोप बदलू शकतो. शिक्षा कमी करू शकतो व निकालही फिरवू शकतो.

मेजर जनरल गॅरी पॅटन हे पेंटागॉनच्या लैंगिक अत्याचार प्रतिबंध समितीचे प्रमुख आहेत. माझ्या सैन्यात लैंगिक हल्ल्याला स्थान नाही, असं ते सांगतात. लैंगिक अत्याचारावर आधारित 'द इनव्हिजिबल वॉर' नावाचा टिकात्मक माहितीपटही लष्कराच्या अभ्यासक्रमात आहे, असं ते सांगतात. या माहितीपटात कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ या विषयीची माहिती दिली आहे. मायलाने या माहितीपटात काम केले आहे. किर्बी डिक हिने सदर माहितीपटाचे लेखन व दिग्दर्शन केले आहे. एमी झियरिंग व टॅनर किंग बार्कलो यांनी या माहितीपटाची निर्मिती केली आहे. मायलाने २०११ मध्ये वॉशिंग्टन डी.सी. येथे झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले की प्रशिक्षित लष्करी सैनिक व वकील यांनी बलात्काराच्या केसची कसून चौकशी केली पाहिजे. जोपर्यंत योग्य चौकशी होत नाही तोपर्यंत पिडीतेला त्याची किंमत मोजावी लागते. मायला हैदरच्या बरोबरीने अनेक जणींनी कोर्टात केस फाईल केली होती. इली हेन्मेटला तिच्या वरिष्ठानी पबमध्ये नेऊन बेशुद्ध करून बलात्कार केला. हा दुहेरी गुन्हा होता. पण इलीलाच अशोभनीय वर्तन म्हणून दोषी ठरवले. कर्लि मारक्वेंटने वरिष्ठाकडून बलात्कार झाल्याचे सांगितले. तर तिला दंडात्मक फेऱ्या मारत राहण्याची शिक्षा दिली. तिने नोकरीचा राजीनामा दिला. ॲन केंडझिर ही नेव्ही ॲकेडमीत होती, तिने जेव्हा वरिष्ठाकडून झालेल्या बलात्काराची तक्रार केली. तेव्हा तिचे मानसिक स्वास्थ बरोबर नसल्याचे सांगत तिला नोकरीवरून काढण्यात आले.

कर्स्टन गिलीब्रॅड व जॅकी स्पीयर या सिनेटर व वकील आहेत. यांनी २०२१ मध्ये सैन्यामधील लैंगिक छळाची माहिती फेडरल लेझिलेशन (कायदेमंडळात) दिली. जोनी अन्सर्ट या निवृत्त लष्करी अधिकारी व सिनेटर आहेत. त्यांनी आम्ही नक्की याची दखल घेऊ, असं आश्वासन दिलं. पण जुनेच बिल पास करून काहीही पावले उचलली नाहीत. मायलाने कोर्टात तक्रार केल्यानंतर तिला सैन्य दलातून काढून टाकण्यात आले. मायलाबरोबर अनेकींनी साक्ष दिली होती. आरोपीला नाममात्र शिक्षा ठोठावली गेली. या शिक्षेतही लैंगिक गुन्हेगार म्हणून त्याची नोंद झाली नाही. मायलाने तक्रार नोंदवल्यानंतर तिचे सर्व सहकारी तिला टाळू लागले. तिच्यावर झालेल्या बलात्कारावर शंका घेऊ लागले. गेली दहा वर्ष तिच्या कामाची प्रशंसा व्हायची त्याच कामात आता त्रुटी काढून तिला फटकारले जाऊ लागले. शेवटी तिला सैन्यातून काढून टाकण्यात आले. मायला ने २००९ मध्ये समुपदेशनात एम.ए. केले. बलात्कार पिडीतांना समुपदेशन व मदत करण्याचे काम ती करत आहे. एका नव्या करिअरची सुरुवात तिने केली. पण आवडीचे क्षेत्र सोडावे लागले ही खंत आहेच. एका भ्रष्ट व्यवस्थेची अतिशय विदारक बोलकी कहाणी आहे.

वृषाली मगदूम, *नवी मुंबई*
vamagdum@gmail.com

(पान ४७ वरून)

त्या तुला 'निर्ऋति' म्हणून मी सर्वतोपरी ओळखतो.
ना हवन ना यज्ञ करणाऱ्याला तू शोध,
चोर व डाकूंच्या रस्त्याने तू जा;
आम्हाला सोडून दुसऱ्याला तू शोध, तो तुझा रस्ता आहे,
देवी निर्ऋते, तुला प्रणाम असो.
देवी निर्ऋतीला वंदन करणारा मी,
पिता जसा पुत्राला,
तसा मी तिला माझ्या शब्दांनी थकवून सोडतो;
विश्वातल्या सर्व जातमात्रांना ती जाणते, आणि
डोक्याडोक्याला ही उद्गाती ओळखते.
(गण-) धनाची निधान व संग्राहक,
विश्वातली यच्त्वयावत् (चराचर) रूपे जाणणारी, सर्वज्ञ,
सत्यधर्मा सविता देवाप्रमाणे,
इंद्रासारखी, ती चौरस्त्यावर उभी राहाते.

प्राचीन काळात चौरस्त्यावर उभे असणे हे प्रतिष्ठेचे समजले जाई. अशा चौरस्त्यावर उभ्या असलेल्या ज्ञान, समता, सर्जन आणि विकास यांचे प्रतीक असलेल्या निर्ऋतिचे कालौघात विकृतीकरण झाले. ते कसे व का करण्यात आले याची चर्चा पुढील लेखात करण्यात येईल.

दिलीप चव्हाण, नांदेड
dilipchavan@srtmun.ac.in

मिरचीचा प्रवास

सुगंधा जोहर

विरासत माणूस आणि जनावर यांच्यामधला फरक अधोरेखित करते. विरासत हा सर्व मानव जातीचा वारसा असतो. तो कुणा एका वंशाच्या, धर्माच्या, जातीच्या, कुटुंबाच्या किंवा व्यक्तीच्या मालकीचा कसा नसतो हे एकदा समजून घेतलं की माणसं परस्परांतील जात, धर्म, वंशभेद ओलांडून माणूसपणाच्या वाटेवर आनंदानं प्रवास करतील. या अपेक्षेसह दुनियेचा सजग आणि डोळस प्रवास केलेल्या विदुषी सखीची ही छोटेखानी, अर्थगर्भ लेखमाला जरूर वाचा.

जी मिरची असल्याशिवाय आपल्याला तोंडात घास घालवत नाही ती मिरची मुळची दक्षिण अमेरिकेची आहे. दक्षिण अमेरिकेतून इंडियात ती केव्हा आणि कुणाबरोबर आली आणि सर्व इंडियन लोकांची आवडती कशी झाली ते आपण पाहू.

१६ व्या शतकात युरोपमधून भारतात यायचा एकच समुद्री मार्ग होता. लोक भूमध्य सागराने इजिप्तमधील ॲलेक्जांड्रीया बंदरापर्यंत पोचायचे आणि त्यानंतर इजिप्तमध्ये थोडा प्रवास जमिनीवरून वरून लाल समुद्र आणि इराणी आखातामार्गे इंडियाच्या तटावर पोचायचे.

युरोप इंडिया व्यापार त्यावेळेस फ्लोरेंसच्या व्यापाऱ्यांच्या हातात होता, आणि ते पश्चिमी युरोपच्या देशांना इंडियातून आलेले आणि इतर सामान अत्यंत महागात विकायचे. त्यामुळे ती लोकं बरेच दिवसापासून इंडियात येण्याचा दुसरा मार्ग शोधत होते.

१४९० च्या दशकात जेव्हा पृथ्वी गोल आहे हे लोकांच्या लक्षात आलं तेव्हा स्पेनमध्ये राहणारा ख्रिस्तोफर कोलंबसने विचार केला पृथ्वी गोल आहे भारतातसुद्धा एक रस्ता असायला पाहिजे आणि त्यांनी पूर्वीकडचा रस्ता शोधून काढण्याकरिता स्पेनचा राजा फर्डिनांडला आर्थिक साहाय्य मागितले. फर्डिनांडला ती कल्पना आवडली आणि त्यांनी कोलंबसला काही जहाजं दिली. पूर्वेकडे जन्मलेल्या कोलंबसला हे माहीत नव्हते की



पूर्वेकडे अमेरिकन महाद्वीप अस्ताव्यस्त पसरलेला आहे. त्यामुळे अमेरिकेत पोचायच्याऐवजी कोलंबस अमेरिकेजवळच्या वेस्ट इंडीज द्वीपसमूहात पोचला.

तेथील लोक वेगवेगळ्या आकाराचे निळे पिवळे फळ खाताना दिसली. ती फळं अत्यंत तिखट होती. त्या फळाच्या तिखटपणामुळे कोलंबसला वाटलं की ही फळं काळ्या मिऱ्यांचाच एक प्रकार आहे, म्हणजे आपण नक्कीच इंडियात पोचलो. पण त्याचा समज अर्थात चुकीचा होता. तो इंडियात तर पोचला नव्हताच आणि मिरची आणि काळे मिरे पण एक नाहीतच. ह्या दोन वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती आहेत.

मिरचीशिवाय कोलंबसने तेथील अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या, फळं आणि कडधान्याच्या बियासुद्धा युरोपमध्ये आणल्या. गेल्या ५०० वर्षात या सर्व गोष्टी आपल्या रोजच्या खाण्यामध्ये समाविष्ट झाल्या आहेत. ह्या फळं आणि भाज्यांच्या लिस्टमध्ये मिरचीशिवाय टोमॅटो, लाल भोपळा, मका, वालाच्या शेंगा, बटाटा-रताळी, चवळी, राजमा, पपई, सीताफळ, चिकू, पेरु, अननस आणि चॉकलेट व तंबाखू सुद्धा..

स्पेनमध्ये कोलंबसने या पैकी काही बियांचा नजराणा स्पेनचा राजा फर्डिनांडला दिला, आणि त्यापैकी काही बिया ख्रिश्चन पादऱ्यांना पण दिल्या. ह्या पदऱ्यांनी काही बिया पेरल्या आणि काही जवळच्या पोर्तुगालच्या पादऱ्यांना पण दिल्या. पोर्तुगालच्या त्या पदऱ्यांनी मिरच्या लावल्या वर त्या पोर्तुगालमध्ये पसरल्या.

१४९८ मध्ये वास्को द गामाने अनेक प्रयत्नानंतर आफ्रिकेच्या दक्षिणेला वळसा घालून पूर्वी किनाऱ्यावरील मोजम्बिकु आणि मालि नदीपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. तेथून तेथेच भेटलेल्या एका गुजराती नाविकाच्या मदतीने तो कोच्चीला पोचला आणि त्याच्या बरोबरच मिरची भारतात पोचली, आणि कोच्ची परिसरात पसरायला लागली. १५०६ च्या एका पोर्तुगीज

माणसाच्या पत्राप्रमाणे तोपर्यंत कोच्ची परिसरात तीन तऱ्हेच्या मिरच्या दिसायला लागल्या होत्या.

१५११ मध्ये पोर्तुगीजांनी गोवा जिंकल्यावर त्यांनी शेजारच्या विजयनगर साम्राज्याच्या राजाबरोबर चांगले संबंध स्थापित केले आणि त्यांच्याबरोबर मिरची विजयनगर साम्राज्याची राजधानी हंपी येथे पोचली जिथे ती लवकरच लोकप्रिय झाली. कन्नड भाषेचे महान संत कवी पुरंदरदासांना मिरचीची चव इतकी आवडली की त्यांनी मिरचीची स्तुती करणारी एक आख्खी कविताच केली.

त्या वेळेस विजयनगर साम्राज्याचे अधिपत्य दक्षिण इंडिया आणि उत्तर श्रीलंकेवर होते. त्यामुळे ह्या सगळीकडून हंपीत लोकांची ये जा होती. त्यांच्याबरोबरच मिरची पूर्ण दक्षिण इंडिया आणि श्रीलंकेत लोकप्रिय झाली.

विजय साम्राज्याच्या उत्तरेला दख्खन आहे. त्या वेळेस तेथे मुसलमान राज्य होते. त्यांचे विजयनगर साम्राज्याशी कधी चांगले संबंध असायचे आणि कधी दुश्मनी असायची. म्हणजे एकूण काय, तर त्या राज्यांमधून लोकं आणि व्यापारी सतत विजयनगर साम्राज्यात यायची. या लोकांबरोबर मिरची दख्खनमध्ये पण लोकप्रिय झाली.

कर्नाटकाच्या एका भागावर विजयनगर साम्राज्याचा अंमल होता आणि दुसऱ्यावरती आदिलशाही. कर्नाटकच्या उत्तरेला असलेल्या महाराष्ट्राच्या एका मोठ्या भागावर आदिलशाहीचा अमल होता जिथे इतर गोष्टींबरोबर महाराष्ट्राच्या बहुतेक भागात मिरची पोचली.

महाराष्ट्राच्यावर उत्तर पश्चिमेला असलेल्या गुजरातमध्ये मिरची महाराष्ट्राच्या अगोदरच केरळातून आणि पूर्वी आफ्रिकेतून येणाऱ्या व्यापारांच्या बरोबर पोचली होती. १५३० च्या पोर्तुगीज कागदपत्रांप्रमाणे गुजरातमध्ये मिरचीची लागवड तोपर्यंत चालू झाली होती. गोव्यात आणि गुजरातमध्ये पैदा होणाऱ्या मिरच्या पोर्तुगीज लोक विकत घेत आणि त्यांच्याबदली पूर्व आफ्रिकेमध्ये, ब्राझीलमध्ये उसाची शेती करण्याकरता गुलाम खरेदी करत होते.

गुजरातचे त्याच्या उत्तरेला असलेल्या राजस्थानशी पूर्वापार चालत आलेले घट्ट नाते आहे. त्यामुळे साहजिकपणेच गुजरातमध्ये मिरचीची पैदावार सुरू झाल्यावर मिरची राजस्थानमध्ये पण पोचली.

इंडियाच्या पश्चिम किनाऱ्यावर आपली पावलं रोवली यानंतर पोर्तुगीजांनी इंडियाच्या पूर्वी किनाऱ्यावर पण चेन्नई आणि ओरीसाची नाव प्रामुख्याने येतात. त्या नंतर त्यांनी बंगालमध्ये हुगळीत पण आपले पाय रोवायचा प्रयत्न केला होता पण मुघलांनी त्यांचे लवकरच उच्चाटन केले होते.



आता वळूया उत्तर भारताकडे. मिरची उत्तर भारतात केव्हा पोचली याबाबत आपल्याकडे काहीही ठोस पुरावा नाही, बऱ्याच अभ्यासकांचे असे मत आहे की मिरची उत्तर भारातात पेशवे कालीन मराठा सैनिकांसोबत पोचली. माझे स्वतःचे मत या पेक्षा वेगळे आहे. माझ्या मते औरंगजेबाच्या सैनिकांची मिरचीशी ओळख औरंगजेबाच्या दख्खन आणि दक्षिण भारत विजयाच्या २७ वर्षं चाललेल्या आक्रमणाच्या वेळेस झाली कारण त्या २७ वर्षांमध्ये औरंगजेबाच्या सैनिकांना मोहिमेत असताना दक्षिणेत मिळणाऱ्या अन्नधान्यावरच भागवावे लागले होते. माझ्या मताप्रमाणे हे सैनिक औरंजेबाच्या मृत्यूनंतर घरी परत जाताना आपल्याबरोबर मिरची घेऊन गेले असणार. मुघल दरबारातील पहिल्या मिरचीचा वापर १७४० मध्ये मुघल बादशाह महंमदशाह रंगीलाच्या दरबारात झाल्याचा संदर्भ मात्र आपल्याला मिळतो.

अशा प्रकारे १४९८ ते १७४० च्या दरम्यानच्या २४० वर्षातच मिरचीने पूर्ण इंडिया पादाक्रांत केला. आज इंडियात दरवर्षी मूळ देश मेक्सिकोपेक्षा कैक पट जास्त मिरचीची लागवड होते. चीनमध्ये आपल्यापेक्षा जास्त मिरचीचे पीक घेतले जाते. पण जगातील सगळ्यात मोठा बाजार मात्र आपल्या आंध्र प्रदेशातील गुंटूर शहरात आहे. पण तरीही आपण जगात सर्वात जास्त मिरची खात नाही. तो मान मात्र कोरियन लोकांकडे आहे जे दर वर्षी माणशी तीन ते चार किलो मिरची खातात. तेव्हा कोरियाला गेलात तर जरा सांभाळूनच खायला मागवा.

तर असा आहे मिरचीचा भारतातील प्रवास.

हे विरासतचे सदर आपल्याला कसे वाटते ते मला जरूर कळवा. अशाच एका विरासतच्या पैलूबरोबर पुढील महिन्यात पुन्हा भेटू. तोपर्यंत आनंदात राहा.

नमस्कार!

सुगंधा जोहर, *पुणे*

sugandha.johar@gmail.com/ मोबा. ९८८१३५२३४५

(पान ३९ वरून) किमान ४५ ओळखी असणार आहेत. ज्यांना ते जवळून ओळखतात पण आपण फारसे ओळखत नाही. आपल्या जवळच्या ओळखीच्यांची जवळची माणसे किती? आपले ओळखीचे पंचेचाळीस गुणिले प्रत्येकाचे वेगळी ओळख असलेले पंचेचाळीस. ४५ X ४५ = २०२५. इतक्या लोकांना आपण पहिल्या टप्प्यात ओळखत असतो. भूमितीय वाढ हे प्रचंड आकडे असतात वसू! तुझ्या आणि बराक ओबामाच्या ओळखीत फक्त सहा टप्पे आहेत असे मी म्हणालो ते म्हणूनच. सहा वेळा ४५ ला ४५ ने गुणायचे. पंचेचाळीसचा सहावा घात होतो. ४५^ ६ = ८३०३७६५६२५ आठ अब्ज!

पृथ्वीची लोकसंख्या किती?" या प्रश्नाच्या उत्तरासाठी मात्र स्मिथ थांबला.

वसू थोडेसे आठवत म्हणाली, "साधारण असेल आठ नऊ अब्ज."

"एक्झॅक्टली! यु आर राईट वसू. प्रत्येकाच्या विभिन्न ओळखीची ४५ माणसे पकडली तर सहा टप्प्यात आपण जगाचीच लोकसंख्या कव्हर केली आहे. त्यामुळे कोणीही माणूस अमेरिकन प्रेसिडेंटला सहा टप्प्यात ओळखणारच आहे! म्हणून मी म्हणतो गणित ही जगातली सगळ्यात सूंदर स्त्री आहे."

"बायकोसमोर असं काहीतरी बोलतोस आणि मग मार खातोस." हसत हसत वसू बोलली.

ती खूप दिवसांनी हसली होती.

तिच्या मेंदूत काहीतरी ग्रेट सापडल्याच्या तारा झंकारल्या होत्या. नेमकं काय ते डिफाइन होत नव्हतं. स्मिथच्या बडबडीत ते शक्यही नव्हतं. तोपर्यंत त्यांची गाडी मिटींगच्या ठिकाणापर्यंत पोचली होती. तिथे उभे असलेले बंदूकधारी सैनिक पाहून वसुला थोडासा धक्का बसला. "आरोग्यमंत्र्याला इतके सैनिक? गेस मिस्टर प्रेसिडेंट इज ऑलरेडी देअर." या स्मिथच्या वाक्याने मात्र तिचे शंका निरसन झाले. आता हा प्रेसिडेंट कशाला तडमडला इथे? असा विचार करत वसू बैठकीच्या खोलीत शिरली.

'वसूला या युद्धखोर प्रेसिडेंटबद्दल मनस्वी चीड होती. कुठे चीनवर बॉम्ब टाक, आफ्रिकेत हल्ले कर यावर करोडो डॉलरचा खुरदा उधळण्यापेक्षा तेच पैसे विज्ञानाच्या मूलभूत संशोधनाकडे का वर्ग करू नयेत?' असा तिचा रोकडा प्रश्न असे.

मिटिंग सुरू झाली होती आणि या विज्ञान विषयक बैठकीचे अध्यक्ष साक्षात प्रेसिडेंट होते. वसूला आनंदच झाला. बाबा सुधारला वाटतं! वसुला बैठकीत काय होणार याचा अंदाज होता. एक गोष्ट सोडून....

आरोग्य मंत्री नैरोबी शहराची माहिती सांगत होते. नैरोबी ही दक्षिण आफ्रिकेतील केनिया नावाच्या गरीब देशाची राजधानी. त्याची राजकीय चर्चा करण्याचे कारण हळूहळू उलगडत गेले. डॉ. वसुंधरा सुब्रमण्यम यांनी वर्तवलेले भविष्य खरे ठरले होते. नॉर्ड व्हायरसचा जन्म झाला होता. नैरोबी शहरात वाऱ्याच्या वेगाने पसरला होता. तेथील जिवाणू शहाणे होत होते आणि एकही अँटिबायोटिक काम करत नव्हते. वेगवेगळ्या रोगांच्या साथी झपाट्याने पसरत होत्या. निम्मी लोकसंख्या साथीच्या रोगांनी आजारी होती. शेकडा दहा लोकांनी मृत्यूला कवटाळले होते. रोगांच्या अनामिक भीतीने जनजीवन विस्कळीत झाले. कायदा सुव्यवस्थेचा संपूर्ण बोऱ्या वाजला होता. लूटमार-दंगलींनी थैमान घातले होते. त्याची राजकीय ब्रेकिंग न्यूज बरेच दिवस चालू होती. पण या दंगलींचे कारण राजकीय नाही - वैद्यकीय आहे - हे मात्र बेमालूमपणे लपवण्यात आले होते. अमेरिकन सैन्याने जाऊन संपूर्ण शहराला वेढा घातला होता. शहर क्वारनटाईन केले होते. क्वारनटाईन म्हणजे साथीच्या रोगाचा प्रसार बंद करायला आतील माणसांना कोंडून ठेवायचे आणि बाहेरील लोकांना आत जाऊ द्यायचे नाही. त्यामुळे शहरात वैद्यकीय मदत सुद्धा पोचत नव्हती.

अमेरिकेत साथ येऊ नये. आपल्या देशात नॉर्ड व्हायरस पसरू नयेत म्हणून ही तातडीची मिंटिंग बोलावण्यात आली होती. तर एकूण योजना अशी होती की जर नैरोबी शहर बॉम्ब टाकून संपूर्ण नष्ट केले तर. तर हे साथीचे रोग काबूत येतील का? वसूच्या डोक्यात संतापाची तिडीक गेली. या मुर्खांना कसं समजवावं? भावनांना आवर घालत डॉ. वसू शांतपणे बोलू लागली, "मिस्टर प्रेसिडेंट बॉम्बनी माणसं मरतात - जिवाणू नाही. विषाणू तर नाहीच नाही. तिथल्या पाण्यात, जनावरात, हवेत सर्वत्र ते असतील. कधीही बाहेर येतीलच. माणसं मारली तरीही." प्रेसिडेंटच्या पुढच्या वाक्याने मात्र वसुच्या पायाखालची जमीन सरकली.

"इन द इंटरेस्ट ऑफ अमेरिकन पीपल. वी आर गोइंग फॉर फ्युजन वेपन्स."

दुसऱ्या महायुद्धात वापरेल्या अणुबॉम्बपेक्षा भयंकर असे हायड्रोजन बॉम्ब वापरायची चर्चा चालू होती. फ्युजन रिएक्शन म्हणजे सूर्यासारखी न्यूक्लिअर रिएक्शन पृथ्वीवर चालू करणारा बॉम्ब टाकायचा. असले बॉम्ब या आधी कधीही वापरले गेले नव्हते. २०२३ च्या भारत पाक युद्धातसुद्धा नाही. याचे भयंकर परिणाम काय होतील याचा कोणालाच नीट अंदाज न्हवता. पण ही युद्धखोर माणसे - साथीच्या रोगावर तो वापरत होती. या बॉम्बने माणसं नव्हे तर व्हायरस सुद्धा मरतील हे सत्यच होतं.

या साथी जगभर पसरल्या तर सारी मानवजात धोक्यात येईल हे वसुला समजत होतं. पण म्हणून बॉम्ब? त्या बैठकीत काहीही बोलायची परवानगी वसुला मिळाली नाही. उलट तिला असे आदेश मिळाले की, स्मिथ आणि अजून एक न्यूक्लिअर फिजिसिस्ट बरोबर काम करून २४ तासात अहवाल दे. या अस्त्राचा उपयोग केला तर रोगांच्या साथी आटोक्यात येतील काय? उद्या बरोब्बर याच वेळी

म्हणजे संध्याकाळी ४ वाजता अहवाल सादर करा. त्याच बैठकीत निर्णय होईल. सभा तहकूब.

सुरक्षेच्या कारणास्तव तिन्ही शास्त्रज्ञाना २४ तास आरोग्य मंत्र्याच्या ऑफिसमध्येच राहायचे होते. आणि बहुदा सरकारच्या सुक्षेसाठी त्याचा बाहेरच्या जगाशी संपर्कही तोडण्यात आला होता.

दिवस दुसरा : सायंकाळी ४ वाजता

वसू शांतपणे बोलायला उभी राहिली. ती अहवाल सादर करत होती...

"मिस्टर प्रेसिडेंट एक हायड्रोजन बॉम्ब इथे वॉशिंग्टन वर पण टाकायला पाहिजे. चाचपू नका! माझं बोलणं नीट लक्ष देऊन ऐका. तुम्हाला पटेल. नैरोबीतले रोग ही साथ नाही. नॉर्ड व्हायरस हा खरा साथीचा रोग आहे. तो अमेरिकेत कधीच पोचला आहे किंवा पोचणार आहे. नॉर्ड व्हायरस म्हणजे काय? ते आधी समजून घ्या. एका सोप्या उदाहरणाने स्पष्ट करते मिस्टर प्रेसिडेंट.

नॉर्डला उपमा - जिवाणूंचा सोशल मीडिया अशी आहे. सोशल मीडियात ज्याप्रमाणे माणसांच्या महाजालात माहितीची देवाण घेवाण चालू असते. नेमकी तशीच माहितीची देवाण घेवाण नॉर्ड करत असतो. एका जिवाणूंकडून दुसऱ्या जिवाणूकडे अतिशय वेगाने तो माहिती पोचवतो. ही कसली माहिती आहे? औषधाशी कसं लढायचं याची ती माहिती आहे. साथीचे रोग पसरत आहेत याच कारण नॉर्डने औषधे निकामी ठरवली आहेत."

सर्व कमिटी मेंबरच्या स्क्रीन वर आत्ता डॉ. स्मिथचे प्रेसेंटेशन मी दाखवते आहे. कुठल्याही सोशल नेटवर्कमध्ये एक व्यक्ती दुसऱ्यापासून फक्त सहा स्टेप दूर असते. स्मिथने त्याचे सारे गणित मांडले आहे. जे माणसाबाबत खरे आहे. तेच जिवाणू - बॅक्टरियाबाबत सुद्धा खरे आहे.

"गेले काही महिने नैरोबीत ही साथ सुरू आहे असे आपण कालच म्हणाला होता. इतके दिवस चालू असलेला मानवी प्रवास. जिवाणूंचे जनरेशन यावरून हे सहज सिद्ध करता येते की तो व्हायरस अमेरिकेत आत्ताच पोचलेला आहे. त्याचे सविस्तर गणित स्मिथने लिहिलेले आहे. मिस्टर प्रेसिडेंट फक्त सहा स्टेप. मी आणि तुम्ही आजपर्यंत एकमेकाला ओळखत होतो का? यापुढे मात्र तुम्ही मला कधीच विसरणार नाही! कारण आपल्याच देशावर बॉम्ब टाकायचा अहवाल सादर करणारी स्त्री तुम्ही जन्मात विसरू शकता काय? तुमच्यात आणि माझ्यात आधी फक्त एका स्टेपच अंतर होत. आरोग्य मंत्री आपल्या दोघांनाही ओळखत असत. आता ते अंतर मिटलं. बॅक्टेरियाच्या सोशल नेटवर्कनुसार नैरोबी आणि वॉशिंग्टनमध्ये सुद्धा फक्त सहा स्टेप आहेत. स्मिथच्या गणितानुसार नॉर्ड अमेरिकेत पोचला आहे. सविस्तर डिटेल पुढच्या स्लाईडवर..."

दिवस तिसरा : स्मिथचे घर

रेड वाईन, स्विस चीज, मधातली टर्की, बडबड्या स्मिथ आणि त्याची भोंदू बायको. या सगळ्यांबरोबर वसूची मस्त मजा सुरू आहे. वसुंधरा माणसाच्या नेटवर्कमध्ये रमली आहे. मस्त खळखळून हसते आहे.

कालच वसू आणि स्मिथ या दोघांनी मिळून अमेरिकन सरकारला मस्तपैकी टोपी घातली आहे. माणसाचे आयुष्य जवळ जवळ ऐंशी वर्षाचे असते त्यात त्याला अनेक ओळखीपाळखी करायला वेळ मिळत असतो. पण बॅक्टेरियाचे आयुष्य काही मिनिटांचे फार तर काही तास. त्या आयुष्यात त्याला नॉर्ड इन्फेक्ट करणार कधी आणि तो अमेरिकेत पोचणार कधी? त्याला शेकडो वर्षे लागायला पाहिजे! पण स्मिथने गणितात आणि वसूने जीवशास्त्रात मुद्दामच काही सौम्य चुका केल्या! त्यामुळे तो व्हायरस अमेरिकेत आत्ताच दाखल झाला आहे अशी तद्दन खोटी थाप सरकारी मुर्खांना पचवता आली.

पण त्याचे परिणाम फार सुखद होते. युद्धखोर अध्यक्षांचा अणुबॉम्ब घरीच गंजत पडला. डिफेन्सचे बजेट नॉर्डविषयी अधिक संशोधन करण्यासाठी वर्ग करण्यात आले. दुसरे क्रिस्पर व्हायरस वापरून नॉर्डचे जीवशास्त्रीय दमन करणे शक्य होते. त्या संशोधनासाठी सरकारने डॉलर्सच्या राशी उभ्या केल्या होत्या. काही महिन्यातच हे संशोधन बाहेर येणार. वसूच त्या प्रोजेक्टची लीडर होती. त्याच्या पहिल्या क्लिनिकल ट्रायल आफ्रिकेतल्या नैरोबीत घेतल्याने तेथील रुग्णांना मोफत औषधोपचार मिळणार होते.

सेव्हिंग द वर्ल्ड आनंदी आनंद. ठेवणीतली रेड वाईन टर्कीबरोबर झिंग आणत होती हास्यांचे फवारे उडत होते कारण स्मिथ ओठाचा चंबू करून मूर्ख प्रेसिडेंटची नक्कल करून दाखवत होता. विशेषतः वसूनं वॉशिंग्टनवर हायड्रोजन बॉम्ब टाका असे नम्रपणे सुचवल्यावर प्रेसिडेंटचा बावचळलेला चेहरा स्मिथ साक्षात अवतरून दाखवत होता.

वसुला वाईन मिळाली, हास्य मिळाले, पुन्हा नवे मित्र मिळाले, सोशल सर्कल मिळाले. सगळं काही होतं तिच्यापाशी. ज्ञान, पैसा, मित्र... एक गोष्ट सोडून - तिचा विजय...

खूप उशीर झाला.. बारा एकपर्यंत पार्टी चालली. डिनर झाल्यावर आपल्या वसूने फोनवरील लाइफ बुक उघडले. आणि विजयला खऱ्या नावाने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली.

खोकत खोकत विजय उठला. अमेरिकेला परत आल्यापासून त्याची प्रकृती बरोबर नव्हती. पण वसूची फ्रेंड रिक्वेस्ट पाहिल्यावर तो चैतन्याने सळसळला. तीन महिन्यापूर्वी नैरोबीहून तो परतला होता. त्याच्या आयुष्यात तीन महिन्यात पहिलीच चांगली बातमी. तीन महिने त्याचा साधा खोकला कुठल्याच औषधाला दाद देत नव्हता.

डॉ. अभिराम दीक्षित
५ पंतकृपा शांतिशीला लेन, लॉ कॉलेज रोड, पुणे ४
मोबाईल - ९८२३६२१६४३

प्रतिनिधी यादी

हे मासिकाचे विस्तारित कुटुंबच आहे. प्रतिनिधी म्हणजे मासिकाच्या विस्तारित कुटुंबाचे घटक. प्रतिनिधी विनामानधन काम करतात. आपणही 'साऱ्याजणी'च्या संदर्भातील कामासाठी त्यांच्याशी संपर्क साधू शकता आणि वर्गणीही देऊ शकता.

महाराष्ट्र प्रतिनिधी
सरिता आवाड :
मो. ९८३३९८७५६८

अहमदनगर
प्रज्ञा हेन्द्रे-जोशी :
मो. ९८५००७५४४३

अकोला
दीप्ती जोशी :
फोन : ०७२४/२४२१६१३
मो. ९४२३१५०५१५

अमरावती
शोभा रोकडे :
मो. ९९६०९३७७६९

आंबेजोगाई
अरुंधती पाटील :
मो. ९४२२७४४१६६

औरंगाबाद
सुलभा खंदारे :
मो. ९४२२२०११२१
प्रतिभा अहिरे :
मो. ९२८४१९६३०४,
७२१९१३१३६८

बेळगाव
मनीषा सुभेदार :
फोन : ०८३१/२४०३९३८
मो. ९३४२५४१८८६

बीड
हेमलता पाटील :
फोन : ०२४४२/२२२४२०
मो. ९८२२६३११४४

बारामती
सीमा गोसावी :
मो. ९८५०९३४३४२

चिखली, जि.बुलडाणा
सत्य प्रयागबाई कुटे :
मो. ९८८१३१०२५८

बेंगळुरू
नीता जाधव :
मो. ९८४५०६६१७३

चाळीसगाव
वैशाली निकम :
मो. ९४२१५१२५३३

चंद्रपूर
गीता देव्हारे-रापुरे :
मो. ९९७५३४९५५५

गोवा (पणजी)
उज्ज्वला आचरेकर :
मो. ९४२११५७९४६

हैदराबाद
शुभांगी परळीकर :
मो. ९२९६०५०००२
फोन : ०४०/२४६०८५६६

जळगाव
शमा सुबोध :
मो. ९३७३०३५५३५

भडगाव, जि. जळगाव
गौतम बाविस्कर
मो. ९८२२९५२८५८
क्रांती सोनवणे
मो. ७७७५०२३२३१

कऱ्हाड
सविता मोहिते :
मो. ९८२२४०३७७१
(वेळ : सां ५ ते ६)

कोल्हापूर
उज्ज्वला हिरकुडे :
मो. ९८९०८३८६५५
समिक्षा फराकटे :
मो. ८००७१९०१०५

इचलकरंजी, जि. कोल्हापूर
प्रियंका म्हेत्रे :
मो. ७२४९८९२०८४

पो. जुगुळ, ता.अथणी, जि. बेळगाव
पो. खिद्रापूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
गंगा नर्सिंग होम
डॉ. राजश्री पाटील
मो. ८०८८२११२५२ /
८८८४००६००९

पद्मानगर, लातूर
शैलजा बरूरे :
मो. ९४२३७१४५३४

लातूर
उषा भोसले :
मो. ८८०६२२५६४३

महाबळेश्वर
नीता भिसे :
मो. ९४२०७७१५४३

मालगुंड
अस्मिता रुग्गे :
फोन : ०२३५७/२३५०१३
मो. ९६२३६९९१५४

मुंबई
मुलुंड
रजनी करंदीकर :
मो. ९८९२४७३३२७

विलेपार्ले (पू.)
विनिता हाटे :
फोन : ०२२/२६१३०६४२
(वेळ : सायं. ८ नंतर)

वाशी (नवी मुंबई)
शरयू देशपांडे :
मो. ९३२५००१९६२

वाशी - बेलापूर, नवी मुंबई
अजित मगदूम :
मो. ७५०६०६७७०९

नागपूर
सुभाष तुलसीता :
मो. ९३७१५९९९२३
वर्षा पतके थोटे (शब्दाली) :
मो. ७५५८४१९७६५

नाशिक
मेधा वैजापूरकर :
फोन : ०२५३/२५३०१०३
सायली आचार्य :
मो. ८४२१३८२०८३

पुणे
सुनीता भागवत (स्वारगेट) :
मो. ९४२२३१०३७८
दिलीप फलटणकर
(बाणेर-बालेवाडी) :
मो. ९८८१४१९७९६
मीरा कुलकर्णी (पाषाण) :
मो. ९४२२१८९२६४
अनुराधा आटोळे
(टिंगरे नगर)
मो. ९१४५२८८३२८

दौंड, जि. पुणे
अरुणा मोरे :
मो. ९८५००१४५७३

केडगाव, ता. दौंड, जि. पुणे
शोभा वाईकर :
मो. ९११२७३९४१८
पुरंदर जि. पुणे
अजरुद्दीन नदाफ :
मो. ९१३०५७६६९६

नंदुरबार
गौतम वाघ
मो.९६९९९७८३२२

परभणी
ज्योती चौंडे :
मो. ९०९६५०५१७६

निपाणी
शोभा तळेकर :
मो. ८३१७४६६३१५

सफाळे जि. पालघर
स्वाती भोईर :
मो. ८१०८३२२३९९

सावंतवाडी
अर्चना वझे :
फोन : ०२३६३/२७२८२८
श्वेतल परब
मो. ९४२३३०१८९२

मालवण
वैशाली पंडित :
फोन : ०२३६५/२५२९९२
मो. ९४२२०४३०२५

कणकवली
शमिता बिरमोळे :
फोन : ०२३६७-
२३२९०९/२३२५०७

सिंधुदुर्ग जिल्हा
अर्पिता मुंबरकर :
मो. ९४२०२६११९६

सोलापूर
सरोजनी तमशेट्टी :
मो. ९९६०१०३२९४

सोलापूर मोहोळ, ग्रामीण
डॉ. स्मिता पाटील
मो. ७०२०५४८३०६
(वेळ : सकाळी ९ ते ११ व संध्या. ६ ते ९)

सोलापूर शहर व जिल्हा
डॉ.अस्मिता बालगावकर
मो. ९०२११०८६८६

सांगली
छायाश्री जाधव :
फोन : ०२३३/२३७६८६१
मो. ९८६००४९८८०

सांगली जिल्हा
सोनिया कस्तुरे :
मो. ९३२६८१८३५४
नामदेव कस्तुरे :
मो. ९४२२४१०८५४

तासगाव, जि. सांगली
मिनल कुडाळकर :
मो. ९४२३८७२४१६

सातारा
श्रीकांत के. टी. :
फोन : ०२१६२/२३२०६०
मो. ९८२२०६४८००

देऊर, जि. सातारा
तरुजा भोसले :
मो. ९५६१०९३८३८

खटाव, जि. सातारा
मोहन घाडगे
मो. ८६०००८९००९

सातारा जिल्हा
कुंदा गुणवंता अशोक लोखंडे
मो. ७७०९६५५२५१

उस्मानाबाद
कमल नलावडे :
मो. ९८९०९५२८४७

नांदेड
अनघा जोशी मुधोळकर :
मो. ९४२२४३४४४०

रिसोड, जि. वाशिम
चाफेश्वर गांगवे :
मो. ९०९६६७५००१

यवतमाळ
आशा देशमुख :
मो. ९४२३४३६०४३
मंगला सरोदे :
फोन ०७२३२/२४२८२९

शिंदखेडा, जि. धुळे
संदीप गिरासे :
मो. ९४२३४९४५१५

परदेशातील प्रतिनिधी

VIDWANS SHAILA :
10, Inverness Drive, Kendall Park, **NJ** 08824
Email : Shaila@vidwans.com

ADITI KELKAR HATE :
Flat no. 410, Burj I Nahada Tower, I Nahada 1, P. O. Box No. 341235 Dubai, **UAE.** PH. 971-4-2389467, Mobile- 971-56-1798331
Email : aditikelkar21@gmail.com

JYOTI KANITKAR :
13228 Stable Brook Way, **Herndon**, VA20171
Phone no : 703-478-2680
Email : jyoti@kanitkar.com

खालील ठिकाणीही 'मिळून साऱ्याजणी'ची वर्गणी स्वीकारली जाईल.
(१) हिराचंद नेमचंद वाचनालय : १३४, मुरारजी पेठ, सोलापूर - ४१३००१. फोन : २७२६६२०
(२) साधना : ४३०-३१, शनिवार पेठ, पुणे - फोन : २४४५९६३५

आमचे वितरक :
पूनम एजन्सी - २४४९६६८, बी. डी. बागवे आणि कंपनी, मुंबई - २३८५७०१२.

आम्ही एकत्र, आमची एकजूट
वसंतोत्सवातली काही क्षणचित्रं





मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि म. फुले समता प्रतिष्ठान आयोजित राष्ट्रीय एकात्मता परिषदेत लेखक आणि हमीद दलवाई यांच्या साहित्याचे अनुवादक डॉ. ए.आर. नागराजू यांचा सन्मान करताना अशोक धिवरे
सोबत - ॲड. शारदा वाडेकर, डॉ. नितीश नवसागरे, डॉ. गीताली वि.मं., डॉ. अभिजित वैद्य आणि डॉ.शमसुद्दीन तांबोळी

वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान कणकवली, सखी परिवार, कणकवली आणि मिळून साऱ्याजणी मासिक, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित बहारदार गप्पा कार्यक्रमात भेरा चित्रपटाचे दिग्दर्शक, सह-पट कथालेखक श्रीकांत प्रभाकर, चित्रपटात अनिकाकी भूमिका रंगवणारी श्रद्धा खानोलकर, नायक विष्णूच्या भूमिकेतील दीपक जोईल, प्रमोद कोयंडे (दादा सरपंच), विजय गावकर व डॉ. अविनाश गाड (गावकरी)

License to post without prepayment of postage No.: **WPP - 34**
Registered RNI No. MAHMAR/2000/02001 Declaration No SDO/Pune City/ SR/11/2021
Postal Regd. No. PCW/043/2024-2026
Published & Posted on 1/06/2025
Posting at PSO, Pune GPO - 411001

१ मे कामगार दिनानिमित्त
कामगार पुतळा,
मंगळवार पेठ इथं
कामगारांच्या हस्ते
मे अंकाचं प्रकाशन करताना

Something Like Truth...
या नाटकाच्या प्रयोगानंतर
मे अंकाचं प्रकाशन करताना
दुशा, शिल्पा, पर्ण, संपदा,
कल्याणी, शर्वरी, अश्विनी
यांच्याबरोबर गीताली

हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च
इन्स्टिट्यूट आयोजित
हमीद दलवाई स्मृती दिनानिमित्त
वंचितांचं शिक्षण कार्यक्रमात
मे अंकाचं प्रकाशन करताना

थिएटर ऑफ रेलेव्हन्सच्या द अदर वर्ल्ड... नाटकानंतर
नाटकाचे दिग्दर्शक मंजुल भारद्वाज, अश्विनी नांदेडकर,
सायली पावसकर, तुषार म्हस्के, प्रियांका आणि इतर
यांच्याबरोबर गीताली

गोवा येथील थिएटर फ्लेमिंगो संस्थेने Dumb Indignation...
या अप्रतिम निःशब्द नाट्य प्रयोगाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त
खास काही स्त्री चळवळीतील कार्यकर्त्यांचा सन्मान
पुण्यात आयोजित केला होता. त्यानंतर दिग्दर्शक केतन जाधव
आणि अभिनेत्री आमोदी सानप यांच्याबरोबर अर्चना झेंडे
आणि गीताली